
१४ ऑगस्ट ८२
दीड रुपया
साप्ताहिक

# माणूस



## रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले?

स्वच्छ मनानं आपण 'गोऱ्या' गांधींना सामोरं जाऊ या!



# माणूस

¤

वर्ष : बाविसावे

अंक : दहावा

१४ ऑगस्ट १९८२

किंमत दीड रुपया

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

अनंत सालकर

¤

मुखपृष्ठ छायाचित्र : गांधी चित्रपटात बेन किंग्जले आणि रोहिणी हट्टंगडी


# हिंदुस्थान स्वतंत्र कसा झाला ?

" ब्रिटिशांच्या परदास्यातून भारताची मुक्तता करण्याचे नि स्वतंत्र नि सार्वभौम असे आपल्या भारताचे संघराज्य करण्याचे श्रेय हे सशस्त्र किंवा नि.शस्त्र अशा कोणत्याही एका पक्षाचे नसून, ते गेल्या २-३ पिढयांतील सर्व पक्षांच्या सर्व स्वदेशनिष्ठ कार्यकर्त्यांचे सामायिक श्रेय आहे ! १८५७ च्या सशस्त्र क्रांतिवीरांचा वाटा तर त्यात आहेच आहे. पण त्यानंतरच्या देशभक्त दादाभाईंपासून देशभक्त गोखल्यांपर्यंतच्या नेमस्त म्हणविणाऱ्या पक्षातील सर्व कार्यकर्त्यांनाही ते श्रेय यथाप्रमाण मिळाले पाहिजे. राष्ट्रीय किंवा जहाल म्हणून ज्या पक्षाला म्हणत, त्याचाही वाटा या सामुदायिक क्षेत्रात आहेच आहे. स्वतःस असहकारवादी आणि अहिंसक म्हणवून घेणाऱ्या सहस्रावधी देशभक्तांनी नि देशसेवकांनी ह्या राष्ट्रीय स्वातंत्र्यास्तव जे भारतव्यापी कार्य केले त्याविषयीही आम्ही सर्वांनी कृतज्ञता व्यक्तविलीच पाहिजे. मी तर ह्याच्याहीपुढे जाऊन स्वानुभवाने असे सांगतो की, सशस्त्र वा नि.शस्त्र अशा कोणत्याही गुप्त वा प्रकट चळवळीत सक्रिय भाग ज्यांनी घेतला नाही, परंतु ज्यांनी ज्यांनी आपआपल्या हृदयात मूक सहानुभूती बाळगली आणि 'देवा, माझ्या भारताला स्वतंत्र कर' म्हणून अबोल प्रार्थना केल्या अशा आमच्या लक्षावधी स्वदेशबांधवांच्या त्या मूक शुभाशीर्वादांनाही आजच्या आपल्या ह्या राष्ट्रीय विजयाचे श्रेय त्या त्या प्रमाणात आहेच आहे "

¤

" एक दिवस का होईना पण जो स्वदेशासाठी बंदिवासात पडला तोही देशभक्तच आहे आणि त्याच्याविषयी एक दिवसापुरती कृतज्ञता आम्हाला वाटतेच. परंतु जेव्हा पं. नेहरूंसारखा आज भारतीय राज्याचा पंतप्रधान झालेला कॉंग्रेसीय देशभक्त – जरी त्याचीही देशभक्ती आम्ही सादर गौरवितो–प्रसिद्धपणे गर्जू लागतो की, 'खुदिराम प्रभृती सशस्त्र क्रांतिकारकाची मनोवृत्ती विकृत होती नि म्हणून त्यांना गौरविणे अश्लाघ्य आहे', तेव्हा कृतज्ञतेसाठी, ऐतिहासिक सत्यासाठी, राष्ट्राच्या हितासाठी आम्हास हे स्पष्टपणे सांगावे लागते की, जर कोणाची देशभक्ती सगळयात अधिक गौरवार्ह असेल तर ती फासावर गेलेल्या किंवा सशस्त्र युद्धात लढत लढत मारल्या गेलेल्या क्रांतिकारकांचीच होय. चाफेकराचे किंवा लढत्या नि जळत्या विमानात भस्म होऊन गेलेल्या सुभाषचंद्रांचे नाव घेताच तुमचा त्याग नि धैर्यवृत्ती, तुम्हाला, तुमच्याच मनातल्या मनात, दुय्यम प्रकारची, खुजी नि क्षुल्लक वाटते. म्हणून तुम्ही त्याच्या नावाचा गौरव करण्यास कचरता, भिता. ही तुमची देशघातक, कुमत्सरी, करंटी महत्त्वाकांक्षाच विकृत मनोवृत्तीची द्योतक आहे. "

¤

" QUIT INDIA चळवळीविषयी एक गोष्ट स्वत.स अहिंसक म्हणवून घेणाऱ्या कॉंग्रेसीय लेखकाकडून जाणूनबुजून सांगितली जात नाही. ती गोष्ट ही की, बंदिवासात जाणे, हरताळ करणे प्रभृती केवळ आत्मक्लेशी नि

नि:शस्त्र साधनांनी, ती चळवळ दडपून टाकण्यासाठी सशस्त्र अत्याचार करीत चाललेल्या हिंदुस्थानातील ब्रिटिश अधिकाऱ्यांना तोंड देणे आणि ब्रिटिश सत्तेला हादरा बसेल असा परिणामकारक प्रतिकार करणे अशक्य आहे, असे अनुभवास आलेल्या काँग्रेसमधील शेकडो नेत्यांनी नि अनुयायांनी शेवटी सशस्त्र क्रांतिकारकांचाच मार्ग पत्करला! त्यांनी पटापट भूमिगत होऊन गुप्तपणे ब्रिटिश सत्तेशी सशस्त्र प्रतिकार चालविला नि एकच रक्तपाती धुमाकूळ उडवून दिला. शेवटी नि:शस्त्रवादी काँग्रेसच काही काळ सशस्त्र क्रांतिकारकांची मठी बनली!"

¤



स्वातंत्र्यसमराची स्मृती जागवताना

¤

एकीकडे काँग्रेसमधील सशस्त्र क्रांतिकारकांचा हा धुमाकूळ आणि दुसरीकडे हिंदुस्थान मुक्त करण्यासाठी बाहेरून येणारी सुभाषचंद्रांची आझाद सेना; नाविकांचे बंड आणि महायुद्धानंतर ब्रिटनची खालावलेली आर्थिक व लष्करी स्थिती यांचा परिपाक म्हणजे आपले स्वातंत्र्य, असा एकूण भारतीय स्वातंत्र्यसमराचा सावरकरप्रणीत व्यूह आहे. हा व्यूह सांगून सावरकर म्हणतात–

"क्रांतिकाल संपताच आणि स्वदेश स्वतंत्र होऊन स्वराज्य स्थापन होताच आता आपले सर्वांचे पहिले राष्ट्रीय कर्तव्य हे असावयास पाहिजे की, क्रांतिकालातील आपणच राष्ट्रभर फैलावलेल्या राज्यविध्वंसक वृत्तींना नि साधनांना तत्काल विसर्जून, राष्ट्रात विधायक नि निर्बंधशील वृत्तीचे वर्चस्व स्थापिले पाहिजे. परराज्य उलथून पाडण्यासाठी गुप्त कट, सशस्त्र बंडाळी भयंकरवाद, निर्बंधभंग, परराज्यद्रोह ही सर्व साधनेच पुण्य असतात, अपरिहार्य असतात. पण जर ही साधने नि ह्या सर्व वृत्ती स्वराज्य स्थापन होताच पंचमहापातकांसारखीच अधर्म्य समजून तत्काल टाकून दिली नाहीत तर बाहेरच्या शत्रूंहूनही स्वराज्यास ती प्राणघातक ठरल्यावाचून राहत नाहीत.'

¤

"स्वातंत्र्याचा, सगळ्यात मोठा शत्रू अराजक होय."

¤

"आपले सारे मतभेद मतपेटीतच सामावले पाहिजेत. त्या मतपेटीचे बूड फुटके नाही ना, तेवढे मात्र कटाक्षाने पहा."

¤

"ह्या दृष्टीने ब्रिटनच्या लोकतंत्रातून आपण उसना घेतलेला 'विरोधी पक्ष' हा विधिमंडळातून वापरला जाणारा शब्द त्याज्य आहे. राज्यधारक पक्ष आणि विरोधी म्हणवणारा पक्ष ह्यांच्यात खरा विरोध इतकाच असतो की, पहिला पक्ष बहुमतीय असल्यामुळे त्याच्या हाती घटनेप्रमाणे राज्यकारभार जातो आणि हा भिन्न पंथीय पक्ष, हा OPPOSITION PARTY, अल्पमतीय असल्यामुळे त्यांच्या हाती राज्यकारभार आलेला नसतो. ह्यासाठी ह्या दोन पक्षांना सरकारी पक्ष व बिनसरकारी पक्ष असे जरी म्हणता येईल तरी 'बहुमतीय पक्ष' आणि 'अल्पमतीय पक्ष' असे शब्द योजणेच उचिततर आहे. ह्या अल्पमतीय पक्षाचे मुख्य कर्तव्य, जर देशाला अपायकारक कृत्य राज्यधारक पक्षाच्या हातून होत आहे असे वाटले तर ते हाणून पाडण्यापुरता त्या शासकीय पक्षाला ( GOVERNMENT ला ) विरोध करणे. परंतु ज्या गोष्टी देशहितकारक आहेत त्यात राज्यधारक पक्षाला मन:पूर्वक सहकार्य करणे, असे दुहेरी राहील."

–स्वातंत्र्यवीर सावरकर

१० मे १९५२ ला पुण्यात झालेल्या अभिनव भारत सांगतासमारंभातील भाषणांमधून–

# सुभाषबाबूंच्या आझाद हिंद सेनेच्या मी थोडा उपयोगी पडू शकलो....

## एक मुलाखत—दादुमिया

हरेकृष्ण हरेराम चळवळीत बरेच संन्यासी काम करतात. भगवी वस्त्रे नेसलेले संन्यासी कोणत्या प्रांतातून आले आहेत याविषयी सहसा बोलत नाहीत. सर्व सारखे.

पण वेदना माणसास बोलायला लावते. पोटदुखीसाठी आलेला एक संन्यासी मराठी आहे हे मला चटकन समजले. औषधोपचारामुळे आमची दोस्ती जमली. दोस्तीमुळे सहज मुरलीधर बोकिलांनी काही पूर्वसूरीच्या गमतीजमती सांगितल्या. त्या ऐकून माझे हृदय भारावून गेले. खराखुरा स्वातंत्र्यसेनानी होता तो संन्यासी. नाव मुरलीधरदास. एकदम अस्सल; पण त्यागी, विरागी. थोडक्यात आजच्या बाजारात शून्य किंमत असलेला. वेडा, आदर्शवादी, व्यवहारशून्य !

हे सत्य मला समजले याचे कारण या संन्याशाच्या मानेवरील चार इंच लांबीचा व अर्धा इंच रुंदीचा आडवा स्कार (scar)।

सुरुवातीला हा 'स्कार' कसला आहे याचा थांगपत्ता हे संन्याशीबुवा मला लागू देईनात. मी खनपटीलाच बसलो तेव्हा त्यांनी मला एक अजब कहाणी पेश केली. ती त्यांच्याच शब्दांत —

¤

१९४२ चे वर्ष. क्रांतीचे रणशिंग काँग्रेसने फुंकले. 'चले जाव'चा ठराव पसार झाला. त्यात साऱ्या काँग्रेसच्या स्वातंत्र्यसैनिकांची धरपकड होऊन त्यांना तुरुंगात डाबण्यात आले. जयप्रकाश नारायण, एस. एम. जोशी वगैरे मंडळींनी भूमिगत राहून क्रांतिकार्य करण्यास सुरुवात केली. त्यात अनेक तरुण सामील झाले. कार्य काय व कोठे करायचे हा मोठा प्रश्न होता. प्रमुख नेत्यांची अटक झाली होती. म्हणून निरनिराळे हिंसक व अहिंसक मार्ग सुचविले गेले. त्या तरुण क्रांतिकारकांत मी सामील झालो. इंग्रजांना आव्हान देऊन स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आपल्या देहाचा व शक्तीचा काही तरी उपयोग व्हावा एवढीच माझी इच्छा होती.

मी पहिल्यापासून राजकीय चळवळ्या. माझे मित्रमंडळ मोठे. ह्या ओळखीच्या जोरावर देवळाली येथे मला मिलिटरी कॅंपमध्ये नोकरी करण्याची संधी मिळाली. सुरुवातीलाच मी हवालदार म्हणून लागलो. लष्करात लढाऊ व बिनलढाऊ असे दोन प्रकार असतात. माझा समावेश बिनलढाऊ प्रकारात करण्यात आला. दक्षिण देवळाली कॅंपमध्ये मी स्टोअर-कीपर होतो. चोवीस तास ड्यूटी. जागा सोडून कोठेच जायचे नाही. जगाशी माझा संपर्कच आठ महिने नव्हता. माझा बॉस कर्नल स्मिथ माझ्यावर खूप खूष होता; पण मी कंटाळलो. बाहेर एवढ्या संघर्षमय घटना घडत असताना मी त्या देवळालीच्या तुरुंगात डांबल्याप्रमाणे दिवस मोजीत होतो. मला स्वप्ने होती स्वातंत्र्याची; पण मी स्वत:च एखाद्या तुरुंगात बंदी असल्यासारखा वावरत होतो.

चिकाटी व कामातील चोखपणा पाहून कॅ. स्मिथने व्ही. सी. ओ. (Viceroy's Commissioned Officer) या पदासाठी माझी शिफारस केली व मला ते कमिशन मिळाले. मी अधिकारी बनलो. स्टोअर-कीपर हा जबाबदारीचा हुद्दा असतो. त्यासाठी माणूस अधिकारी पाहिजे, कोणी सोम्यागोम्या चालत नाही. म्हणून बहुधा मला कमिशन मिळाले असावे. अधिकारी बनताच माझ्यापुढे सहीसाठी दोन फॉर्म्स ठेवण्यात आले. तुला नोकरी कोठे करायची आहे, त्याप्रमाणे हा फॉर्म भर, असे सांगण्यात आले. मी देवळालीला कंटाळलो होतो. जगाच्या पाठीवर कोठेही जायला तयार आहे असे मी लिहून दिले व त्या प्रकारच्या फॉर्मवर सही केली. कर्नल स्मिथ माझ्यावर खूष झाला व त्याने माझी नेमणूक अलेक्झांड्रा येथे अ‍ॅसि. स्टोअरकीपर म्हणून केली.

तेथे जाणे धोक्याचे होते. जर्मन पाणबुड्या ब्रिटिश गलबते बुडविण्यासाठी टपून बसल्या होत्या. बोटीचा प्रवास अजून मला आठवतो. लपंडावच खेळत होतो आम्ही ! जर्मन पाणबुडी आली की, आमची बोट चक्क मागे जाई. धोका टळला की प्रवास पुन्हा सुरू. अलेक्झांड्रा एकदाचे आले. तेथून ९० मैल आत इंग्रजांचा एक मोठा बेस डेपो होता. तेथे माझे काम सुरू झाले.

अलेक्झांड्रा बंदर व आमचा डेपो पक्क्या सडकेने जोडले गेले होते. सुमारे ५० मैलांवर युद्धभूमी होती रोज आम्ही सैनिकांना लगर (जेवण) पुरवीत असू. आमच्या महत्त्वाच्या इमारती भूमिगत होत्या. तळघरे म्हणा ना !

माझ्याबरोबर एक मद्रासी गृहस्थ स्टोअरकीपर म्हणून होता. त्याची लष्करात बरीच नोकरी झाली होती. त्याची एकंदर वागणूक मोठी विपरीत होती. तो शुद्धीवर क्वचितच असे. दारूत अखंड बुडलेला ! त्याचा एकंदर खाक्या पाहून माझ्या बॉसने मला दोन महिन्यांच्या आतच प्रमुख स्टोअरकीपर म्हणून बढती दिली.

बॉंबहल्ला झाला तर आपले स्टोअर्‌मधील सामान कसे सुरक्षित राखावे व शत्रूच्या हाती ते कसे जाऊ देऊ नये त्याचे प्रशिक्षण आम्हाला देवळालीला असतानाच दिले गेले होते. बस-डेपोत सैनिकांनी काही सामान मागितले, ऑर्डर आली की, त्याबरहुकूम सामान काढून द्यायची आम्हास आज्ञा होती. काम सोपे होते. दिवस मजेत जात होते. शत्रू शंभर मैल दूर होता. त्यामुळे प्रत्यक्ष असा आघाडीवरील धोका नव्हता. जर्मनांची विमाने अधूनमधून टेहळणीसाठी येत. कधीकधी बॉंब हल्लेदेखील होत; पण खंदकात तशी सोय चांगली होती. जिवाचे भय फारसे वाटले नाही.

मालसामान आणण्यासाठी रोज निरनिराळे अधिकारी येऊन आम्हाला भेटत. ते नित्याचे झाले होते ते लढाऊ अधिकारी, तर

मी बिनलढाऊ अधिकारी.

एकदा कर्नल देसाई नावाचे लष्करी अधिकारी मला भेटले. टिपिकल इंग्रजी लष्करी अधिकाऱ्याचा युनिफॉर्म, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व आणि छातीवर व खांद्यावर लष्करी पदाची पदके व फिती! मोठा रुबाबदार अधिकारी होता हा. मला एकदम आवडून गेला.

पण त्यांनी मला खूप दम दिला की मी नीट काम करीत नाही, माझे लक्ष नसते वगैरे. मी थोडा घाबरलो. लष्करात अधिकाऱ्यांची गैरमर्जी होऊन चालत नाही. त्या वेळी इंग्रजी लष्करात तर कडक शिस्त होती. आज लष्करात बरीच लोकशाही दिसते. इंग्रजांच्या लष्करात शिस्त भयंकर होती. कर्नल देसाई माझ्यावर एवढे का रागावले हे मला कळेना. मी गोंधळून गेलो.

मला तुमच्याशी थोडे खाजगी बोलायचे आहे असे त्यानी मला फर्मावले. मी त्याना स्टोअरमधील एकदम बाजूच्या खोलीत नेले व म्हणालो, 'काय,' अर्थात, भीतभीतच.

कर्नल देसायानी मी पूर्वी कोठे होतो, कॉंग्रेस पक्षात काय काम करीत होतो, मी लष्करात का शिरलो वगैरे माझा पूर्वइतिहास साद्यंत सांगितला.

माझा तर बर्फच झाला शरीराचा!

काय बोलणार?

या लष्करी अधिकाऱ्यास माझे राजकीय पूर्वायुष्य संपूर्णपणे माहीत होते. मी जास्त काय बोलणार?

जराशा हलक्या आवाजात ते म्हणाले, 'तुम्ही नोकरी करण्यासाठी काही लष्करात आलेला नाहीत. तुम्हाला देशासाठी काही तरी करायचे आहे, करून दाखवायचे आहे. तुम्ही मला मदत करा. तुम्हाला देशसेवा करायची ही पहा आयती संधी प्राप्त झाली आहे.'

मी आणखीनच घाबरलो, गोंधळलो, डोके संशयाने भणाणून गेले. क. देसायांना मदत करा म्हणजे काय? मला दरदरून घाम सुटला!

'तुम्ही असे घाबरू नका,' त्यांनी मला शांतपणे समजावले.

तेव्हा मला कळले की, कर्नल देसाई सध्या सुभाषबाबूंच्या आझाद हिंद सेनेचे काम करतात. पूर्वी ते इंग्रजांच्या लष्करात कॅप्टन म्हणून नोकरी करीत होते; पण सुभाषबाबूंचे आवाहन ऐकून ते त्यांच्याकडे गेले. त्यांना बढती मिळाली. कॅप्टनचे ते कर्नल झाले.

माझी छाती आनंदाने फुलली. मी त्यांना विचारले, 'तुम्हाला मी कोणत्या तऱ्हेने मदत करू शकतो?'

'आम्ही तुमच्यावर जर्मनीच्या तर्फे हल्ला करू. आम्ही एका बगलेकडून हल्ला चढवू. स्टोअरचे रक्षण करण्यासाठी असलेले गार्डस आम्ही गोळ्या घालून मारून टाकू. तुम्ही तुमच्या स्टोअरचे दरवाजे तेवढे उघडे ठेवा. आम्हाला तुमच्याशी युद्ध करायचे नाही. तेवढा वेळ आमच्याजवळ नाही आणि तेवढी तयारीदेखील नाही; पण आम्हाला तुमचे सारे स्टोअर पळवून न्यायचे आहे, त्यासाठी आम्हाला तुमच्या मदतीची जरूर आहे. आमच्याजवळ वेळ थोडा आहे. इंग्रजी सैन्य तत्पर आहे. त्यांना आमच्या आगमनाची चाहूल लागताच ते आमच्यावर चालून येतील याची आम्हाला खात्री आहे. ते सैन्य येण्याआधी आम्हाला पळून जायचे


*With Best Compliments From ;*

## Poona Patterns & Foundries Pvt. Ltd.

**for Wooden and Metallic Patterns for Aluminium, Brass, Gun Metal and Copper Castings**

*Regd. Office :*
Kala Basant, Plot No. 146, 1st Floor,
Bhandarkar Road, Pune 411 004

*– Factory –*
691/A/2, Pune–Satara Road,
Bibwewadi Industrial Estate,
Bibwadi, Pune 411 009
Telephone : 443645 & 58415



## आर्ट सेन्टर

फोन : ४४२४६६

नू. म. वि. प्रशालेजवळ, पुणे २.

**इंजिनिअरिंग व टेक्निकलच्या विद्यार्थ्यांना लागणारे शैक्षणिक साहित्य, स्टेशनरी, ड्रॉइंग मटेरियल्स् योग्य दरात मिळेल.**

*With Best Compliments from :*

# A. V. Apte & Co.

(Promotors & Builders
of
ownership flats)

**1957 Sadashiv Peth,
Madiwalle Colony,
Pune - 411 030**

★

PHONE NO. 32065.

**With
Best
Compliments
From**

# Alpana Cinema

**LAXMI ROAD,
PUNE 411 002**

**Phone No. 44 99 24**

NOW SHOWING

# 'TERI KASAM'

आहे.' कर्नल देसाई त्यांची योजना मला समजावून सांगत होते.

मी मंतरल्यासारखा भारावून त्यांच्याकडे अनिमिष नेत्रांनी बघत होतो. योजना मस्त होती. सहज पार पाडण्यासारखी सोपी होती. देशास खूप मदत होणार होती. आमचा 'बेस स्टोअर' प्रचंड होता. एखाद्या लहानशा शहराचे त्याला स्वरूप आले होते.

मी त्यांच्याशी हस्तांदोलन केले. माझा तो मदतीचा हात होता. आमचे प्लॅनिंग व्यवस्थित ठरले. दिवस नक्की झाला. वेळ ठरली आणि त्याप्रमाणे त्या वेळी आघाडीवर घनघोर युद्ध चालू झाले. ते अशासाठी की, इकडे 'बेस स्टोअर'कडे कोणाचे लक्ष जाऊ नये. इंग्रजी लष्कर ह्या बाबतीत बेसावध रहावे.

ठरल्याप्रमाणे त्यांनी एका बगलेकडून जोराचा हल्ला केला. वरून बाँबर विमानांचे कव्हर होते. सहा टँक्स् क. देसायांनी आणल्या होत्या. ते रणगाडे आमच्या छावणीत घुसले. त्यांच्याबरोबर सव्वाशे डिझेल मोटार-ट्रक्सचा काफिला होता.

मी प्रमुख अधिकारी.

मी माझ्या हाताखालच्या माणसांना फर्माविले, 'आपण बिनलढाऊ माणसे. उगाच हालचाल करू नका. फुकट मरू नका. आपण तटस्थ राहू या. इंग्रज सैनिक येतील व या दुष्मनांची चटणी करतील !'

माझ्या हाताखालच्या माणसांचा माझ्या शब्दांवर तत्काळ विश्वास बसला. त्यांचा जीव वाचविणार होतो मी. माझ्याबद्दलचा त्यांचा आदर दुणावलाही असेल ! त्यांनी होकार दिला.

क. देसायांजवळ सैनिक होते. अर्ध्या तासात त्यांनी सारे स्टोअर खाली केले व त्या मालसामानाचे आपल्या ट्रक्सवर पटापट लोडिंग करण्यास सुरुवात केली.

क. देसाई खूपच 'स्ट्रेस' खाली दिसत होते. त्यांना वेळेशी युद्ध खेळायचे होते.

आम्ही तटस्थ राहिलो.

प्रतिकार करण्याचा प्रश्नच नव्हता. लढण्याची इच्छाच नव्हती.

अर्ध्या तासात आमचे स्टोअर आमच्या डोळ्यादेखत त्या ट्रक्सवर लादले गेले आणि क. देसाई निघाले.

जायच्या आधी दोन बराकींवर बाँब टाकून त्यांनी त्या जाळून टाकल्या.

आमच्या छावणीस लष्करी सलाम ठोकून क. देसाई व त्यांची सेना पहाता पहाता नाहीशी झाली.

हे एवढे झटपट झाले की, इंग्रजी सैन्य स्टोअरपाशी वेळेवर पोचू शकले नाही. शक्यच नव्हते ते.

आमचे नियोजन कसे पर्फेक्ट होते !

ब्रिटिश प्रादेशिक सेनाधिकारी साधारणपणे दोन-अडीच तासांनंतर त्याची लढाऊ तुकडी घेऊन आमच्या छावणीत दाखल झाला. दोन बराकी जळत आहेत, स्टोअरची सारी लूटमार झाली आहे असे दृश्य त्याने पाहिले. तो भडकला.

पण तो आम्हाला काय बोलणार ? लष्करी कायदा मला पाठ होता. क. देसायांनी तो मला सांगितला होता.

बिनलढाऊ लोकांनी खंदकात हल्ल्याच्या वेळी जायचे असते व लढाऊ सैनिकांना वाट करून द्यायची असते.

आम्ही लष्करी कायद्याप्रमाणेच वर्तन केले होते.

तात्त्विकदृष्ट्या आम्ही शंभर टक्के बरोबर होतो. हल्ला झाल्यावर आम्ही खंदकात गेलो. क. देसाई जेव्हा माल-सामान पळवीत होते तेव्हा आम्हाला ते काय करीत होते ते कळणे शक्य नव्हते. कारण आम्ही खंदकात होतो.

ब्रिटिश सेनाधिकाऱ्याने सारी पहाणी व तपास केला. स्टोअर सारे व्यवस्थित धुऊन निघाले होते. कोणी तरी आपल्यातलाच फुटला आहे असा संशय त्याने व्यक्त केला.


त्याने चौकशी सुरू केली.

त्या खात्याचा प्रमुख म्हणून त्याने मला गिरफदार केले. एवढा हल्ला झाला, एवढ्या शंभर ट्रक्स् येथे आल्या, तेव्हा तुम्ही काय केले, असा प्रश्न रागाने त्यांनी मला विचारला.

मी शांतपणे त्याला कायद्याचे कलम सांगितले. तो आणखीनच भडकला. कारण मी शहाणपणा करून म्हणालो होतो, 'बिन-लढाऊ सैनिकांनी खंदकात प्रवेश करावा व अॅडव्हान्सड लढाऊ तुकडीने जागेचा ताबा घेऊन हल्ल्याचा प्रतिकार करावा. आम्ही आमचे कर्तव्य केले. अॅडव्हान्स लष्करी तुकडी हल्ल्याचा प्रतिकार करण्यासाठी वेळेवर येणार असे आम्ही दुर्दैवाने गृहीत धरून चाललो. सॉरी !'

आगीत मी पेट्रोल टाकले होते. ह्या कॅप्टन वेळेवर पोचू शकला नव्हता आणि त्या अपयशावर मी केवळ बोटच ठेवले होते, एवढे नव्हे, तर मी त्याच्या जखमेवर मीठ चोळले होते.

माझ्या तुकडीच्या वतीने मी एकच वाक्य पुन्हा पुन्हा घोकीत राहिलो, 'वर काय झाले ते आम्हाला माहीत नाही, नव्हते.'

**KHADILKAR**
**PROCESS STUDIO**

*COLOUR BLOCK MAKERS*

461/1, Sadashiv Peth,
Tilak Road, Poona 411 030

*Phone : 443059*

आम्हाला आठ दिवस फुकट सरकारी पाहुणचार भोगावा लागला.

माझ्यावर माझ्या माझ्या तुकडीतील माण-सांचे जीव वाचविण्याची नैतिक जबाबदारी येऊन पडली होती. आम्ही खरे कोणाचे म्हणून आमचा छळ सुरू झाला. क. देसाई व माझी भेट व बातचीत गुप्त होती. कोणाला त्यातले अक्षरही माहीत नव्हते. त्यामुळे गौप्यस्फोट होईल ही भीती मला नव्हती.

पण मारपीट व छळ होऊ लागला.

आम्हाला ही मंडळी बहुधा गोळी घालून मारून टाकणार हे आमचे भवितव्य मला डोळ्यासमोर दिसू लागले.

लष्करी शिस्त!

छळाविरुद्ध बोंबाबोंबही करण्याची सोय नाही आणि मुख्य म्हणजे आमचे ऐकणार कोण ?

म्हणून सरतेशेवटी संडासात गेलो असताना मी ब्लेडने माझा गळा—मान कापून घेतली. साऱ्या अंगावर रक्ताचा शिडकाव झाला. साऱ्या सैनिकांची खात्री झाली की, हा बोकील यात मरणार! म्हणून तावडतोब मला हॉस्पिटलात दाखल करण्यात आले.

भूल देण्यात आली व जखमेवर टाके घालण्यात आले.

मला चोवीस तास संपूर्ण आराम मिळाला. माझ्याकडे त्या काळात कोणी आलेसुद्धा नाही. मी ताजातवाना झालो.

दुसऱ्या दिवशी सर्वोच्च सेनाधिकारी हॉस्पिटलमध्ये पहाणीसाठी आले कर्नल-साहेब मला म्हणाले, 'मि. बोकील, शत्रूला सामील असल्याचा आरोप तुमच्यावर आहे. आता हा आत्महत्येचा दुसरा आरोप. हे तुम्ही काय चालविले आहे? तुमचा पहिला गुन्हा लपविण्याच्या हेतूने तुम्ही हा दुसरा गुन्हा केला आहे. हे सारे भयंकर कारस्थान आहे यात शंकाच नाही!'

मी एकदम म्हणालो, 'सर, प्लीज थांबा; आत्महत्या करण्याचा प्रयत्न मी मुळीच केलेला नाही. तुमच्या सोल्जर्सच्या मारा-नेच मी मरणार अशी परिस्थिती निर्माण झाली होती. मी काहीही गैर केले नाही हे त्यांना खूप सांगून पाहिले; पण कोणीही काही ऐकायला तयार नाही. आमच्या तोंडून वदवून घेऊन आमच्यावर खोटा आरोप करण्याचा त्यांचा हेतू स्पष्ट होता म्हणून ते आम्हास मारहाण करीत होते. या अन्यायास आपल्यासमोर तोंड फोडण्यासाठी मी हा प्रकार केला. यात आत्महत्या नाही. उलट मी माझा जीव वाचविण्याचाच प्रयत्न केलेला आहे.'

तो उच्च सेनाधिकारी माझ्या या स्पष्टो-क्तीने गोंधळून गेला. त्याने आम्हाला जवळजवळ सोडून दिले.

पण तो गेल्यानंतर आमचे 'कोर्ट मार्शल' सुरू झाले. खटला सुरू झाला. दोषी ठरलो असतो तर गोळी घालून तेथल्या तेथे ठार मारण्याची सजा निश्चित होती.

पण आमची मारपीट थांबली.

तो 'रिलीफ' कमी नव्हता.

वकील देणे शक्य नव्हते.

जो काय जबाब द्यायचा तो सर्वांच्या तर्फे मीच दिला.

आमचा जबाब सरळ होता. आम्ही कायदा उद्धृत केला. कायदा आमच्या फायद्याचा होता. आमच्या बाजूचा पुरावा काहीच नव्हता. संशय हाच आमचा पुरावा!

कायदा सरळ होता. सायरन वाजला की बिनलढाऊ तुकडीने खंदकात जायचे व लढाऊ तुकडीने जागेचा ताबा घेऊन शत्रूशी लढायचे.

आम्ही कायद्याप्रमाणे वागलो होतो.

आम्ही कायदेभंग जराही केला नव्हता.

फायटिंग एलिमेंट्स वेळेवर हजर होऊ शकले नाहीत म्हणून बड्याचे तेल वांग्यावर या न्यायाने ती मंडळी आम्हास दोषी ठरवू पहात आहेत व आपला गुन्हा छपवू पहात आहेत असा जोरदार बचाव मी केला.

आम्ही शत्रूला कशी मदत केली?

आम्ही तर खंदकात होतो.

शत्रूला तर आम्ही पाहिले देखील नाही!

तुम्ही म्हणता आम्ही शत्रूशी हातमिळवणी केली.

त्याचा तुमच्याजवळ काही पुरावा? काही फोटो? काही कागदपत्र ?

आम्ही खंदकात गेलो.

वर काय झाले ते आम्हाला माहीत नाही.

पुन्हा पुन्हा हे मी जोर देऊन सांगितल्यामुळे कोर्ट मार्शल करणाऱ्या सैनिक न्यायाधिशांना माझे म्हणणे पटले. प्लॅटून कमांडरला वाच-विण्यासाठी तुम्ही आमच्यासारख्या निर-पराध व निर्दोषी बिनलढाऊ अधिकाऱ्याचा विनाकारण बळी देत आहात हे माझे विधान त्यांना संपूर्णपणे खरे वाटले.

कोर्ट मार्शलचा सीन महाभयंकर असतो. तो पाहूनच सर्वसाधारण माणसाला चक्कर येते.

त्या गंभीर, निर्दय व लष्करीदृष्ट्या निरस व क्रूर वातावरणात माझा जोरदार बचाव मोठा उठून दिसत होता.

माझ्यावर माझ्या तुकडीतल्या माणसांना वाचविण्याची एक फार मोठी जबाबदारी येऊन पडली होती.

त्यामुळे कदाचित मी निर्भय बनलो असेन.

कदाचित् मातृभूमीची मी खरीखुरी सेवा केली आहे, ती स्वतंत्र झाली तर त्या कार्यात माझा अल्पांशाने का होईना, पण थोडा भाग आहे, या आनंदाच्या बेहोशीमुळे मी निर्भय बनून फडाफडा सैन्याधिकाऱ्यासमोर जबाब देत होतो.

पण त्या निर्भय करारी व ठासून दिलेल्या जबाबामुळे मी निर्दोष सुटलो! माझ्या माण-सांचीही निर्दोष म्हणून सुटका झाली!

विमानाने चौथ्या दिवशी कराचीस आणले. संशयितास त्या जागी ठेवता येत नाही म्हणून सरकारने माझी बदली केली. अलेक्झांड्राहून भारतात बदली केली. मी डेअरीचे काम बघू लागलो.]

भारतात कालांतराने मी लष्करी नोकरी-चा राजीनामा खरडला!

आझाद हिंद सेनेच्या सुभाषबाबूंना मी उपयोगी पडू शकलो, मदत करू शकलो, हा विचार किती सुखद आहे हे तुम्हाला कसे सांगू ?



**‘ मी स्वत: आदर्श नसेन, पण मला आदर्शाची ओढ आहे. आपला देश, धर्म, संस्कृती याहून जगात काही श्रेष्ठ आहे असं मला वाटत नाही. आमच्या पिढीला चांगले संस्कार मिळाले, पण आम्ही नालायक निघालो. पुढच्या पिढीवर आम्ही संस्कार केले नाहीत.’**

# बाळ कोल्हटकर / सुरेश खरे

**यांची ही दिलखुलास बातचीत !**

बाळ कोल्हटकरना तसं मी बरीच वर्षं ओळखतो. तसे आमचे दोघांचे स्वभावधर्म, विशेषत: लेखनाच्या बाबतीत अगदी भिन्न आहेत; पण ते कधी आमच्या स्नेहाच्या आड आले नाहीत. बाळ कोल्हटकर हे एक झपाटलेलं झाड आहे सदैव उत्साहानं ओसंडणारं हे व्यक्तिमत्त्व मला वेगळं वाटतं. त्यांच्या डोक्यात सदैव कल्पनांचे खेळ चालू असतात आणि भडाभडा बोलून ते दुसऱ्यांना ऐकल्याशिवाय त्यांना चैन पडत नाही. लांबट चेहऱ्यानं तुटक बोलून विद्वत्तेचा भास निर्माण करण्याचं तंत्र त्यांच्याकडे नाही. आपल्या संस्कृतीचा जाज्वल्य अभिमान असणारा हा माणूस संस्कृतीला आणि संस्कारांना एखाद्या घोरपडीसारखा घट्ट चिकटून बसला आहे. ‘ कौटुंबिक जिव्हाळ्याचं नाटक म्हणजे बाळ कोल्हटकरच !’ हे समीकरण आहे. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून खूप जणांनी कौटुंबिक जिव्हाळ्याची नाटकं बेतली; पण बाळ कोल्हटकरांच्या नाटकांची सर कुणाच्या नाटकाला आली नाही. कुणीही कितीही नावं ठेवली तरी बाळ कोल्हटकरनी स्वत:चा एक ठसा उमटवला आणि त्यांच्या नाटकांचा एक मोठा प्रेक्षकवर्ग तयार केला, हे सत्य कुणालाही नाकारता यायचं नाही. त्यांच्या नाटकांचं साहित्यिक मूल्य, प्रायोगिक मूल्य, आर्थिक यश, लोकप्रियता यांची चर्चा करण्याच्या भानगडीत मला पडायचं नाही; पण एका ठराविक ध्येयानं जवळजवळ दोन डझन नाटकं लिहिणारा हा नाटककार, नट आणि निर्माता म्हणून पण यशस्वी झाला, हे तर खरं.

अशा कलावंताकडे सांगण्यासारखं खूप असेल म्हणून एक दिवस त्यांच्याकडे जाऊन टपकलो. गप्पा नेहमीप्रमाणे रंगल्या. मला काही फारसं सांगायचं नव्हतं. नुसती प्रश्नांना सुरुवात करायची होती......

¤

: बाळासाहेब, तुमचं शिक्षण कुठपर्यंत झालं ?

: मॅट्रिकपर्यंत, म्हणजे मॅट्रिक पास नाही. खरे, तुम्हाला माहीत नाही, मी एक वाह्यात, फुकट गेलेला मुलगा होतो. घरच्यांनी माझी आशा सोडली होती. इंग्लिश चौथीपर्यंत मी व्यवस्थित होतो. पुढं एका मित्राच्या संगतीनं मला मिसळ खायचा नाद लागला आणि तो नाद पुढं इतका वाढला की, तो पुरा करण्यासाठी मी नेमानं माझी अभ्यासाची पुस्तकं विकत असे. ॲलजिब्रा-जॉमेट्री...पैसे कमी पडले की पुस्तक विकायचं. मग अभ्यास करायला पुस्तकंच नसायची. मग मी मित्रांकडून पुस्तकं उसनी आणायचो आणि त्यावर आपलं कव्हर चढवायचं; पण त्यानं काय होणार ? अभ्यास बोंबलला ! आई नेहमी म्हणायची, ‘ अरे तू सांगशील ते करून खायला घालते ’; पण ती सवय काही सुटली नाही. मग एक खोटं लपवण्यासाठी दुसरं खोटं ही सवय लागली आणि त्यातनंच कुठं तरी नाटकाचं वेड लागलं.

: पण आपण नाटक लिहावं असं केव्हा वाटलं ?

: तुम्हाला सांगितलंच, मी फुकट गेलेला मुलगा होतो. मला एकदा

कोंडून ठेवलं होतं. त्या खोलीत शेंगांची पोती होती. मी आरामात शेंगा खात होतो. इतक्यात तिथं एक पुस्तक पडलेलं सापडलं. श्री. कृ. कोल्हटकराचं 'वधूपरीक्षा'. मी ते वाचून काढलं आणि डोक्यात विचार आला, या कोल्हटकरांचं छापलं जातं; मी पण कोल्हटकर. मग माझं का छापलं जाऊ नये ? शिवाय आपला स्वत:चा छापखाना आहे !

: आपला स्वत:चा छापखाना म्हणजे ?

: वा ऽ ! आमचा छापखाना होता. अजून आहे. 'महाराष्ट्र मित्र' म्हणून एक नियतकालिकही त्यात छापलं जायचं. त्यात 'झारच्या डायरीतली पाने' या सदराखाली चुरचुरीत राजकीय लेखन यायचं. पुढं अच्युत बळवंत कोल्हटकर यांनी संदेशमध्ये याच प्रकारचं लेखन केलं.

: बाळासाहेब, तुमचं जे शिक्षण पूर्ण झालं नाही किंवा तुम्हाला मिसळ खाण्याचा नाद लागला तर मग घरचे संस्कार...

: हे पहा शिक्षणाची जरी मी हेळसांड केली, तरी माझ्यावरती संस्कार जबरदस्त होते. आमची पिढी संस्कारांच्या बाबतीत भाग्यवान ! आपला देश, धर्म, संस्कृती यावर प्रेम करायला, त्याचा अभिमान बाळगायला आम्हाला शिकवलं. देशभक्ती श्वासोच्छ्वासाइतकी अपरिहार्य होती. एकदा मी रस्त्यातून गुणगुणत जात होतो. 'भाव धरा अपुलासा देव करा रे' एका वृद्ध गृहस्थानं मला थांबवलं आणि सागितलं, 'बाळ, भाव धरा अपुलासा देश करा रे' असं म्हण. मला आठवतं, झाशीच्या राणीचा पोवाडा ऐकताना, एकीकडे पेशन्स खेळणारे माझे वडील डोळे पुसायला लागायचे.

: मग पहिलं नाटक केव्हा लिहिलं ?

: इंग्रजी सहावीत असताना. 'जोहार' नावाचं तीन अंकी नाटक लिहिलं.

: काही आठवतं का त्यातलं ?

: मध्यवर्ती कल्पना सांगतो. आपला पराभव होणार हे दिसायला लागल्यावर गडावरच्या राजपूत स्त्रिया जोहार करायचं ठरवतात; पण एक विनोदी पात्रांची जोडगोळी नाना युक्त्या-प्रयुक्त्या करून शत्रूचा बेत उधळून लावते. शत्रू माघार घेतो. ही आनंदाची बातमी घेऊन ते दोघे गडावर येतात; परतु उशीर झालेला असतो. शेवटच्या राजपूत स्त्रीनं–राजकन्येनं–जोहार केलेला असतो.

: वा ऽ त्या वयातसुद्धा नाटक म्हणजे काय ते समजलं होतं !

: माझी नाटकंच्या नाटकं पाठ होती. शिवाय चिंतामणराव कोल्हटकराचे संस्कार होते. चिंतामणरावांची 'बळवंत नाटक मंडळी' मी जवळून पाहिली आहे. त्यांची शिस्त आणि दरारा मी पाहिला आहे. दिनकर कामण्णासुद्धा चिंतामणराव येत आहेत म्हटल्यावर विडी विझवायचे ! चिंतामणराव राष्ट्रीय विचारांनी भारलेले होते. सुसंस्कार आणि देशप्रेम यासाठी त्यांनी रंगभूमी राबवली. दीनानाथ उत्कृष्ट गायक नट होते; पण गडकऱ्यांची भाषा पेलणं किंवा सावरकरांची भाषा समजणं इतकी मराठी भाषेची जाण चिंतामणरावाना होती, जशी ती दीनानाथना नव्हती.

: शिक्षण सोडल्यानंतर मग काय एकदम नाटकात शिरलात ?

: छे छे ! रेल्वेत चिकटलो टी. सी. म्हणून. नोकरी फर्स्टक्लास होती. सवलती होत्या. दिवसाला वीस-पंचवीस रुपये 'खायला' मिळायचे. कमाई भरपूर. चैन केली. कपडे लॉन्ड्रीत टाकायला नकोत म्हणून नवीन कपडे विकत घेत असे मी !

: मग इतकी 'छान' नोकरी सोडलीत का आणि केव्हा ?

: नोकरी सोडली १५ ऑगस्ट ४७ या दिवशी. देश आणि मी एकदम स्वतंत्र झालो! काय झालं, पहिली गोष्ट मला पार्सल-कचेरीत टाकलं. कमाई बंद आणि काम कंटाळवाणं. त्या वेळी हॅन्डरसन स्टेशनमास्तर होता. माझी रात्रपाळी होती. ती पार्सलं उतरवून मोजून घ्यायची खिटखिट कोण करणार ? मी ते दुसऱ्याला सांगायचो. एक दिवस वॉचमन सांगत आला की, दोन तुपाचे डबे चोरीला गेले आणि ते एका पोलिसानंच चोरले ! त्याचं नाव वनेश. मी स्टेशनमास्तरला सागितलं; पण त्यानं सल्ला दिला, तू पाहिलं नाहीस तर उगाच पोलिसाचं नाव गोवू नकोस! म्हणून त्याचं नाव न गोवता मी रिपोर्ट केला. पुन्हा एकदा दोन तुपाच्या डब्याची चोरी करताना तो पकडला गेला आणि त्यानं पोलीसकस्डडीत आत्महत्या केली ! त्यात माझी काही चूक नव्हती; पण ते मनाला खूप लागलं. तसंच एकदा कुणी तरी प्राध्यापक रावनं प्लॅटफॉर्मवर फेऱ्या घालता घालता मला म्हणे पार्सलमधली सफरचंदं खाताना पाहिलं आणि तक्रार केली. खोटी. मला एक्झामिनेशनकरता हॉस्पिटलमध्ये पाठवलं. तिथं त्यांनी मला ओकारीचं औषध दिलं. इतकं की शेवटी शेवटी माझ्या ओकारीतून रक्त यायला लागलं; पण काही मिळालं नाही! त्यानं क्लीन रिपोर्ट दिला; पण मी एकूण या साऱ्या प्रकाराला वैतागलो आणि ठरवलं यापुढं नोकरी करायची नाही! सोडून दिली. मी नोकरी सोडून दिल्याचं कळताच चिंतामणराव कोल्हटकरानी मला सांगितले, रेल्वेची नोकरी सोडून नाटकात शिरणार असशील तर यापुढं माझ्या घराची पायरी चढायची नाही; पण त्याच चिंतामणरावानी पुढं माझी 'एकच प्याला' मधली तळीरामची भूमिका पाहून मला त्यांच्या कंपनीत बोलावलं !

: मग नोकरीत जमवलेले पैसे उपयोगी पडले असतील?

: कुठले काय ! ते केव्हाच 'सत्कारणी' लागले होते.

: म्हणजे ?

: नोकरीत असताना नाटक आणलं की स्टेजवर!

: म्हणजे तुमचं पहिलं नाटक ?

: हो 'घर कुणाचं ?' म्हणून. त्याचं काय झालं, नाटकाचं वेड डोक्यात होतच. थोडेफार पैसे जमले होते. म्हणून वि. वि. बोकील, यांना चांगलं नाव होतं. मी आणि चित्तरंजन त्याच्याकडे गेलो. त्यांनी ॲडव्हान्सची रक्कम इतकी मोठी मागितली की त्यात चार नाटकं काढता आली असती. शेवटी मी स्वत.च नाटक लिहिलं अगदी निखळ कौटुंबिक विनोदी. '३५ मे' म्हणून पिरोज आनंदकर यांची एक कथा होती त्यावरून. त्यात चित्तरंजन, बबन नावडीकर, दीनानाथ टाकळकर असे आम्ही होतो. १९४६ सालची ही गोष्ट. आम्हाला दामूअण्णांचं 'उधार उसनवार' होतं; पण तरीही आम्ही थोडेथोडके नाही आठ प्रयोग केले. मनमोहन नातू यांचं मला पत्रही आलं होतं. त्यात त्यांनी लिहिलं होतं, 'तुमच्यात यशस्वी नाटककाराचे गुण दिसतात!'

: हे नाटक कुठं प्रकाशित झालेलं नाही ?

: कसलं प्रकाशित आणि कसलं काय ? त्याचं चोपडंही मिळत नाही. पुढं जयराम शिलेदारांनी ते गोपीनाथ सावकारांकडं रेकमेंड केले.

तिथे ते 'अखेर जमलं' म्हणून आलं. त्यानंतर माझं 'कुठं आहे देव' म्हणून ध्रुवावरचं नाटक आलं. ते सुद्धा अप्रकाशित आहे.

: कुणी काढलं ते ?

: गोपीनाथ सावकारांनी. त्यात चित्र-रेखा...

: 'लाखाची गोष्ट' मधल्या ?

: हो. त्या काम करायच्या. ते नाटक पाहताना डॉ. जी. एम. फडकेसारखा मोठा माणूस अक्षरश: रडत होता मी खलास झालो ! वाटलं, आपलं कुठं तरी चुकतंय. या मोठ्या माणसांना रडविण्याकरता का मी नाटक लिहायचं ? पण शिलेदार आणि गोपीनाथ सावकार यांनी माझी समजूत घातली. त्या दिवशी मी कोडगा झालो. मला समजलं, नाटकाचा धंदा करायचा असेल तर आपल्या आवडत्या माणसांनासुद्धा रडायला लावणारं लिहिता आलं पाहिजे.

: बाळासाहेब, तुम्ही कुठल्या कंपनीत अशी नोकरी नाही केली ?

: केली ना. गोपीनाथ सावकारांच्या कंपनीत मी होतो.

: पगारी का ?

: हो...... मला वाटतं, जेऊन-खाऊन ७०–८० असेल! १९४९-५० मध्ये नारायणराव ... बालगंधर्वांच्या कंपनीत होतो. मी नानांचा पी. ए. कम मॅनेजर होतो. तळीराम, अक्षपाल, शकुनी अशी कामंही करायचो. इंग्रजी जाणणारा मॅनेजर म्हणून माझा रुबाब होता. लायसेन्स काढायचे. डोअरकीपर व्हायचो. इतकंच नाही तर टांग्यातून लाउडस्पीकरवरून जाहिरातही करायचो. तोंड सारखं लपवून!

: तोंड लपवून का ?

: रात्री नाटकात काम करायचो, त्यामुळं लाज वाटायची. खरे, तुम्हाला सांगितलं तर खोटं वाटेल. देवरूख-अंगिवलं इथे आदित्य नाटक समाज नावाची कंपनी होती. तिथे मी तब्बल पंधरा दिवस होतो. त्या कंपनीत मी मानापमानमध्ये धैर्यधरचं काम केलं होतं. गाण्यासकट !


: बाप रे !

: ते सगळंच 'बाप रे !' होतं. मेणबत्तीवर मेकप करायचा. शेराच्या झाडाचा चीक लावून किंवा पंक्चरचं सोल्यूशन लावून मिशा चिटकवयाच्या असा सगळा प्रकार होता. त्या कंपनीत प्रधान नावाचे तबलजी होते. ते मला देशबंधू कंपनीत घेऊन गेले. त्यांना माझं 'मुंबईची माणसं' नाटक आवडलं. झालं, प्रधान आणि मी फिरायला बाहेर पडलो. प्रधान म्हणाले, 'चला सोडा पिऊ या !' त्या दिवशी प्रधानांनी माझ्या नकळत मला सोड्यातून दारू दिली. बाहेर पडल्यावर रबराच्या रस्त्यावरून चालतोय असा मला भास होत होता. तशात मालकांनी घरी बोलावलं. गेलो. म्हणाले, चला या नाटकाची गाणी करू या. नाही कसं म्हणायचं ? बसल्या बैठकीत गाणी केली. मागाहून मालकांनी अण्णा काळसेकरला कप आणायला सांगितले. म्हणाले, थोडीशी दारू पिऊ या. मी सांगितलं 'मी घेत नाही.' 'काय सांगता; तोंडाला वास तर येतोय.' पुन्हा घेतली. दारूचा तिरस्कार करणारा मी त्या दिवसापासून दारू घ्यायला लागलो. मला असं वाटतं कुणी फसवून पाजली नसती तर मी आपणहून दारू कधीच घेतली नसती.

: दारू घेतल्यामुळं एका बैठकीत गाणी लिहून झाली ?

: असं नाही मला वाटत.

: मद्य पिऊन लिहायला मूड येतो का तुम्हाला ?



शिवराय कविभूषणच्या भूमिकेत बाळ कोल्हटकर

: मला लेखनासाठी मद्य घ्यावं लागत नाही. लेखनाला बसण्यापूर्वी किंवा लिहिताना मी कधी मद्य घेत नाही. शौचकुपाच्या पावलांनी मी सरस्वतीच्या मंदिरात जात नाही !

: तुम्ही जे आपल्या नाटकांतून प्रेक्षकाना रडवता ...

: मी तुम्हाला मघाशीच सांगितलं, नाटकचा धंदा करायचा असेल तर प्रेक्षकांना रडवायला हवं; पण मी रडवतो ते चांगली पात्रं रंगभूमीवर आणून. १९५५ ची गोष्ट. माझ्या लग्नासाठी नागपूरला माझे सारे नातेवाईक जमले होते. नागपूरला 'एखाद्याचं नशीब' या नाटकाचा प्रयोग होता. तो सर्वांना दाखवला. नाटक संपल्यावर माझ्या मोठ्या वहिनींनी विचारलं, भाऊजी, या नाटकातल्यासारख्या सगळ्या वहिनी वाईट असतात का हो ?' त्या दिवसापासून चांगली पात्रं रंगभूमीवर आणून लोकांना रडवायचा अभ्यास सुरू केला आणि त्यात मी यशस्वी झालो.

: तुम्हाला महाराष्ट्राचा 'छोटा गडकरी' ही पदवी कुणी दिली ?

: पंडित महादेवशास्त्री जोशी यांनी 'दुरितांचे तिमिर जावो' या नाटकाच्या १०० व्या प्रयोगाला, आणि पुढं यशवंतराव चव्हाणांनी 'वेगळं व्हायचंय मला' या प्रयोगाच्या वेळी.

: तुम्हाला या पदवीविषयी काय वाटतं ?

: काय वाटतं म्हणजे ?

: म्हणजे संकोच वाटतो ... ? की अभिमान ?

: मला संकोच पण वाटत नाही, अभिमान पण वाटत नाही. मला काहीच वाटत नाही. मला नाटककार म्हटलं तरीसुद्धा मला त्याचं दुःख नाही; पण मला कुणी 'नट' म्हटलं नाही तर त्याचं खूप दुःख होतं. मी मुळातला नट आहे. नाटककार मी अपघातानं झालो.

: म्हणजे तुम्ही जन्मजात नट ?

: नाही. तोही अपघातच. तुम्हाला एक गंमत सांगतो. साहित्य संघाच्या खुल्या रंगमचावरच्या नाट्योत्सवात 'सवाई माधवरावाचा मृत्यू बसवलं होतं. दिग्दर्शक होते माधवराव टिपणीस. वसंत शिंदे मला तिकडे घेऊन गेले. त्यात मला तेलंगी भटजीची भूमिका मिळाली. तालमी झाल्या. प्रयोगाच्या दिवशी मी जेव्हा रंगमंचावर उभा राहिलो तेव्हा एवढा प्रेक्षक-समुदाय मी आयुष्यात प्रथमच पहात होतो. भीतीनं माझे हातपाय थरथर कापायला लागले आणि

ह्यातातल्या पळीपंचपात्रीचा खणखण आवाज व्हायला लागला. लाउड स्पीकरमधून तो मोठ्यानं यायला लागला. प्रेक्षकांना समजलं आणि कडकडून ' उलटी ' टाळी आली. मला वाटलं ही मला दाद आहे. मी थरथर कापणं तसंच चालू ठेवलं आणि प्रेक्षक बुचकळ्यात पडले ! त्याना वाटलं हा माझा अभिनय आहे. पुन्हा कडकडून, पण या वेळेला 'सुलटी' टाळी आली. पुढं मग माझं काम मी व्यवस्थित निभावलं !

: असाच आणखी एखादा अपघात ?

: झाला! आणि मी वक्ता झालो. नादेडला मला व्याख्यानाकरता विचारलं. मी दणकून हो म्हटलं. विषय – मराठी रंगभूमी. हॉल भरला. शेवटी व्याख्यान खुल्या मैदानावर घ्यायचं ठरलं. समोरचा श्रोतृवर्ग पाहून मी हबकलो. माझी पहिलीच वेळ. माईक हातात घेतला आणि पहिलं वाक्य म्हटलं, एवढ्या अफाट जनसमुदाया-समोर प्रथम बोलताना वक्त्याची काय अवस्था होते हे जाणून घ्यायचं असेल तर माझ्या पायजम्यातल्या पायांना विचारा ! लोक हसले आणि धीर चेपला. पुढं पावणेदोन तास मी मूर्खासारखा बोलत होतो आणि लोक शहाण्यासारखे हसत होते !

: बाळासाहेब, तुमच्या नाटकात आदर्शवाद इतका असतो, असं वाटतं की, समाजाला आदर्शत्वाचे धडे देण्याकरता तुम्ही नाटकं लिहिता.

: लिहितोच ! मी स्वत: आदर्श नसेन म्हणून मला आदर्शाची ओढ आहे, त्याचा ध्यास आहे. आपला देश, आपला धर्म, आपली संस्कृती यांचा मला जाज्वल्य अभिमान आहे. जगात याहून श्रेष्ठ दुसरं काही नाही असं मी मानतो. माझा धर्म असा आहे ज्याला जन्मदाता नाही, ज्याला प्रचारक आहेत.

: उद्या सारं जग बुडलं तरी महाराष्ट्र शिल्लक राहील ! कारण आमच्या मातीचा रंग काळा आहे. जगाचा पहिला रंग काळा, अंधाराचा, त्यातून प्रकाश जन्माला आला. मला माझ्या मातीचा अभिमान आहे ! आमच्या पिढीवर तसे संस्कारच केले गेले; पण आमची पिढी नालायक निघाली. पुढच्या पिढीवर आम्ही संस्कारच केले नाहीत !

: म्हणून तुम्ही ते नाटकाद्वारे करू इच्छिता ?

: हो. नाटक हे शैक्षणिक माध्यम म्हणूनच वापरलं गेलं पाहिजे.

: हे करायला प्रेक्षकाचं मानसिक वय काय समजता तुम्ही ?

: फक्त नऊ वर्षं. म्हणजेच संस्काराचं वय.

: म्हणजे नाटकामुळं समाज सुधारतो किंवा बिघडतो असं तुम्ही समजता की काय ?

: एक मुलगा सुधारला तरी मला चालेल. लोकांवर संस्कार करण्याकरता हे माध्यम वापरायचं हे माझं ' मिशन ' आहे.

: मग तुमची आदर्श नाटकाची व्याख्या तरी काय ?

: ज्यात प्रबोधन, शिक्षण, संस्कार व रंजन नाही ते नाटक नाही. नाटक समुदायाला आवडलं पाहिजे. ज्या नाटकातल्या प्रत्येक वाक्याला, प्रेक्षक स्वत:ला विसरून अभिनय करतो ते उत्तम नाटक !

: बाळासाहेब, तुमच्या नाटकात पावलोपावली काव्य येतं. काव्यमय भाषा येते. मग तुम्ही आजपर्यंत पारंपारिक संगीत नाटक का नाही लिहिलं ?

: माझे संवादच संगीतमय असतात. त्याला चाल लावून गायलं नाही म्हणून काय झालं ? शिवाय संगीत नाटक चालवणं म्हणजे काय दिव्य आहे याचा मी गंधर्व, शिलेदार, सावकार यांच्या कंपनीत अनुभव घेतलाय. शिवाय मला स्वत:ला गाता येत नाही, हेही एक कारण.

: हो, तेही एक आहेच. कारण तुम्ही स्वतःच्या कंपनीकरता स्वत:ला डोळ्यांपुढं ठेवून नाटकं लिहिता; पण त्यामुळं तुमच्या लेखनाला मर्यादा नाही पडत ? कारण एखादी भव्य-दिव्य व्यक्तिरेखा तुमच्या व्यक्तिमत्त्वाला शोभणारी नसली तर त्यावर नाटक लिहिणं तुमच्या डोक्यातच येणार नाही ?

: असं कसं म्हणता ? ' सीमेवरून परत जा ! ' हे नाटक नाही. मी लिहिलं ? श्रीकांत मोघे त्यात होते. मला स्वत:ला भूमिका हवी असते. कारण मी नट आहे. मुख्य भूमिका पाहिजे असा माझा अट्टाहास नसतो आणि नाटक लिहिताना त्यातली प्रत्येक भूमिका मला करायची असते अशा भावनेने मी लिहितो. नट म्हणून मी स्वत:ला निरनिराळ्या भूमिकांतून कागदावर पसरवतो आणि मग नाटक लिहितो. ते संवाद पात्र बोलायला लागली की माझं नाटक बोलायला लागतं.

: म्हणजे तुम्ही नाटकाचा आराखडा तयार करता ?

: मला आराखडे करता येत नाहीत. माझे फक्त अंकाचे ड्रॉप्स ठरलेले असतात आणि शेवट सुचल्याशिवाय मी नाटक लिहीत नाही!

: तुमच्या नाटकांत ज्या काव्यमय कल्पना येतात त्या तुम्ही प्लॅन करून घालता ?

: नाही. एखादी झपाटणारी कल्पना डोक्यात आली की, ती मी नोट करून ठेवतो आणि ती कुठल्या तरी नाटकात आपोआप येते. मी अट्टाहासानं ती आणीत नाही. दुसरं मी एक सांगतो, नाटककाराची लेखनाची जागा म्हणजे ऑर्गनवाला बसतो ती जागा. कान प्रेक्षकाकडे पण डोळे नटांकडे. नाटक लिहिताना ही जाण मला असते.

: नट आणि दिग्दर्शक यांचा नाटकाच्या यशात भाग किती असतो ?

: असतो. पण नाटकामुळं नट मोठा व्हायला पाहिजे. नटामुळं नाटक मोठं झालेलं मला चालायचं नाही आणि माझं मत तर असं आहे नाटककाराइतका चांगला दिग्दर्शक असूच शकत नाही !

: बाळासाहेब, पूर्वीचं ठीक होतं. तालीममास्तर म्हणजेच दिग्दर्शक होते. आता रंगभूमि खूप पुढं गेली आहे. नवीन तंत्रं आली आहेत. नुसते संवाद कसे म्हणायचे ते सांगून नाही भागत.

: तसं काही फार मोठं झालेलं नाही. पूर्वीसुद्धा तंत्र वगैरे प्रकार होते आणि ते वापरले जात असत.

: तरीसुद्धा सगळेच नाटककार दिग्दर्शक नाही होऊ शकणार तुमचं एक ठीक आहे. तुम्ही निदान नट आहात ! पण ज्यांनी फक्त नाट्यलेखन केलं त्यांचं काय ? बरं ते असो.

: बाळासाहेब, मला एक माहीत आहे. चिंतामणराव कोल्हटकर यांच्याविषयी तुम्हाला अतोनात आदर आहे. त्यांच्याकडून तुमच्यावर नट म्हणून काय संस्कार झाले ?

: चिंतामणरावांनी मला बोलायला शिकवलं. मी स्टेजवरती अतिशय खोटं, कृत्रिम असं बोलत असे. जेव्हा त्यांनी माझं भावबंधनमधलं कामण्णाचं भाषण ऐकलं तेव्हा त्यांनी सांगितलं " तू सारं कृत्रिम बोलतो आहेस. माझ्या आवाजात बोलतो आहेस तू माझ्यासारखं बोल; पण स्वत:च्या आवाजात बोल. नटानं दिग्दर्शकाच्या आवाजात बोलणं ही अतिशय मोठी चूक. " " हे मी जसं चिंतामणरावांकडून शिकलो तशा अनेक गोष्टी शिकलो. " माझे गुरु तीन चिंतामणराव कोल्हटकर, केशवराव दाते, गणपतराव बोडस आणि काही न शिकवता खूप शिकवून गेलेले माझे गुरु बालगंधर्व. तसा मी भाग्यवान आहे !

: बाळासाहेब, दुरिताचे तिमिर जावो, वेगळं व्हायचं मला, दुर्वांची जुडी वगैरे नाटकांनी तुम्हाला भरपूर यश दिलं; पण 'वाऱ्यात

मिसळले पाणी ' हे साफ पडलं. कारण काय ?

तुम्हाला खरं कारण सांगू ? प्रयोगाच्या आधी २ दिवस मुख्य नटानं काम करायला नकार दिला. सहा प्रयोग ॲडव्हान्स-मध्येच 'फुल' झाले होते. प्रयोग रद्द कसे करायचे ? आयत्या वेळेला त्या भूमिकेत दीनानाथ टाकळकराना उभं केलं. सहा महिने तालमी घेऊन जवळजवळ पन्नासहजार नाटकासाठी खर्च केले होते. पहिल्या प्रयोगाला पहिला अंक व्यवस्थित पार पडला त्यानंतर मी एक मूर्खपणा केला. पहिल्या अकानंतर मी जाहीर केलं की, अशा अशा कारणामुळ अमुक एक नट दोन दिवसांत आम्ही उभा केला आहे. तर प्रेक्षकांनी असंच पुढील दोन अकी सांभाळून घ्यावं. हे सांगायची खरं तर गरज नव्हती झाल दुसरा अंक सुरू झाला. काका केणींना छोटा गंधर्व यांचा प्लेबॅक होता. गाण सुरू झालं. कुणी तरी टेपरेकॉर्डरची वायर काढली. गाण ऐकू येईना आणि काका केणी ओठ हलवताहेत. प्रेक्षकानी नाटक उचललं. मग ते संवादासवादाला उचलायला लागले. नाटक पडलं. मला अजून आठवतं, ती प्रेक्षकांतून आलेली कॉमेन्ट. " बाळघा, भडव्या पैसे टाक ! " नाटक संपलं, भरत नाट्य मंदिराच्या मी पायरीवर बसलो होतो. कमळाबाई फडकेंनी मला सांगितलं अप्पासाहेब तुमची वाट पहात आहेत. अप्पासाहेब मला भेटले.

: त्यांनी मला सांगितलं यशस्वी व्हायचं असेल तर अपयश पचवायला शिकावं लागतं. हे अपयश पचवा सारं विसरा आणि दोनतीन दिवसानी मला हसतमुखान भेटायला या ! "

: मला धीर आला. मी पूना गेस्ट हाउसवर जाऊन शांतपणे झोपलो. दुसऱ्या दिवशी कळलं पहाटे चारला अप्पासाहेबांनी फोन केला होता. मी जागा आहे का झोपलोय तो चौकशी करायला.

: मला आठवतय अप्पासाहेबांनी तुमच्या दुरितांचे तिमिर जावो या नाटकाला झोडपलं होतं. 'कशाचा कशाला मेळ नाही ', वगैरे ...

: हो ऽ पण तरीही त्यांचं माझ्यावर प्रेम होतं. एकदां मी त्याना या संदर्भात विचारलं की तुम्ही इतकं का झोडपलंत ? त्यांनी सांगितलं " मला प्रत्येक पानाला पन्नास रुपये मिळाले आणि वाईट लिहा असं सांगण्यात आलं होतं "

: तुमच्या नाटकांवर जी टीका होते त्यांनी तुम्ही अस्वस्थ होता ?

: मला टीकेची पर्वा नाही. मी टीकेनं अस्वस्थ होत नाही. माझं काम नाटकं लिहिणं, टीकाकाराच काम टीका करण. मी माझं काम करतो. त्यानी त्याच काम करावं. मला टीकेचं वाईट वाटत नाही. मला दुःख होतं ते कुणी अनुल्लेखानं मारलं तर. बरं, वाईट तुम्ही काही लिहा, पण लिहा.

: कलावंताच्या चारित्र्याविषयी तुमचे काही आदर्श असतीलच.

: कलावंताच चारित्र्य रंगभूमीपुरतच मर्यादित नाही. आपण बदनाम होण्याची भीति असते तेव्हा कलावंतानं समाजात जाऊ नये. प्रकाशात उभं राहून अंधारात बसलेल्या प्रेक्षकांचं मनोरजन करणाऱ्यांनी अंधारात करायच्या गोष्टी प्रकाशात करायच्या नसतात. माझ्यावरती तसे संस्कार आहेत. तुम्ही मला वाटल्यास प्रतिगामी म्हणा पण मी कोणत्याही परिस्थितीत माझी बायको दुसऱ्यानं उपभोगली तरी मला चालेल असं म्हणणार नाही. त्यापेक्षा मी कुठं तरी कमी पडलो म्हणून आत्महत्या करीन !

: एक कलावंत म्हणून तुमच्या कलाजीवनात ज्या स्त्रिया आल्या त्यांच्यासंबंधी तुम्हाला काय म्हणायचंय ?

: माझा शारीरिक संबंध कुणाशीही आला नाही. व्यवसाय म्हणून जेवढी जवळीक लागते तेवढीच जवळीक मी ठेवली.

: मी त्यांच्याकडे 'पालक' म्हणूनच पाहिलं. आता कुणी माझ्याकडे 'मालक' म्हणून पाहिलं तर माझा दोष नाही आणि हे भूषणानं सांगण्यात स्त्री बदनाम होते आणि स्त्रीला बदनाम करणं माझ्या संस्कारात बसत नाही.

: तुमच्या संस्कार–नाट्यांच्या स्पर्धेत आता हिट ॲन्ड हॉट नाटकं येत आहेत. त्याच्याविषयी तुम्हाला काय वाटतं ?

: रस्त्यावरची वस्ती वाढली आहे म्हणून त्या वस्तीसाठी नाटकं लिहिली जात आहेत आणि अशा वेळेला 'घरा 'ची नाटकं लिहिणं आवश्यक आहे. झोपडपट्टीतल्या लोकाना 'घर' म्हणजे काय हे दाखवलं पाहिजे. झोपडपट्टीतली, समाजातली घाण कसली दाखवता?

: पण समाजाचं किंवा एखाद्या प्रश्नाचं वास्तव चित्रण करायचं म्हणजे...

: घाणच दाखवायला पाहिजे का ? किती आणि काय दाखवायचं याला मर्यादा आहेत. घाण दाखवणारा मनुष्य देशद्रोही समजतो मी ! जेव्हा चार वर्षांची मुलगी बापासमोर येते तेव्हा तिलासुद्धा काय झाकायचं ते समजतं आणि आमच्या चाळिशीच्या नाटककारांना काय झाकावं आणि काय दाखवावं ते समजू नये ?

: उद्या तुम्ही झोपडपट्टीचं नाटक लिहिलंत तर काय दाखवाल ?

: मी जर झोपडपट्टीवर नाटक लिहिल तर त्यातसुद्धा मी तुळशीवृंदावनाची पूजा करणारी स्त्री दाखवीन आणि खिशात पैसे नसलेल्या तिच्या भावाला ती भाऊबिजेला सांगेल की, भाऊराया, दोन पैसे जरी ओवाळणी घातलीस तरी चालेल; पण भाऊबिजेला माझी ओवाळणी चुकवू नकोस वगैरे वगैरे.

: कल वत सतत बाहेरगावी असल्यामुळं, नाटकात अडकल्यामुळे त्याच्या पत्नीला मानसिक, शारीरिक आणि आर्थिक त्रास नाही होत ?

: उलट स्त्री ही जास्त समर्थ बनते माझं सगळं जे काही आहे ते पत्नीच्या नावावर आहे. माझे सगळे व्यवहार ती बघते. माझा सगळा पत्रव्यवहार ती करते. चारित्र्याच्या बाबतीत नवऱ्याचा प्रामाणिकपणा बायकोला पटला पाहिजे की, मग नवऱ्यालाच तिचा आधार वाटतो.

: धंद्यातलं यश हे तुम्हाला कोणत्या कारणानी मिळालं ?

: माझे भागीदार श्री. मुकुंद निमकर हे मला भेटले. व्यवहारी, सडेतोड आणि प्रामाणिक माणूस त्यामुळं आमचं छान जमलंय. माझं एक लिहिलेलं नाटक, त्यानी काही फारसा उत्साह दाखवला नाही वाचल्यावर, मी ते गुंडाळून बासनात ठेवलं.

: बाळासाहेब, तुम्हाला इतकं यश मिळालं, सर्वार्थांनी. तुम्ही अगदी तृप्त, संतुष्ट असाल; की एखादी खत, एखादं दुःख तुमच्या मनाला त्रास देत ?

: एक घाव फार जबर बसलाय. माझा नऊ वर्षांचा मुलगा प्रकाश अकाली गेला ! स्वतःच्या मुलाला खांदा द्यायचं दुःख ज्यानं भोगलंय त्याच्या आयुष्यात भोगायला याहून मोठं दुःख उरतच नाही.

☐

बघता बघता बाळासाहेबाचे डोळे पाणावतात. कंठ दाटून येतो. भडभडा बोलणारे त्याचे शब्द मुके होतात. मैफलीत जीवघेणी स्तब्धता उरते.

आणि माझ्या लक्षात येतं आता मला निदान या क्षणी या माणसाला पुन्हा बोलतं करता यायचं नाही आणि बोलायचं म्हटलं तरी मलाही पुढं बोलता यायचं नाही ! ☐



# अणुबॉम्बची भयानकता

डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

आपण सारेच जण तसे ग्रेट आहोत. लोकशाहीने आपणाला जे धमाल अधिकार दिलेत त्याचे आपण कमाल उपयोग करतो. प्रत्येक विषयात आपले स्वतःचे असे एक स्वयंसिद्ध मत असते. ते मत आपण आग्रहाने सांगतो. कोणत्याही विषयात आपले मत तसे जरूर असावे. ते आपोआप किंवा सहजपणे बनलेले नसावे; पण नेमके असेच घडते. आता भारताने अणुबाँब बनवावा की बनवू नये हा तसा केवढा महत्त्वाचा प्रश्न; पण बायकोने बाजारातून कोणती भाजी आणावी हे आपण जेवढ्या सहजपणे तिला सांगतो तेवढ्याच सहजपणे या विषयावरचे आपले मत आग्रहपूर्वक नोंदवून आपण नेहमी मोकळे होतो.

### ....म्हणजे विधवेचे कुंकू

आपलीही तशी काही चूक नसते. पाकिस्तान अणुबाँब बनविणार हे समजल्यावर आपण भावनाप्रधान बनलेले असतो. 'अणुबाँबशिवाय स्वातंत्र्य म्हणजे विधवेने लावलेले कुंकू' म्हणून सांगणारे वीर सावरकर आपणासमोर असतात. अणुबाँबला 'कागदी वाघ' म्हणून हिणवतात, गुप्तपणे त्याचा विकास करून चीनला अणुबाँबसंपन्न बनविणारा महामानव माओ आपणाला आठवतो. पोखरणला अणुशक्तीचे दर्शन घडविणारे भारतीय शास्त्रज्ञ आपणाला आठवतात. त्यांना लगाम लावणाऱ्या शासकांवर आपण मनापासून चिडतो.

खरे पाहता पोखरणला भारताने जो स्फोट केला त्या वेळी जगभरचे काही फार मोठे शास्त्रज्ञ आणि विचारवंत असेच अस्वस्थ झाले होते. भारताने जे काही पोखरणला केले ते अणुबाँबपेक्षा गुणात्मकदृष्ट्या फारसे वेगळे नाही हे आपले मत त्या शास्त्रज्ञांनी तेव्हा नोंदवले. साऱ्या जगभर अणुबाँबला प्राणपणाने विरोध करणारी एक चळवळ फोफावते आहे. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, जपान यांची गोष्ट सोडा; अगदी रशियातसुद्धा या चळवळीने मूळ धरलंय. फार मोठ्या सभा होतात. मोठी निदर्शने होतात. अणुबाँबची महाभयानकता सांगत; वाटेल ती किंमत मोजून अणुबाँबवर अगदी एकतर्फी बंदी घाला म्हणून हे जनसमूह सांगतात. त्यात फार मोठे शास्त्रज्ञ आणि विचारवंतही आहेत. तुमच्या-माझ्यासारखी सर्वसामान्य माणसे सुद्धा आहेत.

हे घडणे आहे ते असेच घडणार आहे किंवा असेच घडले पाहिजे हे अणुबाँब निर्माण करणाऱ्या शास्त्रज्ञांनी पूर्वीच सांगितले होते. आइनस्टाइनसारखा शतका-शतकांतून जन्म घेणारा शास्त्रज्ञ म्हणाला होता, 'विसाव्या शतकाच्या पूर्वार्धाने जगाला गांधी आणि अणुबाँब दिलेत. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धाला यातील कोणाला आपण स्वीकारणार आहोत ते ठरवावयाचे आहे!' रुदरफोर्डने सांगितले होते, 'अणुबाँब विरुद्ध मनुष्यजात असे एक महाभयानक युद्ध आता सुरू झालंय. या युद्धात तुम्ही कुणाच्या बाजूने आहात ते तुम्हाला ठरवायचंय.' हे फार मोठे शास्त्रज्ञ व फार मोठे लोकशाहीवादी होते. हा निर्णय शेवटी त्यांनी तुमच्या-माझ्यावर सोपवलाय. जगाच्या इतिहासात येवढा मोठा निर्णय यापूर्वी मनुष्यजातीला कधी घ्यावयास लागला नव्हता असे त्याचे मत आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जगत असल्याने आपणावर एक फार मोठी इतिहासदत्त जबाबदारी पडली आहे.

आपण कोणताही निर्णय घ्यावयास मोकळे आहोत; पण त्यापूर्वी अणुबाँबला विरोध करणारे लोक काय म्हणतात हे आपण समजावून घेतले पाहिजे. तसे पहावयाचे तर अणुयुद्ध झाले तर पाच-दहा मिनिटांत सारी पृथ्वी नाहीशी होईल, हे वापरून गुळगुळीत झालेले वाक्य आपण अनेक वेळा वापरतो; पण जे घडणार आहे ते यापेक्षा अनेक पटींनी महाभयंकर आहे. नरकाची कल्पना मांडणाऱ्यांना ज्या कल्पना स्वप्नातही सुचल्या नसत्या अशा गोष्टी प्रत्यक्षात उतरणार आहेत. तुम्ही, मी, तुमची, माझी पोरेबाळे कोणत्याही क्षणी त्यांची

# आइनस्टाइन म्हणाला होता–
# विसाव्या शतकाच्या पूर्वार्धाने
# महात्मा गांधी दिले
# आणि अणुबाँब दिला.
# विसाव्या शतकाच्या उत्तरार्धाला
# यातील एकाला निवडावे लागेल.

# आपण कोणाला निवडणार ?



वा इतर कोणाची काहीही चूक नसताना त्यात बळी पडणार आहेत !

आज जगात किमान पन्नास हजार अणुबाँब आहेत. हिरोशिमा. नागासाकी येथे फोडलेले बॉम्स त्यांच्यासमोर खेळण्यातले बॉम्स वाटावेत अशी त्यांची विध्वंसक-शक्ति आहे. हिरोशिमा आणि नागासाकी येथे फोडलेले अणुबॉम्स अनुक्रमे प्रत्येकी दहा आणि वीस किलो टन 'टी. एन. टी.' एवढ्या शक्तीचे होते. टी. एन. टी. म्हणजे 'ट्रायनायट्रो टोल्युइम' हा रासायनिक पदार्थ. एक टन 'ट्राय नायट्रो टोल्युइन' जी विध्वंसक शक्ति निर्माण होते त्याला एक टन टी. एन. टी. असे म्हणतात. किलो टनम्हणजे हजार टन म्हणजे नागासाकी येथे फोडलेल्या अणुबाँबची विध्वंसक शक्ती वीस हजार टन टी. एन. टी. येवढी होती. आज अणुबाँब निर्माण करणारे असल्या मामुली आकड्यात बोलत नाहीत. मेगॅटन हा नवा मापक आज वापरला जातो, एक मेगॅटन म्हणजे दहा लाख टन आजच्या अणुबाँबची विध्वंसक शक्ती किमान शंभर-दोनशे मेगॅटन टी. एन. टी. एवढी असते. हे बॉम्स काय करतील हे समजावून घ्यावयाचे असेल तर प्रथम हिरोशिमाला काय झाले हे आपण समजावून घेतले पाहिजे. त्या वेळी प्रसिद्ध झालेले वेगवेगळे अनुभव नुसते ओझरते नजरेखालून घालवयाला दगडाचे काळीज लागते!

'डेथ इन लाइफ–सरव्हायवर्स ऑफ हिरोशिमा' या आपल्या पुस्तकात डॉ. रॉबर्ट जे लिफ्टन म्हणतो,


'शहराच्या मध्यभागी, १८०० फूट उंच हवेत बाँब फुटला त्या जागेपासून तीन किलोमीटर अंतरावरील घरे, शाळा, बाजारपेठा, रुग्णालये, झाडून सारे काही पत्त्यांच्या बंगल्यांप्रमाणे कोसळून पडले आणि पिसाट आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. तीन ते पाच किलोमीटर अंतरातील निम्म्याहून अधिक इमारती जमीनदोस्त झाल्या ! जवळजवळ नव्वद हजार इमारती नाहीशा झाल्या. स्फोटातून बाहेर पडलेल्या आगीच्या धगीमुळे माणसे कापरासारखी जळून गेली. तुम्ही स्फोटापासून किती अंतरावर होता व त्या वेळी तुम्ही कोणते कपडे घातले होते, यावर हे जळणे अवलंबून होते. कोसळणाऱ्या इमारती आणि स्फोटामुळे बंदुकीच्या गोळ्याप्रमाणे इमारतीतून बाहेर उडणाऱ्या काचा आणि धातूचे तुकडे जिवंत व मृत माणसांच्या अंगात रुतून बसले.

अडीच लाख वस्तीच्या या शहरातील एक लाख लोक या बाँबने मरून गेले. त्यांपैकी सुमारे पंचवीस हजार कापरासारखे जळाले होते. सुमारे पन्नास हजार कोसळणाऱ्या इमारती आणि उडणारे धातूचे तुकडे यांचो शिकार बनले होते. होणाऱ्या किरणोत्सर्गाने वीस हजार लोक मेले होते.

## हिचकॉकचा ठोका चुकेल

जे लोक भाग्यवान होते ते मेले होते ! उरलेल्यांना नरकात काय नसेल ते पुढील चोवीस तासांत समजू लागले.–बसलेला मानसिक धक्का मामुली होता. शरिरात झपाट्याने बदल होऊ लागले. डोक्याचे आणि पापणीचे केस गळून पडले. शेंगांची टरफले निघतात तशी हातापायांची नखे खाली आली. भूक नाहीशी झाली होती. मळमळत होते आणि रक्ताचे जुलाब सुरू झाले होते. दिवस जात होते. शरीराची कातडी, डोळे, तोंड, मूत्रपिंड प्रत्येक ठिकाणातून रक्त बाहेर पडू लागले. ओठ, घसा, तोंड यांची विलक्षण आग होत होती. शरीरातील हाडे लाकडाचा भुसा व्हावा अशी कोलमडून पडत होती... भाग्याची गोष्ट एवढीच की, मरण लांबणीवर टाकावयास भोवताली डॉक्टर्स आणि औषधे नव्हती. मरण लवकर येणार होते !

हिरोशिमामध्ये जे घडले ते एखाद्या वार्ताहराने टिपावे त्या पद्धतीने 'हिरोशिमा' या आपल्या पुस्तकात जोन हेरसे यांनी नोंदवलंय.



याचा अपराध कोणता ?

त्यांनी टिपलेली चित्रे वाचताना हिचकॉकच्या काळजाचा ठोका चुकेल. तो म्हणतो,

'त्या सुंदर बागेच्या ठिकाणी अजूनही काही झुडपे उभी होती. ती झुडपे होती की, जळून गेलेला एखादा वटवृक्ष होता हे मला काहीच समजले नाही. आम्ही सारेच बधिर झालो होतो. झुडुपात अस्ताव्यस्त वीस माणसे पडलेली होती. त्या सर्वांचे चेहरे संपूर्ण जळलेले होते. डोळ्यांच्या ठिकाणी फक्त खाचा होत्या. ओठ सुजलेले होते. ओठांतून आणि डोळ्यांतून ओघळणारा पू साऱ्या तोंडावर पसरला होता. शरीरावर झालेल्या जखमांत मुंग्या आणि माशा पसरल्या होत्या. या प्रलयात माशा आणि मुंग्या जगल्या होत्या. त्या वीसही माणसांचे हात अगतिकपणे हलत होते; पण ते हात त्या माशा व मुंग्यांना दूर करण्यासाठी हलत नव्हते, तर काही फुटांवर पाण्याचे एक डबके होते ते सारे हात त्या पाण्यापर्यंत पोचण्यासाठी त्या दिशेने यांत्रिकपणे हलत होते. आमच्याबरोबर असलेल्या फादर क्लिनसोर्जे (Kleinsorge) याने खटपट करून गवताची काडी मिळवली. त्याने त्या काडीने त्या माणसांना गंगाजळ दिले....फादर क्लिनसोर्जे म्हणतो, 'माझ्या आयुष्यात इतर कोणतीही गोष्ट केल्यावर मला एवढे समाधान मिळाले नव्हते !'

या विषयावर आणखीही खूप पुस्तके आहेत. या अग्निप्रलयातून वाचलेल्या लोकांच्या आठवणी संकलित करणारे 'अनफरगेटेबल फायर' हे पुस्तक तर अलीकडे प्रसिद्ध झालंय. सकाळी आठ वाजून सोळा मिनिटांनी हिरोशिमावर बाँब फुटला. सव्वाआठपर्यंत सारे शहर कसे नेहमीच्या कार्यक्रमात मग्न होते. बाबा चहा घेत होते. छोटी मुले कपडे करून शाळेत जात होती. आई स्वयंपाकघरात गुंतली होती. आठ वाजून वीस मिनिटांनी शहरात उरली होती ती जळलेली प्रेते ! हाडांचा ढीग. जळालेल्या मांसाचा वास. ढिगाऱ्याखाली चेंगरलेली आणि होरपळून निघालेली माणसे ! लहान मुले आई-बाबांना आणि आई-बाबा मुलांना शोधत वेड्यासारखे ते ढीग उकरत हिंडत होते ! प्रत्येकाने नोंदवलेले अनुभव उलट्या काळजाच्या कसायाच्या डोळ्यांतून पाणी गाळणारे आहेत. किसिनो सेगवाने (Kikuno Segawa) एक तीन वर्षांची अर्धवट जळलेली मुलगी पाहिली. जळून मरून गेलेल्या आपल्या आईजवळ ती रडत बसली होती. आपल्या खेळण्यातील झारीने ती आईच्या तोंडात पाणी घालावयाचा प्रयत्न करत होती. किंझो निशीडा (Kinzo Nishida) आपल्या भयंकर जखमी झालेल्या बायकोला खांद्यावर घेऊन नाकाहिरो मांची (Nakahiro Manchi) या टेकडीपलीकडील नदीकिनाऱ्यावर पळत चालला होता. त्याच्या बायकोला नदीकिनारा फार आवडतो म्हणून ! वाटेत त्याला एक माणूस दिसला. तो संपूर्ण नागडा होता. वेदनेने कळवळत होता आणि स्वतःच्या डोळ्यांची बुबुळे त्याने आपल्या हातात धरली होती. मिकिओ इनौ (Mikio Inoue) याने प्रोफेसर टाकेनाका (Take-

## प्रश्न काही मिनिटांचा आहे.

'सर्वसामान्य माणसाला भयानकतेची कल्पना पूर्णपणे दिलेली नाही. रशियातून सोडण्यात आलेले अणुबाँबचे थवे तीस मिनिटात न्यूयॉर्क आणि बोस्टनवर येऊन कोसळू शकतील. समुद्रात ठेवलेल्या पाणबुड्यांमधून त्यांना पाठवण्यात आले तर ते फक्त पंधरा मिनिटात येथे पोचतील. अग्निबाणात बसून येणाऱ्या अणुबाँब विरुद्ध कोणत्याही स्वरूपाचे संरक्षक उपाय आपणाला माहीत नाहीत. – अशा स्वरूपाचे उपाय अजीबात उपलब्ध नाहीत हे विसरू नका आणि कोणत्याही कारणाने हे युद्ध एकदा सुरू झाले की त्याच क्षणी ते आपणा सर्वांच्या हाताबाहेर जाईल. युद्ध सुरू करावयास एकाकडून झालेली चूक पुरेशी आहे. मात्र ते थांबवावयास दोघांचे सहमत होण्याची जरुरी आहे ! एकदा सुरू झाले तर अणुयुद्ध थांबवताच येणार नाही!

—जेन ला रॉके
अमेरिकन आरमाराचा भूतपूर्व अॅडमिरल.

## अणुशक्ति आणि अणुबाँब

अणुशक्ति आणि अणुबाँब या वेगळ्या गोष्टी आहेत म्हणून सांगण्याचा हास्यास्पद प्रयत्न केला जातो. लोकांना सरळ सरळ फसवण्याचा एवढा मोठा प्रयत्न यापूर्वी झालेला नाही. अणूच्या विघटनातूनच अणुशक्ती निर्माण होते आणि या अणुशक्तीचा तर्कसंगत आणि सहज आविष्कार म्हणजे अणुबाँब. अणुबाँबला इतर अनेक गोष्टी लागतात म्हणणे म्हणजे माशाच्या गळाला लागणारा काटा बनवणाऱ्याने या गळासाठी दोरी, बांबू वगैरे इतरही गोष्टी लागतात असे म्हणण्यासारखे आहे. आपले युद्ध फक्त अणुबाँबबरोबरच नव्हे तर अणुशक्तीबरोबरच आहे हे आपण ओळखले पाहिजे.

—अमॉय लोविन्स
'फ्रेंड्स ऑफ अर्थ' या चळवळीचा प्रणेता
'फॉरिन अफेअर्स'मधील आपल्या लेखात.

naka) यांची कहाणी सांगितली आहे. त्या दिवशी प्रोफेसर टाकेनाका हिरोशिमा विद्यापीठात न जाता घरीच बसले होते. प्रचंड आघातांनी घर कोसळले. बायको आत सापडली म्हणून ते तिला ओढायला गेले. ते अशक्य होते. आग झपाट्याने पसरत होती. बायकोने जिवाच्या आकांताने सांगितले; 'तुम्ही तरी पळा!' त्यानंतर ते पळतच राहिले. पळणे थांबले त्या वेळी नग्नावस्थेत हातात भाताची मूद घेऊन ते मियुकी (Miyuki) पुलावर पाण्याकडे एक टक पाहात तासन तास उभे राहात. त्या संवेदनाक्षम प्राध्यापकाला भात आणि पाणी या मानवी संस्कृतीला वाचवू शकणाऱ्या प्रतिमा वाटत होत्या.–हात-पाय तुटलेल्या आणि डोके सुजलेल्या आपल्या तान्ह्या बाळांना घेऊन हिंडणाऱ्या आया अनेकांच्या मनावर कायमचा चरा उठवून गेल्यात ! श्रीमती ओगासावारा ( Ogasawara ) यांनी स्वतःचा अनुभव दिलाय. 'आई आणि छोटी बहीण यांच्याशी गप्पा मारत ती बसली होती. अचानक तिची शुद्ध गेली. शुद्ध आली त्या वेळी डोके बधिर होते. डोळयांसमोर गडद काळोख होता. भोवताली विव्हळणे आणि किंकाळया भरून उरल्या होत्या. माझ्या अंगावरचे कपडे फाटले होते. माझे घर, शेजाऱ्यांची घरे काहीच नव्हते. होते ते मातीचे आणि दगड-विटांचे ढिगारे ! माझी पंचेचाळीस वर्षांची आई 'आई आई' असे विव्हळत पाण्याच्या टबात पडली होती. मी तिला शुद्धीवर आणले त्या वेळी माझी पाच वर्षांची धाकटी बहीण इको (Eiko) हिच्या नावाने तिने वेडयासारख्या हाका मारावयास सुरुवात केली. खूप वेळाने आम्हाला इको आढळली. दगडा-विटांच्या ढिगाऱ्याखाली ती संपूर्ण चेंगरून गेली होती आणि क्षीण होत जाणाऱ्या तिच्या आवाजातून आई आई असा जप सुरू होता !'

या नरकयातनांत सापडलेल्या या साऱ्या लोकांचा, तुमच्या-माझ्याप्रमाणेच युद्धाशी काही प्रत्यक्ष संबंध नव्हता; पण तरीही, किमानपक्षी युद्धाला व अणुशक्तीला प्राणपणाने विरोध केला नाही,



**उद्या तुमची-आमची मुलेही अशी सैरभैर होतील !**

याची जिम्मेदारी, तुमच्या माझ्याप्रमाणे यापैकी अनेकांच्यावर होती.– पण त्या वेळी दूर अंतरावर आईच्या पोटात असलेले वा त्यानंतर तीन-चार वर्षांनी जन्म घेणारे चिमणे जीवही यातून सुटले नाहीत ! झालेल्या किरणोत्सर्गामुळे यातील अनेक मुलांच्या डोक्यांवर केस व बोटांना नखे नव्हती. त्यांचे वजन कमी होते. त्यांचे डोके फार लहान होते. ती मुले मंदबुद्धीची होती ! अणुबॉंबचा, किरणोत्सर्गाचा माणसाच्या जननशक्तीवर, जीवपेशीवर होणारा परिणाम एवढा भयंकर आहे की, 'ॲटम्स–विदिन अस (Atoms Within Us)' च्या लेखकाने म्हटलंय, अणुयुद्धाची घोषणा असेल 'झुरळांच्या संस्कृतीचा विजय असो !' कारण होणाऱ्या किरणोत्सर्गानंतर जगातील एकच लवचिक पेशी जगू शकेल–ती म्हणजे झुरळे !'

## तांत्रिक चूक

आज आपल्याकडे एवढे प्रगत संगणक (Computer) आहेत की, ते स्वतः निर्णय घेऊनच अणुबॉंब फेकतील. मानवी चुकांना वाव राहू नये म्हणून आपण हे केले आहे ! पण हे संगणक काही परिस्थितीत चुकीचा निर्णय घेणारच नाहीत याची आपणाजवळ खात्री नाही. आजपर्यंत हे झाले नाही म्हणून उद्या होणार नाही एवढेच आपण म्हणू शकतो. इतक्या थोड्या लोकांना, एवढ्या प्रचंड जनसमूहाशी वाटेल तसे खेळावयाचा अधिकार यापूर्वी मानवी इतिहासात केव्हाही मिळाला नव्हता !

– प्रसिद्ध शास्त्रीय लेखक **आयझॅक ॲसिमॉव**

## म्हातारा तर्क

– गेल्या पन्नास वर्षांत मी मेलो नाही म्हणजे पुढील पन्नास वर्षांतही मी मरणार नाही असे समजणे याला मी म्हातारा तर्क मानतो !

**– विनोबा भावे**

## अणुयुद्धाची महाभयानकता

सर्वसामान्य माणसाला अणुयुद्धाची महाभयानकता समजलेली नाही ही खरी शोकांतिका आहे. सर्वसामान्य अमेरिकन माणसाची जी कल्पना आहे त्यापेक्षा हे महाभयंकर असेल ! मानवी संस्कृतीचा नव्हे तर मानवजातीचा नाश होईल. युद्ध योग्य क्षणी आटोक्यात आणले तरी तुटपुंज्या साधनसामुग्रीसह जगभर विखुरलेल्या अवस्थेत हिंडणारे मध्ययुगीन माणसांचे काही जथे पृथ्वीवर उरतील. नुकताच केंब्रिजला अमेरिकेतील व ब्रिटनमधील शास्त्रज्ञ व वैद्यकीय डॉक्टरांचा दोन दिवसांचा एक परिसंवाद झाला. एकापाठोपाठ एक वक्ते नक्की काय होणार आहे याचे वर्णन करत होते. सर्वांचे एका गोष्टीवर एकमत होते. मानवजातीने अणुबॉंबला जरुरीपेक्षा जास्त काळ सहन केले आहे. आपण आता किती लवकर त्याला नाहीसा करू शकतो एवढेच आपणाला ठरवावयाचे आहे.

**–ली. लेसकाझे**

**यांच्या वॉशिंग्टन पोस्टमधील ११ फेब्रुवारी १९८० ला प्रसिद्ध झालेल्या लेखावरून.**

## बॉंब फुटला तर !

—पण हे सारे समजावयास राजकारणी पुरुष आणि त्याच्या हातातील प्यादी बनलेले शास्त्रज्ञ काही राक्षस नसतात ! अणुबाँबचा विकास करणाऱ्या आजच्या काही शास्त्रज्ञांनी आणि राजकारणी पुरुषानी पुढे माडलेले विचार राक्षसांचीही झोप उडवणारे आहेत ! हिरोशिमा आणि नागासाकीला माणसाना फार त्रास झाला. कारण बाँब फार कमी क्षमतेचा होता. मात्र आता बाँबची क्षमता हजारो पटीनी वाढलेली असल्याने नंतरच्या मरणयातना भोगावयास जवळपास कोणी जिवंत नसेल ! काही काळ, कदाचित दशके, संततीनियमन करून जगलेले लोक भावी पिढयात येणारे दोष टाळू शकतील म्हणू-नही सांगितले जाते. मात्र अणुबाँबला विरोध करणाऱ्या लोकांनी या विचारातील कमकुवतपणा पण दाखवून दिलाय. हिरोशिमाला जो बाँब फोडला होता त्यातून निर्माण होणाऱ्या धगीमुळे दोन मैल अंतरावरचे वर्तमानपत्राचे सारे कागद जळून जातील आणि पाच मेगॅटन क्षमतेच्या बाँबमुळे १० मैल अंतरापर्यंतचे सारे कागद भडका उडून जळतील. यापेक्षा तुलनात्मकदृष्टया होणारे परिणाम अधिक आहेत. होणारा किरणोत्सर्ग पृथ्वीवर वा पृथ्वीखाली उरलेल्या पाण्याला वा भुयारात लपलेल्या माणसानाही सोडणार नाही. आज ना उद्या जगलेला प्रत्येक माणूस या किरणोत्सर्गाची शिकार बनेल. काही काळापूर्वी अमेरिकेतल्या शास्त्रज्ञांनी एक शास्त्रीय गणित मांडले होते. 'न्यू इंग्लंड जर्नल ऑफ मेडिसिन 'मध्ये त्या गणितावर आधारलेले अनेक लेख नंतर प्रसिद्ध झाले होते. आजकालच्या क्षमतेच्या दृष्टीने वीस मेगॅटन शक्तीचा बाँब म्हणजे किस झाडकी पत्ती; पण हा असा एक बाँब 'बोस्टन' शहराच्या मध्यावर फुटला तर काय होईल याची ही आकडेवारी पहा. 'बाँब फुटला त्या जागी शेकडो फूट खोल आणि सुमारे अर्धा मैल व्यासाचा एक खड्डा तयार झाला. स्फोटाच्या जागेपासून चार मैल त्रिज्येच्या वर्तुळात आलेली कितीही मजबूत इमारत जमीनदोस्त झाली होती आणि याच विभागात बोस्टनमधील प्रमुख हॉस्पिटल्स्, दवाखाने आणि इतर सेवा आहेत. चार ते सहा मैल त्रिज्येच्या वर्तुळातील काही फार मजबूत इमारती वाचल्या आहेत. पंधरा मैल त्रिज्येच्या वर्तुळातील बहुतेक सर्व इमारती दुरुस्त करता येणार नाहीत इतक्या मोडल्या आहेत. स्फोटापासून वीस मैलांवर असलेल्या लोकांच्या अंगावरील कपडे पेटले होते उष्णतेमुळे कातडी जळाली होती. चाळीस मैल अंतरावरील लोकानी आवाजानी दचकून आकाशात पाहिले. त्यांनी पेटलेला सूर्य पाहिला आणि त्या तेजाने त्यांचे डोळे जळून ते आंधळे झाले ! स्फोटाच्या ठिकाणी निर्माण झालेला दाब येवढा प्रचंड होता की, ध्वनीच्या वेगापेक्षा अधिक वेगाने तो बाहेर फेकला गेला. त्यानंतर तासाला हजार मैलापेक्षा अधिक वेगाने वादळ उठले. लागलेल्या आगी त्यामुळे अधिक भडकल्या. वाचलेले लोक हवेत फेकले गेले. चार मैल त्रिज्येच्या वर्तुळात आलेले सात लाख एकोणचाळीस हजार लोक केव्हाच संपले होते; पण या चाळीस मैल त्रिज्येच्या वर्तुळातील आणखी पंधरा लाख लोक मरण पावले होते. मरणाऱ्या लोकांची एकूण संख्या बावीस लाख येवढी होती ! शास्त्रज्ञाच्या दृष्टीने फार छोटेखानी असलेल्या फक्त एका बाँबने अमेरिकेची एक टक्का लोकसंख्या संपली होती !

जगलेल्या लोकांच्या मरणाला सुरुवात झाली होती. बोस्टन विभागात असलेल्या सात हजार डॉक्टर्सपैकी फक्त ९०० डॉक्टर्स वाचले होते. जखमी डॉक्टरांचे वाचलेल्या जखमी माणसाशी असलेले प्रमाण एका डॉक्टरला सतराशे लोक येवढे आहे. प्रत्येक डॉक्टरने दिवसातून सोळा तास काम केले, प्रत्येक रोग्यावर फक्त पंधरा मिनिटे

## अणुयुद्ध आणि आपण......

अमेरिकन सरकार आपल्याला अणुयुद्धाच्या महाभयानकतेबद्दल काही फारसे सांगत नाही म्हणून बिघडत नाही. एक छोटासा अभ्यासू, कर्तव्यनिष्ठ गट काय करू शकतो हे आपण आज पाहतो आहोत. हॉरवर्ड आणि बोस्टनचे काही शास्त्रज्ञ आणि वैद्यकाय डॉक्टर्स यांनी स्थापन केलेला हा गट मार्च १९७९ पासून कार्यमग्न आहे. सभा, भाषणे, वृत्तपत्रांमधून लेख, रेडिओ व दूरदर्शनवर मुलाखती हे यांचे कार्यक्रम आहेत. प्रश्नाचा संपूर्ण शास्त्रीय अभ्यास आणि तर्कसंगत वादविवाद ही दोन या गटाजवळची अमोघ शस्त्रे आहेत. आपल्या गटाला हे लोक 'सामाजिक जिम्मेदारी समजणारे डॉक्टर्स' (Physicians for Social Responsibility) असे म्हणतात. न्यूयॉर्क टाइम्समध्ये या गटाने रशियाचे प्रेसिडेंट व अमेरिकन प्रेसिडेंट या दोघांना एक पत्र लिहिले होते. अमेरिकन प्रेसिडेंटनेच नव्हे तर प्रेसिडेंट ब्रेझनेव्हनीसुद्धा त्यांना आश्वासनात्मक पत्र पाठवले. विशेष म्हणजे रशियन वृत्तपत्रांनी या पत्राला खूप प्रसिद्धी दिली आणि असंख्य वाचकांनी प्रतिसाद दिला. चळवळ जोर धरते आहे...

—जोनान लिओनार्ड (Jonathan Leonard)
यांच्या हॉरवर्ड मॅगझिनच्या डिसेंबर १९८० च्या
अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखावरून.

## आपण नपुसंक आहोत

तुम्ही, मी, रस्त्यातले आपण सारेचजण नपुसंक आहोत. ही अणुबाँबची व राज्य करणाऱ्याची खरी ताकद आहे ! आपल्यापैकी काहीजण संपूर्ण अज्ञानी आहेत. काय होईल हे त्यांनी समजावून घेतलेले नाही. समजावून घेतलेल्यापैकी काहीजण जे होणार ते होणारच आहे असे मानून गप्प बसणारे दैववादी आहेत. काहीजण येवढे घाबरले आहेत, येवढे बधिर झाले आहेत, इतके अगतिक झाले आहेत की, आपण याविरुद्ध काहीच करू शकणार नाही असे समजून ते गप्प बसले आहेत. आपण सारे एकत्र येऊन एक प्रचंड चळवळ उभी केली पाहिजे ..पिढयानपिढया राबून उभी केलेली आपली संस्कृती...सारी मानवजात इतक्या गलिच्छ आणि अगतिकपणे चार बेवकूफ राजकारणी माणसांमुळे नाहीशी होणार आहे. चळवळीचा जोर वापरून आपण या माथेफिरू लोकाना वठणीवर आणू !

एरिक चिव्हिअन (Eric Chivian)
'हॉरवर्ड येथील डॉक्टर, फिजिशिअन
फॉर सोशल रिसपॉन्सिबिलिटी'
या चळवळीतील एक कार्यकर्ता.

दिली तरी रोग्याला पुन्हा तो दोन–तीन आठवड्यांनी पाहू शकणार होता. त्याच्याकडे औषधे नव्हती. या जखमांना औषधे कोणती हे पण त्याने अनुभवलेले नव्हते......सर्वांत महत्त्वाचा प्रश्न दोन-तीन दिवसात भेडसावू लागला. आरोग्याला घातक असलेले आणि ज्यांची सावलीही आपणावर पडणे धोकादायक आहे असे लक्षावधी मुडदे कसे नाहीसे करावयाचे हे कळेनासे झाले होते. अहवाल पुढे म्हणतो की, प्रश्न असे आणि इतके आहेत की, त्यावर विचार करणेही शक्य नाही !'

### हे कधी समजेल ?

आणि म्हणूनच अणुबाँबला विरोध करणारे लोक या भाषेत आज विचार करावयास तयार नाहीत. कॉलऱ्याची एक साथ आली. एक गाव उजाड झाले. एका गावात साथ आल्यावर इतके डॉक्टर्स आणि इतकी औषधे लागली. शंभर गावांत साथ आल्यावर किती डॉक्टर्स आणि किती औषधे लागतील याचा आपण आज विचार करत नाही. कॉलरा होणार नाही याची काळजी घेण्यासाठी कॉलऱ्याच्या जंतूंचा बीमोड केला पाहिजे, त्यांना खतम केले पाहिजे हे आपण सारे मानतो. अणुबाँबलाच बळी दिला पाहिजे, कायमचा गाडला पाहिजे हे आपणाला का समजत नाही ? देवीच्या रोगाने माणसाला होणारा त्रास पाहून आपण हळहळतो आणि जागतिक पातळीवर त्याचे उच्चाटन करतो. मग अणुबाँबचे उच्चाटन करणे आपणाला कठीण का वाटते ? अणुबाँबच्या स्फोटानंतर जे होणार आहे ते कॅन्सरपेक्षा अनेक पटीनी भयंकर आहे. कॅन्सरप्रमाणेच त्याच्यावरही उपाय नाही. अणुबाँबचे जंतू कायमचे नाहीसे करावे येवढेच आपल्या हातात आहे.

अमेरिकेने अणुबाँबवर अगदी एकतर्फी बंदी घालावी असे म्हणणारा एक फार मोठा विचारवंत म्हणाला होता, 'अमेरिकेने अशी बंदी घातली तर अमेरिकेचे स्वातंत्र्य कदाचित नाहीसे होईल; पण मानवी समाज वाचेल. अमेरिकेतील वा जगातील कोणत्याही देशाला वा माणसाला, कोणताही हुकुमशहा वा कोणताही 'वाद' कायमचा गुलाम बनवू शकणार नाही. कारण मानवी मनातील स्वातंत्र्याची उपजत प्रेरणा येवढी प्रबळ असते की, आज, उद्या, काही दशकांनी शतकांनी हे 'वाद' आणि हे 'हुकुमशहा' गाडून मानवी स्वातंत्र्य पुन्हा उफाळून बाहेर येईल. व्यक्तिस्वातंत्र्याची हिरवळ पुन्हा सर्वत्र पसरेल; पण कोणत्याही कारणाने का होईना पण एकदा अणुयुद्ध सुरू झाले तर कोटयवधी वर्षांनंतरही या पृथ्वीवर पुन्हा मनुष्यप्राणी दिसणार नाही !'

'विसाव्या शतकाच्या उत्तरार्धाने गांधी आणि अणुबाँब यातील एकाला निवडावयाचे आहे' या विधानावर आपण येथे परत येतो गांधीचा अध्यात्मिक वारसा सांगणाऱ्या एका संताने पुरीच्या संमेलनात सांगितले होते, 'एका निर्जीव, चैतन्यहीन परमाणूत केवढी प्रचंड ताकद असते हे अणुबाँबने जगाला दाखवलंय. एका निर्जीव चैतन्यहीन परमाणूत जर एवढी प्रचंड ताकद असेल तर एका चैतन्य परमाणूत, जिवंत विचारात, व्यक्तिव्यक्तीच्या अंत.करणात असलेल्या जिवंत श्रद्धेत केवढी प्रचंड ताकद असेल ! या ताकदीवर विश्वास असलेले लोक जगातील कोणत्याही पाशवी शक्तीचा बंदोबस्त करू शकतील.'

या शक्तीवर विश्वास असलेले लोक संघटित कसे होणार आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले मत आग्रहपूर्वक व उपयुक्तपणे कसे नोंदवणार हे ठरावण्याची आज कधी नव्हे येवढी निकड आहे. मानवी इतिहासातील तो निर्णायक क्षण आता आपल्या समोर येऊन उभा ठाकलाय. उद्या कदाचित् फार उशीर झालेला असेल ! कुणी सांगावे आणखी काही सेकंदांनी, तुम्ही, मी, आपण कोणीही, डोळ्यांची बुबुळे तळहातावर घेऊन, प्रेताचे खच तुडवीत आपल्या जिवलगांना शोधत असू ! □

---

अणुबाॅबची भयानकता या डॉ. दत्तप्रसाद दाभोळकराच्या लेखाच्या निमित्ताने अणुशक्ती व अणुबाॅब या विषयावर सर्वांगांनी अधिक चर्चा होण्याची गरज आहे.

डॉ. दाभोळकराच्या लेखाने अणुशक्तीच्या विध्वसकतेची कल्पना येते. या निमित्ताने काही प्रश्न आम्ही समोर ठेवत आहोत.

- □ अणुशक्ती आणि विध्वंसकता यांचं जोडलेलं नातं एकांगी आहे का ?
- □ शांततेसाठी अणुबाॅब या धोरणात काही विरोधाभास जाणवतो का ?
- □ विसाव्या शतकात अणुशक्ती हीच निर्णायक शक्ती ठरणार असेल तर भारत आणि इतर अविकसित देशांनी अणुबाॅब बनवणे आवश्यक नाही का ?

या प्रश्नाच्या अनुरोधाने अणुशक्तीबाबतचे तुमचे स्वतंत्र विचार लेखाच्या स्वरूपात आम्हाला हवे आहेत.

शब्दमर्यादा – १००० ❋ लेख पाठविण्याची अंतिम मुदत – १५ सप्टेंबर १९८२

## अणुबाॅब विरुद्ध माणूस – या लढ्यात तुम्ही कोणाच्या बाजूने उभे रहाणार ? ?

---

# ‘छोडो भारत’ आंदोलन :

# सशस्त्र की अहिंसक?

प्रा. ह. म. घोडके

‘ऑगस्ट १९४२ ! चलेजाव चळवळीच्या काळात भारतीयांनी ब्रिटिश सत्ताधाऱ्याविरुद्ध ठिकठिकाणी केलेल्या स्वयंस्फूर्त, सशस्त्र क्रांतिकारी उठावाचे तेजस्वी स्मरण ! ७ जून १९४२ ह्या दिवशी महात्मा गांधीनी निराशेने असे उद्‌गार काढले होते की, ‘परकीय सत्ता झुगारून देण्यासाठी अहिंसक शक्ती ह्या देशात निर्माण व्हावी, म्हणून मी प्रदीर्घ काळपर्यंत वाट पाहिली. आता माझा संयम संपला आहे. इथून पुढे अशी वाट बघत रहाणे मला परवडण्यासारखे नाही.’ १४ जुलै १९४२ ला काँग्रेसच्या वर्किंग कमिटीने इंग्रजांना बजावले — ‘भारताला स्वातंत्र्य देण्यात केवळ भारताचे हित आहे, असे नाही, तर त्यात सर्व मानवजातीचे कल्याण आहे जगातील नाझी, फॅसिस्ट आणि साम्राज्यवादी शक्ती निकालात काढण्यासाठी भारताला स्वातंत्र्य देण्याची गरज आहे.’ इंग्रजांना समजावण्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ झाल्यानंतर काँग्रेसने ‘चले जाव’ आंदोलनाची घोषणा दिली. हे आंदोलन पूर्णतः अहिंसक असेल, पूर्वीच्या आंदोलनापेक्षा ते सर्वस्वी वेगळे असेल, स्वातंत्र्यासाठी दिलेला तो शेवटचा संघर्ष असेल. प्रत्येक भारतीयाने ह्या लढ्यात ‘करेंगे या मरेंगे’ असा दृढनिश्चय करून उडी घ्यावी, असे आवाहन काँग्रेसने केले होते.

स्वातंत्र्यासाठी दिलेली शेवटची झुंज अशी घोषणा काँग्रेसने दिल्यानंतर ब्रिटिश सरकार थोडेच गप्प बसणार ! तालुका पातळीपासून ते राष्ट्रीय पातळीवरच्या सर्व लहानथोर काँग्रेसी नेत्यांना ८ ऑगस्ट १९४२ ला,सरकारने पकडले व तुरुंगात डांबले ! ‘हे आंदोलन अहिंसक ठेवण्याचा मी आटोकाट प्रयत्न करीन; पण त्यात मला यश येईलच ह्याची खात्री देता येत नाही.’ असे गांधीजींनी अगोदरच घोषित केले होते. ह्या चळवळीच्या काळात हिंसाचाराचे प्रचंड थैमान माजणार ह्याची पूर्वकल्पना गांधीसारख्या थोर लोकनेत्याला असली पाहिजे. कदाचित ह्या अहिंसक चळवळीवरचा काँग्रेसी नेत्यांचा उडत चाललेला विश्वासही वरील घोषणेत असावा. थोडक्यात १९४२ च्या काळात जी प्रचंड हिंसा झाली, त्याची जबाबदारी गांधीजींनी अगोदरच झटकून टाकली.

गांधीजी आणि त्यांच्या अनुयायांना अटक झाल्यानंतर १९४२ च्या आंदोलनाचे स्वरूप पूर्णतः बदलले. ‘क्रांती’ ह्या शब्दाने वर्णन केलेला ह्या उठाव पूर्णपणे अहिंसक पद्धतीने चालावा अशी गांधीजींची धारणा होती; पण तसे घडले नाही. हे आंदोलन हिंसक बनत गेले. वीस वर्षांपासून जनतेच्या कानीकपाळी ओरडून जे अहिंसेचे तत्त्वज्ञान पटवून दिले गेले होते, ते १९४२ च्या काळात लोकांच्या स्मरणशक्तीतून असे अचानक का उडाले ? गांधीच्या तत्त्वज्ञानाला भारतीय जनतेने आणि काँग्रेसी नेत्यांनी दोन दशकापासून प्रामाणिकपणे सोबत केली होती. ते असे मागे का पडले ? हे आंदोलन हिंसाचारी का बनत गेले ? गांधी तत्त्वज्ञानाची जादू त्या वेळी ओसरली होती का ? काँग्रेसी नेत्यांच्या दबावामुळे जे लोक आतापर्यंत संयमाने वागत आले, ते नेते कारागृहात बंद झाल्यानंतर, सशस्त्र क्रांतिकारकांच्या मागे कसे गेले ? ह्या आंदोलनाने अनेक प्रश्न निर्माण केले. ४२ च्या आंदोलनाचे स्वरूप हा आजही इतिहासकारांमध्ये एक वादाचा विषय आहे. काँग्रेसी पठडीतील सरकारी इतिहासकार ह्या घटनेचा जो अर्थ काढतात, तो इतर काही इतिहासकारांना मान्य नाही. ऑगस्ट क्रांतीमध्ये एक गोष्ट निःसंशयरीत्या सिद्ध अशी होते की, ह्या आंदोलनाला मार्गदर्शन करणारा ऐसा कोणीही नेता नव्हता. सर्व नेते तुरुंगात अडकल्यामुळे प्रत्येक स्वातंत्र्यप्रेमी भारतीय माणूस स्वतः नेता बनला. त्याच्या विवेकशक्तीला जे काही सुचेल, जे काही करणे त्याला जमेल, परवडेल, ते त्याने केले. खऱ्या अर्थाने हे आंदोलन हे लोकआंदोलन ठरले. स्वातंत्र्याची ऊर्मी जेव्हा सामान्यातील सामान्य माणसाच्या मनामध्ये निर्माण होते, तेव्हाच स्वातंत्र्य मिळू शकते. स्वातंत्र्याच्या लढ्याला एखाद–दुसऱ्या नेत्याचे मार्गदर्शन तसे आवश्यक असते; पण ही स्वातंत्र्याविषयीची असलेली निसर्गदत्त भावना जोपर्यंत गुलाम मनोवृत्तीच्या लोकांमध्ये स्फुरण पावत नाही, तोपर्यंत त्या नेत्यांचा सर्व आटापिटा व्यर्थ ठरतो. १९४२ च्या ‘छोडो भारत’ आंदोलनाने लोक इतके पेटले होते की, नेत्यांनी त्यांना दिलेली अहिंसेची शपथ ते पूर्णपणे विसरून गेले.

## नेहरूंचा अंदाज

ह्या आंदोलनाच्या काळात भारतातील जनतेने २५० रेल्वे स्थानके नष्ट केली. ५५० पोस्ट–ऑफिसांवर हल्ले केले. त्यापैकी पन्नास पोस्ट–ऑफिसे त्यांनी जाळून भस्मसात केली आणि २०० पोस्ट–ऑफिसाची बऱ्याच मोठ्या प्रमाणावर हानी केली. ३५०० ठिकाणी टेलिफोनच्या तारा तोडून टाकल्या. देशातील सत्तर पोलिसठाणी त्या काळात उध्वस्त झाली. ही आकडेवारी पहाता ‘चले जाव’ आंदोलन अहिंसक होते, असे कोणीही म्हणणार नाही. स्वातंत्र्य मिळवू पाहणाऱ्या भारतीय जनतेवर ब्रिटिशांनी ह्या आंदोलनाच्या काळात फार मोठ्या प्रमाणावर दडपशाही केली. आंदोलन जितके उग्र तितका सरकारी दडपशाहीचा वरवंटा क्रूरपणे सर्वत्र फिरणार; हे अपेक्षित होतेच. सरकारी आकडेवारीनुसार एकूण १०२८ लोक ४२ च्या आंदोलनात मारले गेले आणि ३२०० जखमी झाले. पंडित नेहरूंनी मनुष्यहानीचे जे आकडे दिले आहेत, ते ह्या सरकारी आकड्यांपेक्षा किती तरी पटीनी मोठे आहेत. नेहरू म्हणतात की; ‘लोकांच्या अंदाजानुसार २५,००० स्वातंत्र्यप्रेमी भारतीय ह्या आंदोलनात सरकारी दडपशाहीला बळी पडले. हा आकडा अतिरंजित मानला तरी कमीत कमी १०,००० लोक ह्या स्वातंत्र्यसंग्रामात कामी

आले असावेत, असे मला वाटते.' तसेच ह्या काळात इंग्रज सरकारने ६०,२२९ लोकांना अटक केली. २६,००० लोकांवर खटले भरून त्यांना वेगवेगळ्या शिक्षा दिल्या व १८००० लोकांना विनाचौकशी तुरुंगात डांबून ठेवले. सशस्त्र क्रांतीची नशा चढलेल्या भारतीय जनतेने अहिंसा, संयम ही गांधीवादी विचारसरणी १९४२–४३ मध्ये पूर्णपणे बाजूला सारली. भारतीय जनतेने थोड्याशा अतिरेकी उत्साहात पोलिस आणि सरकारी अधिकाऱ्यांचे खूनही पाडले. त्यातील काही कृत्यांची आजदेखील आपल्याला लाज वाटेल; पण क्रांतीच्या त्या उधाणात अशी काही बरीवाईट कृत्ये घडतातच! गिलोटीनमुळे फ्रेंच क्रांतीचे कधी अवमूल्यन झाले नाही, उलट त्या कत्तलीचे समर्थन करण्याचीच प्रवृत्ती फ्रान्समध्ये दिसते. ह्या सर्व हिंसाचाराच्या गदारोळात एक गोष्ट प्रामुख्याने नजरेत भरते. उत्पादनाची जी कारखाने–गिरण्यांसारखी साधने होती, त्यांना मात्र लोकांनी इजा पोहोचविली नाही. कारखाने आणि गिरण्या लोकांच्या स्वयंस्फूर्त संपामुळे बंद होत्या. कोणत्याही मजूरसंघटनेने संपाचा आदेश दिलेला नसताना हे कारखाने बंद पडले होते, हे विशेष मानावे लागेल.

१९४२ च्या आंदोलनात देशातील तरुणांच्या सशस्त्र क्रांतिकारक संघटना पुन्हा एकदा आघाडीवर आल्या. सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने देश स्वतंत्र होऊ शकेल अशा श्रद्धा असणाऱ्या क्रांतिकारकांनी आपला हिंसक मार्ग फारसा फलदायी ठरत नाही, हे पाहिल्यावर काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता; पण सविनय कायदेभंगाच्या चळवळीनंतर गांधीजी पुढे जवळजवळ दहा वर्षांपर्यंत जनतेला जहाल कार्यक्रम देऊ शकले नाहीत. त्यामुळे ह्या क्रांतिकारक ( काँग्रेसी ) तरुणांचा भ्रमनिरास झाला होता. धड दहशतवादी संघटनामध्ये त्यांना स्थान नव्हते व काँग्रेसमध्येही ते फारसे प्रकाशात येऊ शकले नाहीत. अशा त्रिशंकुवत बनलेल्या तरुणानी देशभर दहशतवादी कारवाया सुरू केल्या. आपल्या लाडक्या नेत्यांना तुरुंगात डाबून टाकले, म्हणून लोकही संतापलेले होतेच. ते 'चले जाव' आंदोलनाच्या काळात सशस्त्र क्रांतिकारकांच्या मागे गेले. अनेक हिंसक कारवायात क्रांतिकारकांना लोकांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळाला. जाळपोळ, लुटालूट, खून–कत्तलीचे देशभर पेव फुटले.

हे आंदोलन १९४२ च्या सप्टेंबरपर्यंत ऐनजोमात होते. १९४३ च्या जानेवारीपर्यंत हे आंदोलन टिकले. पुढे मात्र ह्या आंदोलनाचा जोर ओसरला. ह्या चळवळीमध्ये झालेल्या हिंसाचारामुळे हे आंदोलन गांधींना अभिप्रेत होते तसे अहिंसक राहिले नाही. सरदार पटेलांनीही ती गोष्ट मान्य केली आहे. दहशतवादाला ह्या काळात चांगले दिवस आले. लोकानी संतापून जाऊन वेडेचार केले, अशी कडक टीका गांधींनी केली. अहिंसेचे कंकण बांधलेल्या गांधीजींनी सशस्त्र क्रांतिवादाची निंदा करावी, ह्यात काहीच आश्चर्य नाही. जीवनमरणाचा संघर्ष म्हणून घोषणा केलेले हे आंदोलन काँग्रेसी नेत्यांनी नीट चालविले नाही, त्यासाठी कसले पूर्वनियोजन केले नाही, अशी कडवट टीका डॉ. रमेशचंद्र मुजुमदारासारख्या थोर इतिहासकाराने केली आहे. 'करेंगे या मरेंगे', 'ब्रिटिश साम्राज्यशाहीला शेवटचा धक्का' ह्या शब्दांनी वर्णन केलेल्या ह्या लढ्याला कसलाही कार्यक्रम नव्हता. काय करावयाचे व कसे मरावयाचे, ह्याचा प्रचंड गोंधळ

प्लॉटस्, फ्लॅटस् व बंगले इ
जागेच्या खरेदी–विक्रीकरिता

सुरेश शहा अँड असोसिएटस्

४८८/२ सदाशिव पेठ, साहित्य परिषदेसमोर,
टिळक रोड, पुणे ४११ ०३०.

वेळ : संध्याकाळी ४ ते ८

☆

फोन : ४४३००५

लोकांच्या डोक्यात होता. ह्या हल्ल्याने स्वातंत्र्य मिळणार, अशी खात्री गांधीनी दिली होती; पण ते स्वातंत्र्य मिळण्यास आणखी पाच वर्षे जावी लागली. गांधीजींच्या अहिंसक सत्याग्रही मार्गाने भारताला स्वातंत्र्य मिळाले असे मानणेही चुकीचे आहे; पण तो वेगळा प्रश्न आहे.

गांधीजींच्या अहिंसक तत्त्वज्ञानावर श्रद्धा असलेल्या दोन काँग्रेसी नेत्यांनी मात्र 'चले जाव' आंदोलनात वेगळा मार्ग स्वीकारला. सुभाषचंद्र बोसांनी अतिपूर्वेत आझाद हिंद फौज संघटित केली आणि जयप्रकाश नारायणांनी तुरुंगातून सुटका करून घेऊन हिंसक क्रांतिकारी मार्गाचा अवलंब केला. जयप्रकाशांनी एका पत्रात म्हटले होते की, 'अहिंसा हे शूरांचे तत्त्वज्ञान आहे हे मी मान्य करतो. व्यापक प्रमाणावर अहिंसेचा पुरस्कार केला तर हिंसेची आवश्यकताच नाही; पण तूर्त तरी ती अहिंसक शक्ती पुरेशी जागृत झालेली नाही. म्हणून सशस्त्र मार्गाचा अवलंब करणे अपरिहार्य ठरते.' 'लोकक्रांती' असे नामाभिधान करून त्यांनी आपली वेगळी संघटना सशस्त्र क्रांतीसाठी स्थापन केली. नेपाळमध्ये त्यांचे मुख्य कार्यालय होते. आपल्या गनिमी सैनिकांना 'आझाद दस्ता' हे नाव त्यांनी दिले. कलकत्ता, मुंबई, मद्रास, दिल्ली ह्या प्रमुख शहरांना गुप्त भेटी दिल्या, कार्यकर्ते जमवले, आझाद हिंद फौजेशी संबंध प्रस्थापित केले; पण त्यांना १९४३ मध्ये अटक करण्यात इंग्रज यशस्वी झाले आणि जयप्रकाशजींची सशस्त्र चळवळही त्यामुळे बंद पडली.


## नेतृत्वहीन अवस्था

'छोडो भारत' आंदोलनातील सर्वांत गौरवशाली टप्पा म्हणजे सशस्त्र क्रांतिकारकांनी घडवून आणलेले उठाव! सशस्त्र क्रांतीची चळवळ भारतात १९ व्या शतकाच्या सुरुवातीपासून होती. परकीय सत्तेला हाकलून देण्यासाठी १९५७ पूर्वीदेखील प्रयत्न झालेले होते व ते सर्व प्रयत्न शस्त्रे बाळगणाऱ्या देशभक्तांनी केलेले होते. काँग्रेसच्या स्थापनेपर्यंत ही चळवळ महाराष्ट्रात चांगले मूळ धरून होती. बंगालच्या फाळणीपर्यंत तर सशस्त्र क्रांतिकारक देशभर चांगले लोकप्रिय होते. टिळक–गांधींनी काँग्रेसला लोकसंघटक बनविले. जनसामान्यांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळवण्यात गांधी–नेहरूंसारखे काँग्रेसचे नेते यशस्वी झाले, तरी सशस्त्र क्रांतिकारकता भारतामध्ये अस्तित्वात होती. काँग्रेसने चालविलेल्या प्रयत्नाबद्दल क्रांतिकारकांना आदर होता. गांधीजींच्या नावाच्या घोषणा करीत किती तरी क्रांतिकारक फासावर चढले; पण गांधीजी मात्र सातत्याने सशस्त्र क्रांतिकारकांचा तिरस्कार केला. तो 'मारो काटो का पंथ' आहे अशी त्यांची संभावना केली. काँग्रेसच्या पिछाडीला ह्या वेड्या सशस्त्र क्रांतिकारकाची एक जोरदार फळी होती. ती बरीचशी सुप्त असली तरी प्रसंगोपात ती एकदम उफाळून येई. १९४२ चे आंदोलन भरकटत चालले आहे, हे पहाताच ह्या तरुणांनी त्यात उडी घेतली. लोकांना सशस्त्र क्रांतीच्या तत्त्वज्ञानाची दीक्षा दिली. ह्या क्रांतीचा मार्ग खडतर होता. संसार, नोकऱ्या, बायका–मुलांच्या मोहजालात गुरफटलेला भारतीय माणूस फाशीच्या तख्तावर चढण्याच्या मनःस्थितीत कसा असणार? आपल्या असहाय्यतेची जाणीव असलेल्या भारतीयांनी म्हणूनच क्रांतिकारक युवकांना पाठिंबा दिला; पण केवळ सहानुभूतीने व पाठिंब्याने स्वातंत्र्य थोडेच मिळणार होते? १९४२ मध्ये ह्या क्रांतिकारक संघटनांनी जोर केला; पण त्यांनाही यश आले नाही. मोठ्या प्रमाणावर हिंसाचार पेटविण्यात ते यशस्वी झाले; पण त्या हिंसाचाराचे, दहशतवादाचे रूपांतर त्यांना स्वातंत्र्यात करता आले नाही.

१९४२ च्या आंदोलनाचे श्रेय गांधीजींना दिले जाते; पण ते सर्वस्वी चूक आहे. स्वतः गांधीजींनी तसा दावा कधी केला नाही. आंदोलनाच्या काळात जो हिंसाचार माजला, तो त्यांच्या दृष्टीने तिरस्करणीय होता. आंदोलनापूर्वी जी उद्दिष्टे काँग्रेसने घोषित केली होती, ती बिलकूल साध्य झाली नाहीत. १९४२ च्या 'चले जाव' चळवळीनंतर गांधीजी राजकारणातून निवृत्त झाल्यासारखे भासू लागले. पुन्हा त्यांनी देशव्यापी आंदोलन छेडण्याचा प्रयत्न केला नाही. कसलेही तत्त्वज्ञान, कार्यक्रम नसलेल्या व दिशा हरवून बसलेल्या ह्या आंदोलनाची एकच बाजू उजळ आहे, ती म्हणजे सर्वसामान्यांच्या अंतःकरणात उसळलेला देशभक्तीचा आगडोंब! राष्ट्रभक्तीने प्रेरित होऊन सामान्य माणूस ह्या लढ्यात उतरला. नेते नसताना, मार्गदर्शनाचा अभाव असताना, कसलेही आदेश नसताना तो डगमगून गेला नाही. त्याच्या बुद्धीला जसे जमले, पटले तसा रस्ता त्याने चोखाळला. आपल्या कुवतीप्रमाणे त्याने ह्या स्वातंत्र्ययुद्धात आपल्या समिधा अर्पण केल्या. नेतेमंडळी गजाआड गेली म्हणून तो हताश झाला नाही. ह्या राष्ट्रवादाचे प्रखर दर्शन चले जाव आंदोलनाच्या काळात घडले. जर लोकांना पुरेसे संघटित केले असते, लोकांना एक निश्चित दिशा आणि कार्यक्रम दिला असता, तर हे आंदोलन यशस्वी होऊन स्वातंत्र्य दृष्टिपथात आले असते!

जगात दुसऱ्या महायुद्धाच्या निमित्ताने हिंसाचाराचा आगडोंब उसळला असताना भारतात अहिंसक मार्गांनी स्वातंत्र्य मिळवण्याचा प्रयत्न करणे कितपत उचित होते, हे ठरविण्याचा काळ आता आला आहे. सरकारी दडपशाहीला, सरकारी दहशतवादाला जर त्याच दहशतवादाने प्रखर उत्तर दिले गेले असते तर स्वातंत्र्याचा सूर्य लोकमान्य टिळकांनी त्यांच्या हयातीतच पाहिला असता; पण भारतीयांच्या नशिबी आणखी २५–३० वर्षांची रखडपट्टी लिहिलेली होती, त्याला कोण काय करणार!

१९४२ चा स्वातंत्र्यलढा हे भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या इतिहासातील एक गौरवशाली पर्व आहे. सामान्य माणसातील तेजोगुण एखाद्या राष्ट्रीय चळवळीच्या निमित्ताने कसे फुलून येतात व त्यामुळे त्या गुलाम राष्ट्राचा कसा कायापालट होऊ शकतो ह्याचे प्रखर दर्शन ह्या काळात झाले. त्याचबरोबर काँग्रेसचा नाकर्तेपणाही ह्याच चळवळीमुळे भारतीयांच्या दृष्टोत्पत्तीस आला.



## स्वातंत्र्यानंतर सगळेच सुधारणावादी, पार्लमेंटवाले झाले म्हणून खचलेले

# दोन कॉम्रेड्स

### जयंत प्रधान

व्हिएटनाम लाल सलाम
लाल सलाम, लाल सलाम
छोडो छोडो व्हिएतनाम छोडो
अमेरिकन यांकी व्हिएतनाम छोडो
हँडस ऑफ व्हिएतनाम
डाउन विथ अमेरिकन इंपेरिअॅलिझम

कम्युनिस्ट पार्टीने व्हिएतनामवरील अमेरिकन आक्रमणाविरुद्ध काढलेल्या अनेक मोर्चांपैकी तो एक मोर्चा होता. गिरगाव-चौपाटी ते बीच कँडीवरील अमेरिकन कौन्सुलेट. तीच ती चार-पाचशे मंडळी. नेहमी न चुकता मोर्चांना हजर राहणारी. पोलिटिकली कॉन्शस. मीही त्यापैकी एक. सन एकोणीसशे त्रेसष्टअखेर असेल. आपली राजकीय जागृती जाहीरपणे जनतेपुढे व्यक्त करण्याची ती संधी आमच्यापैकी कोणीही सोडीत नसे.

हे हे एल. बी. जे. !
हाउ मेनी किड्स् यू किल टुडे ?

— अशा नवीन घोषणांतून आम्ही आमचे अमेरिकन राजकीय क्षेत्राविषयीचे ताजे ज्ञान व्यक्त करीत होतो. सुशिक्षित मध्यमवर्गीय मंडळी आम्ही. स्वतः डीक्लास – वर्गविहीन – झाल्याचे आम्ही ओरडून लोकांना, विशेषतः आमच्या सहकाऱ्यांना, पटविण्याचा प्रयत्न करीत होतो.

'ये मिडल क्लास के लोग यहाँ आकर पार्टीको बिगाडते है' वगैरे जुन्या व स्वतःचे वर्चस्व कायम राखण्याचा प्रयत्न करणाऱ्या कामगार कॉम्रेड्सचे उद्गार ऐकून आमचे कान किटत. त्यामुळे त्याला उत्तर म्हणून नवीन धर्मांतर केलेल्या माणसांच्या उत्साहाने आम्ही त्याला प्रतिजबाब देण्याची संधी सोडत नव्हतो. तसे पाहायला गेले तर फारच थोडे 'मिडल क्लास के लोग' त्या वेळी पार्टीत होते. आम्ही दहा-पंधरा पोरं असू. बाकीचे आमच्या मते 'मिडल क्लासवाले' म्हणजे पार्टीचे जुने पुढारीच होते. त्यांची राहणी, वागण्यातून व्यक्त होणारा पांढरपेशेपणा आमच्या नजरेतून सुटत नसला तरी त्याबद्दल उघडपणे बोलण्याची आमची हिंमत नव्हती.

इंडोचायना युद्धानंतर पार्टीचे अनधिकृतपणे दोन भाग पडले होते. त्या स्प्लिटमध्ये आम्ही बेफाम उत्साहाने भाग घेतला होता. चीन व रशिया यांतील पाटर्यांमध्ये चाललेला 'ग्रेट डिबेट' आम्ही वाचून, भाषांतर करून त्याचे गुप्तपणे वितरण केले होते. 'चीनवादी चीनवादी' म्हणून आमची 'डांगेवादी' मंडळी व सर्व वर्तमानपत्रे हेटाळणी करीत होती. 'मिडल क्लास'ची मंडळी मुंबईत उजव्या 'डांगेवादी' कम्युनिस्टात जास्त होती. पार्टी फुटल्यानंतर आम्हा थोड्या मिडल क्लासवाल्यांची टिंगल करण्याची संधी – बहुधा स्थानिक पुढारी मंडळींच्या प्रोत्साहनामुळे – बाकीचे कॉम्रेडस् वाया जाऊ देत नसत. म्हणून आमची एक्स्ट्रॉ मिलिटन्सी.

मोर्चा नानाचौकावरून केम्प्स कॉर्नर पास करून वॉर्डन मार्गाला लागला होता. सर्व मंडळींच्या अंगात आल्याप्रमाणे ती घोषणा घुमवीत होती. त्यातल्या त्यात मल्याळी कॉम्रेड्स तर फारच पिसाळले होते. त्यांचे अशुद्ध हिंदी उच्चार एरवी मजेशीर वाटले असते; परंतु ह्या दिंडीतील सर्व वारकरी भयानक भाविक. असल्या क्षुल्लक गोष्टींची दखलही घेतली जात नव्हती.

रस्त्यावरचं पब्लिक थांबून आमच्याकडे पाहात होतं. पेपर वाचणाऱ्यांना व्हिएतनाम नावाचा एक देश आहे व तेथे लढाई चालू आहे हे माहीत होते; पण त्यांच्या दैनंदिन जीवनाशी त्याचा काहीही संबंध नसल्यामुळे ती व इतर अज्ञ मंडळी 'हा काय प्रकार आहे ?' असा भाव असलेल्या विचित्र नजरांनी आमच्याकडे पाहात होती; पण आमच्या अंगातल्या वाऱ्यामुळे आम्हाला त्याचे भान नव्हते.

कौन्सुलेट जसजशी जवळ येऊ लागली तसतसा मंडळींचा उतमात वाढत चालला. त्यातल्यात्यात मला मोर्चात व बाहेर नजर मारायची सवय होती. गिरणगावात मी लहानाचा मोठा झालो होतो. अनेक गिरणीकामगारांचे संप मी पाहिले होते. त्यामुळे मोर्चातले दोष मला चांगले लक्षात होते. आपण काय घोषणा देतो ते बहुधा पब्लिकला एकूण गोंधळामध्ये समजत नाही हे माहित असल्याने ओरडण्यात एकसूत्रीपणा आणण्याचा मी कसून प्रयत्न करीत असे. फार जवळच्या ग्रुप्सनी वेगवेगळ्या घोषणा बोंबलल्या तर त्यामुळे कोण काय ओरडतेय ते बाहेरच्या लोकांना कळत नाही.

पन्नास-पाउणशेच्या गटाला एक लीड देणारा, याप्रमाणे मोर्चाचे भाग पाडायचे असतात. तसे झाले तर मला मोर्चात भाग घेतल्याचे समाधान वाटे. नाही तर अगदी लहानपणी अनुभवलेला गणेशोत्सवातील आरतीचा अखेरचा भाग – मंत्रपुष्पांजली– चालू असल्यासारखे वाटून मी वैतागत असे.

ब्रीच कँडी किनाऱ्याजवळ पोलिसांनी साखळी धरली होती. सखाराम मंडळींना हा प्रकार नेहमीचाच होता. तोच तोच सिनेमा पाहून बोअर झालेल्या थिएटरमधील गेटकीपरसारखे ते आमच्याकडे पाहात होते. 'ह्या साल्यांना दुसरे उद्योग नाहीत का? फुकट आम्हाला ड्युटी करायला लावतात' हीही भावना त्यांच्या चेहऱ्यांवरून व्यक्त होत होती; पण आमच्या अंगात व्हिएतनामी क्रांतीचे वारे संचारले होते. समोरचे सखाराम–तुकाराम अमेरिकन कौन्सुलेटचे संरक्षण करण्याने, अमेरिकन साम्राज्यवादाचे हस्तक झाले आहेत, म्हणून आमचा त्यांच्यावर राग. कौन्सुलेटसमोर बोंबलून दगड मारता येत नाहीत याचा राग आम्ही त्यांच्यावर काढायचो. वडयाचे तेल वांग्यावर. मोर्चा कौन्सुलेटपासून जवळजवळ दोनशे यार्डांवर थांबवण्यात आला. गंमत अशी की, आमच्यापैकी बहुतेकांनी ही कौन्सुलेट कधीही पाहिली नव्हती. मोर्चा काढून तिकडे गेलो की आम्हाला इतक्या दूर थांबवण्यात येई की, ती आम्हाला मुळीच दिसत नसे. एरवी कधी ती जाऊन पाहावी असे कोणाच्याही डोक्यात येत नसे. सत्तर साली माझ्या एका दोस्ताला अमेरिकेला जायचे होते म्हणून मी त्याच्याबरोबर कौन्सुलेटमध्ये गेलो तेव्हा ती मी प्रथम पाहिली. तेव्हा क्रांतीचे पहिले वारे उतरले होते. बिल्डिंग छान आहे. बांधणी, रंग, समोरचा छोटा बगीचा. त्या वेळी दगड मारायची इच्छा झाली नाही.

चार-पाच उंच, धिप्पाड व टिपिकल मुंबईकर सबइन्स्पेक्टर्स हातात जाड केन्स घेऊन व कमरेला रिव्हॉल्वर्स लावून गल्लीतल्या दादांसारखे पोझ मारून उभे होते. फरक एवढाच की, गल्लीतले दादा एवढे शरीराने माजलेले नसतात. पंधरा-वीस स्पेशलवाले होते. स्पेशलवाल्यातला आणि मवाल्यातला फरक मला अजूनही कळला नाही. थोड्याफार फरकाने ते स्मगलर्सनी ठेवलेल्या, पोसलेल्या गुंडांसारखेच दिसतात. वागतातही तसेच. पोलिटिकल ब्रँचवाले सभ्य दिसतात. शरीराने साधारण आणि कावळ्याच्या नजरेचे. कपडे कितीही साधारण असले तरी त्यांच्या नजरेवरून आणि उभे राहण्याच्या पद्धतीवरून हजार माणसांतून त्यांना शोधून काढण्याची कला आम्हाला अवगत झाली होती.

सखारामांची साखळी आम्ही जवळ जाऊ लागलो तशी फैलावली. सबइन्स्पेक्टर्स व इन्स्पेक्टर्स आल्सेशियन गार्ड डॉग्जसारखे उग्र भाव चेहऱ्यावर आणून पुढे-मागे करू लागले. स्पेशलवाल्यांनी हातातल्या काठ्या सरसावून आमची एक बाजू कव्हर करायला सुरुवात केली. पोलिटिकलवाले मात्र ब्लड हाउंड्ससारखे शांतपणे वास काढण्यासाठी पांगले. कोणकोण हजर आहे, काय घोषणा देतेय, बोलतेय ह्याचा त्यांना रिपोर्ट द्यायचा असतो.

दोन ए. सी. पी. आणि एक डी. सी. पी. भाषणावर बसलेल्या श्रीमंत शिकाऱ्यांसारखे हाताची घडी घालून किंवा कमरेवर हात ठेवून सावज रेंजमध्ये येण्याची वाट पहात होते. मोर्चा कंट्रोलबाहेर गेला तर केन किंवा लाठी चार्जची ऑर्डर ते देत असत. लुमुंबाच्या खुनानंतरच्या मोर्चातल्या अनेकांची टाळकी अशा 'अतिप्रसंगामुळे फुटली होती. त्यात वरळीचे कॉम्रेड कुरणेही होते.

आज सर्व मुंबईची पुढारी मंडळी, डावे 'चीनवादी' कम्युनिस्ट,-मोर्चात नव्हती. बी. टी. आर. (रणदिवे) सकट पंधरा-सोळा जणांना बारा नोव्हेंबरपासून स्थानबद्ध केले होते. आम्ही तरुण मंडळीच होतो. कंट्रोल करायला कोणी नव्हते. मोर्चाही पोलीस जवळ आल्यावर फैलावला. अचानक डावीकडून वीस-पंचवीस पोरांची साखळी पुढे सरकली आणि पोलिसांना जाऊन भिडली. ती मदनपुऱ्यातली गँग आहे हे माझ्या चटकन लक्षात आले. धांदल करण्यात ते नेहमीं पुढे असायचे. आता 'अतिप्रसंग' होणार हे लक्षात येऊन कॉम्रेड नाम्बियार ( इंजिनिअरिंग युनियनचा पुढारी ), बजाज ( जनरल वर्कर्स युनियनचा सेक्रेटरी ), पटेकर (गिरणीकामगार व युनियनचा स्थानिक पुढारी) इत्यादी मंडळी माझ्यासकट पुढे सरसावली. मदनपुरावाल्याना आवरण्यासाठी. झोंबाझोंबी चालू होती. कॉम्रेड्स चपला घेऊन, पोलिसांना चान्स मिळेल तेव्हा हाणत होते. एक सडपातळ व मध्यम उंचीचा, अर्धे टक्कल पडलेला कॉम्रेड सर्वात जास्त पिसाळलेला होता. अनेक वेळा जनरल बॉडीच्या सभेत पाहूनही त्याचे नाव मला माहीत नव्हते. आम्ही दोघा-तिघांनी मिळून त्याला धरला व मागे ओढला.

"अरे कामरेड, छोडो मुझको, इन कुत्तोंकी माका भोसडा. इनको आज बता देते है" तो ओरडायला लागला.

'कॉम्रेड खामखा भिडने से क्या फायदा? वैसा कमिटीने फैसला नही किया है.' मी त्याला समजावीत होतो. 'लाठी चार्ज होयेगा और तुम तो गंजे हो. सिर जल्दी फुटेगा.'

माझे बोलणे ऐकून एवढ्या धांदलीतही तो हसला. त्याच्या टकलाबद्दल बोललो म्हणून. प्रथमच माझी व कॉम्रेड अब्दुल सलामची बोलाचाली झाली होती.

'तूटेगा तो तुटने दो' पण त्याची गडबड कमी झाली होती. डी. सी. पी. ने लाठीचार्ज करायची ऑर्डर दिली नाही. बाकीचा मोर्चा 'हिंदू' कॉम्रेडसचा. ते तेवढी गडबड करीत नव्हते. पोलीस मदनपुरेवाल्यांना आडव्या लाठ्या धरून मागे रेटीत होते. पाच एक मिनिटांत मदनपुरा पार्टी ब्रँच थंडावली. नंतर सर्वजणांना खाली बसविण्यात आले. कॉम्रेड बजाजने मेगॅफोन हातात घेऊन भाषणाला सुरुवात केली. भाषणात 'इस बम्बई शहर के अंदर' सात-आठ वेळा बोलायची त्याला सवय होती. मग तो ट्रेड युनियनचा मोर्चा असो की, मैदानातली राजकीय सभा असो की, आजच्या मोर्चासारखा मोर्चा. अमेरिकन साम्राज्यवाद्यांना, भारतातील भांडवलशाही सरकार व समाजव्यवस्थेला आणि पोलिसांना भरपूर सभ्य शिव्या घालीत त्याने आपले भाषण संपवले. एकदा मी त्याला 'इस बम्बई शहर के अंदर' बद्दल विचारले होते. 'आदत पड गयी है, भाई' म्हणून त्याने स्पष्टीकरण केले.

नंतर कॉम्रेड नम्बियारने आपल्या घेडगुजरी हिंदीत भाषण दिले. आम्हाला त्यांची भाषणे जवळजवळ पाठ असत. तरीही सत्यनारायणाची पोथी अनेकदा ऐकणाऱ्या भाविक मंडळींप्रमाणे आम्ही ऐकत असू.

मदनपुऱ्यातल्या मंडळींच्या शेजारीच मी बसलो होतो. कॉम्रेड

मक्सूद सोडून मला इतर मंडळीची फक्त तोंडओळखच होती.

भाषण चालू असतानाच मी सलामला विचारले, 'कॉम्रेड, नाम क्या तुम्हारा ?'

' कॉम्रेड अब्दुल सलाम. अब्दुल सलाम अब्दुल शफी. लम्बी सीमीट मे रहता हूँ, भायखलेपे. और तुम्हारा ?'

' कॉम्रेड प्रधान. जयंत प्रधान. वरली मे काम करता हूँ. कॉम्रेड कुरने के साथ. '

' अच्छा अच्छा. '

' प्रिमियरमे काम करते हो क्या ? ' मी विचारले.

' हाँ '

' आर. जे. पे रेझर तुमनेही चलाया था ?'

त्याने माझ्याकडे पाहिले व होकारार्थी मान हलवली. काल संध्याकाळी चौपाटीवर फिरायला गेलो होतो असे सांगण्याइतक्या सहजपणे.

त्या वेळी आर. जे. मेहता जोरात होता. जॉर्ज फर्नांडिसपेक्षाही. इंजिनिअरिंग कारखान्यामध्ये त्याचेच वर्चस्व होते. धंदेवाईक ट्रेड युनिअनिस्ट. गुंड बाळगत असे. प्रिमियर ऑटोमोबाइल्स कारखान्यात आमची छोटीशी युनियन होती. जम बसविण्याचा प्रयत्न करीत होती. आर. जे. जोरात होता. त्याच्या गुंडांची दहशतही जोरात. आमच्या मंडळींना दमदाटी होऊ लागली आणि एक दिवस त्याला उत्तर म्हणून सलामने आर. जे. वर रेझर चालवला होता. हलकेच. रेझर हे हत्यार त्या वेळी नुकतेच वापरात आले होते. पुढून किंवा पाठीमागून त्याने तीन-चार फूट लांब वार केला तर जखम शिवणे फार कठीण जाई. रक्तस्राव फार होत असे.

' मगर हलकेसे मारा था, सिर्फ डरानेके लिये. ' तो पुढे म्हणाला.

त्यानंतर आमच्या कामगारांना होणारी दमदाटी थांबली होती. केसमध्ये सलाम सुटला होता.

भाषणानंतर मोर्चातील मंडळी पांगली.

¤

त्या वेळी आमच्या पार्टीच्या, डाव्यांच्या जनरल बॉडया गुप्त होत असत. मदनपुऱ्यातील मंडळी क्वचितच येत. ' हम तो पहलेसे मिलिटंट है ' ही त्यांची भूमिका. शिवाय बाहेर सर्व ज्युनियर व नवीन पुढारी मंडळी होती. मदनपुऱ्यातील ब्रँच सिनियर लोकांनाच ओळखत असे आणि ते तर जेलमध्ये होते. हिंदू-मुस्लिम हा फरक अजाणतेपणी राहिला होता. काही गरज नसताना. दोन्हीकडील मंडळी त्याला जबाबदार होती. स्वतःहून एकमेकात जास्त मिसळायचे इनिशिएटिव्ह कोणी घेत नसे. मदनपुरा भेंडीबाजारात गेले की पाकिस्तानात गेल्यासारखे वाटे. परंतु मी, पटेकर, मूर्ती वगैरे मंडळी मुंबईची पार्टी फोडण्यासाठी काही वेळा फिरताना मदनपुऱ्यात गेलो होतो. तिथले स्थानिक सिनियर पुढारी पार्टीच्या दुभंगण्याच्या फेवरमध्ये नव्हते तेव्हा. नंतर जेलमधून ' डिरेक्टिव्ह ' आला. मग सर्व सामील झाले. दोन-तीन लोक सोडून.

नंतर अहिल्याबाई रांगणेकर, कोल्हटकर (प्रेस-कामगार व पार्टीचे पुढारी) वगैरे मंडळींना सोडण्यात आले. आम्ही गुप्त 'सेल्स' तयार केले होते. पाच-सात लोकांचे. आमच्या पुस्तकी ज्ञानाला अनुसरून. मल्याळी कॉम्रेड्स मेजॉरिटीत होते. वरच्या लेव्हलच्या काही पुढाऱ्यांना सोडण्यात आले. आंध्राचे पुढारी कॉ. सुन्दरय्या वगैरे. आम्ही स्थापन केलेली कमिटी बरखास्त करण्यात आली. माझ्यासारख्या ' मिडल क्लासवाल्यांना ' डच्चू देण्यात आला. त्याचे 'गम' आम्ही बाळगले नाही. वाईट वाटले थोडे; पण क्रांती प्रथम, नंतर पुढारीपण हे ब्रीदवाक्य होते. आता नवीन क्रांतिकारक पक्ष स्थापन होणार-क्रांतीकारक लाइनवाला-हे वातावरण सर्वत्र होते.

चौसष्ट सालात माझी अन सलामची चार-पाच वेळा भेट झाली असेल नसेल आणि तेही माझ्या पुढे जाऊन, ओळख करून वारंवार भेटत राहण्याच्या प्रवृत्तीमुळे. सलाम आपल्या जगात मश्गुल असे. मी एक वकील, कॉम्रेड एवढे त्याला चांगले माहीत झाले होते-दोन तीन भेटीत.

वकिली करून, पार्टीचे काम करून मुद्दाम कोणाला दूर जाऊन भेटणे मला शक्य नव्हते आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आम्हा सर्व कॉम्रेड्सना त्या वेळी ' द पार्टी इज मोअर इंपॉर्टन्ट दॅन द इंडिव्हिज्युअल ' एकापेक्षा पार्टी मोठी ही घोषणा वेदवाक्य होती. एका कॉम्रेडला जास्त महत्त्व देणे, त्याच्याशी जास्त मैत्री करणे चुकीचे. म्हणून व्यक्तिशः एखाद्या व्यक्तीविषयी आकर्षण वाटूनही आम्ही इतरात व त्याच्यात अगर तिच्यात फरक कटाक्षाने टाळत असू. तिच्या म्हटले खरे; संयुक्त पार्टीत काही स्त्रिया व मुली होत्या, परंतु आमच्या नव्या मुंबई पार्टीत औषधालाही मुलगी नव्हती.


फोन नं. : ४४५७४२

हार्दिक शुभेच्छा

**पु. ना. गाडगीळ आणि कं.**

**जव्हेरी - सराफ**

आपणास चटकन् पसंत पडतील असे सोन्याचांदीचे, मोत्याचे व जवाहिरांचे नाविन्यपूर्ण, नाजूक अलंकार, तसेच सांगली घाटाची चांदीची नित्योपयोगी भांडी खात्रीशीर व माफक किंमतीत मिळतात. नवग्रहांची रत्ने, आंगठ्या व जन्ममास रत्ने मि ळ ती ल !

**कुंटे चौक, लक्ष्मी रोड**

**पुणे ४११ ०३०**


मी पार्टीबद्दल भाषण ठोकले

पंच्याहत्तर, मध्यम भांडवलदार व छोटे भांडवलदार ही विभागणी योग्य होती. पण माझ्या मताला किंमत नव्हती.

मी सात-आठ मुद्दे तयार केले. तसे पाहिले तर वेगळा चाळीस पानी प्रोग्रॅमच तयार केला; पण तो सर्व मांडणे म्हणजे मूर्खपणा ठरले असते. मी माझे मुद्दे मांडायचा प्रयत्न केला. माझी ती पहिलीच वेळ. अनुभव नाही व समोरच्या मंडळींच्या बौद्धिक पातळीचा अंदाज न घेता मुद्दे मांडले. त्यामुळे सगळ्यांच्या डोक्यांवरून गेले. मलाही नीट मांडता आले नाहीत. हसे झाले. एकमताने त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.

मुंबई कॉन्फरन्समध्ये मल्याळी मंडळींनी अतिरेकी थिसिस मांडला. कॉ. रामचंद्रन, टी. पी. सी. नायर वगैरे स्थानिक मल्याळी कॉम्रेड्स मंडळींनी. डायरेक्ट सोशॅलिस्ट क्रांती. मणिकृत प्रोग्रॅममध्ये जनलोकशाही क्रांती हे उद्दिष्ट होते. 'पीपल्स डेमॉक्रॅटिक रेव्होल्यूशन.'

पुढारी मंडळींनी यावर सडकून टीका केली. आरडाओरडा झाला. मल्याळी कॉम्रेड्स संख्येने जास्त आणि जास्त मिलिटंट. हे एक वैशिष्ट्य त्यांचे. तिकडे केरळात पार्टी जोरात. तिथे राज्य येऊन गेले होते पार्टीचे. इंदिरेच्या आग्रहावरून नेहरूंनी पाडले होते. आताही केरळ पार्टी जोरात होती आणि बंगाल व आंध्रची. मराठी पुढारीपणसुद्धा त्यावर जोर देई. त्यामुळे मल्याळी मंडळी फार शेफारली होती. पार्टीचा व क्रांतीचा मक्ता आपल्याकडेच अशा थाटात ती वागत. 'मराठी कॉम्रेडस' असा आमचा तुच्छतेने उल्लेख करीत. महाराष्ट्र पार्टीचाही. त्यांचे म्हणणे काही चुकीचे नव्हते; पण त्यांची वागणूक चुकीची होती.

परंतु सर्व मल्याळी कॉम्रेड्स रामचंद्रन, नायरच्या बाजूचे नव्हते. त्यामुळे त्यांच्या दुरुस्त्या बहुमताने फेटाळल्या गेल्या.

कॉम्रेड सलाम वगैरे कॉन्फरन्सला हजर होते. कॉन्फरन्स संपल्यावर सलाम मला भेटला.

'कामरेड, कोशीश तो अच्छी किये मगर समझा नही पाये तुम्हारा कहना' तो सहानुभूतिपूर्ण स्वरात म्हणाला.

'अब महाराष्ट्र कॉन्फरन्समे देखेंगे' मी पण जिद्दी होतो. 'उस टाइम अच्छी तैयारी करके भाषणबाजी करेंगे. उसका असर अच्छा होता है.'

'कॉम्रेड, मेरी मानो. ये सब कागज मे कुछ रखा नही. असलियत अलग होती है.' त्याने आपले मत मांडले.

त्या वेळी आम्ही हॉटेलात बसून प्रथम चहा प्यालो.

सलाम सडपातळ असला तरी ताकदवान असल्याची जाणीव होई. त्याचे टक्कल वाढत होते. चेहरा सर्वसाधारण, डोळे मात्र वैशिष्ट्यपूर्ण. बोलताना ते विस्फारून बोले. मोठे व बोलके होते. त्यात प्रेमळपणाचे, निडरपणाचे व किंचितशा क्रौर्याचे मिश्रण होते. वर्ण निमगोरा. त्याला हातवारे करीत बोलण्याची सवय होती. संभाषणात शिव्यांचा मसाला भरपूर; पण त्याच्या तोंडात त्या मवालीपणाचे लक्षण वाटत नसत. स्वाभाविकपणे येत. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे त्याचे उत्स्फूर्त व जीवन ओसंडून चाललेले व्यक्तिमत्त्व आणि बोलण्यातील तळमळ व कळकळ. कोठलीही साधी गोष्ट तो इतक्या आर्जवून सांगे की, आपले पूर्ण लक्ष बोलण्याकडे वेधून घेई. वर्णन करू

नाही म्हणायला पुढे नीला भागवत आली. काही काळ पासष्ट-सहासष्टला इंजिनियरिंग युनियनमधल्या व विडी कामगारांपैकी काही बायका येत असत पार्टी ऑफिसवर; पण त्या कामापुरत्याच. त्या पक्षात येण्याचा विचारही करीत नसत आणि युनियन पुढारीसुद्धा त्यांच्यावर असले संस्कार करायला पाहात नसत. त्याबद्दल त्यांना एकदोनदा विचारले. तेव्हा ते म्हणाले,

'वैसा कोशिश किया तो वो लोग युनियनसे भी दूर भाग जायेंगे.'

मला त्या वेळी त्यांचे म्हणणे पटले नव्हते. पुढे प्रत्यक्षात अनुभवले मात्र.

चौसष्ट सप्टेंबरपर्यंत नवीन पार्टी स्थापन झाली होती. पार्टीचा बराच प्रमुख पुढारीवर्ग जेलमध्येच होता; पण सात-आठ पुढारी मंडळी सरकारने मुद्दाम कम्युनिस्ट पक्ष लौकर फुटावा म्हणून बाहेर सोडली होती. आम्हाला हे समजत होते. आपसात आम्ही ते कुजबुजत असू; पण उघडपणे बोलणे म्हणजे भ्रष्टाचार झाला असता. पार्टीच्या शिस्तीत ते बसत नव्हते. शिवाय पुढारी मंडळी एवढी जोशात व कामात होती की, असली चर्चा त्यांच्याशी त्या वेळी करणे अयोग्य होते. नवीन क्रांतिकारक पक्षाची स्थापना हे सर्वांत महत्त्वाचे उद्दिष्ट. ते सोडून इतर गोष्टी दुय्यम असे ठरवून आम्हीही गप्प बसत असू. आम्ही म्हणजे कॉम्रेड रामचन्द्रन, कॉ. बजाज इत्यादी.

मुंबई कॉन्फरन्स झाली. मी डेलिगेट होतो. मी तीन महिने हायकोर्टमध्ये बसून नवीन पार्टीच्या दोन कच्च्या मसुद्यांचा अभ्यास केला होता. एक कॉम्रेड सुंदरय्यांनी जेलमधील पुढाऱ्यांशी गुप्तपणे संधान साधून बनवला होता. एक कॉम्रेड इ. एम. एस. नंबुद्रीपाद यांचा. मला बरेच मुद्दे पसंत नव्हते. कॉ. सुंदरय्यादींच्या मसुद्यातले. उदाहरणार्थ, नॅशनल बूर्ज्वाजीबद्दल (राष्ट्रीय भांडवलदार.) त्या वेळी हा शब्दप्रयोग प्रचलित होता. मला तो काळबाह्य झालेला वाटत होता. राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळाल्याला सतरा वर्षे होत आली होती. स्वतंत्र आर्थिक रचनेचा पाया नेहरूंच्या औद्योगिक धोरणाने घातला होता. सर्वच भांडवलदार 'राष्ट्रीय' होते. जवळजवळ काही स्वतंत्र पार्टीवाले अतिरेकी सोडून. माझ्या मते मक्तेदार टाटा-बिर्लादी

लागला की, फिल्म पाहिल्यासारखे वाटे. मी त्याच्या व्यक्तिमत्त्वाकडे तेव्हापासून जबर आकर्षिला गेलो. प्रथमच त्याला एवढ्या जवळून पाहात होतो.

ऑक्टोबरमध्ये महाराष्ट्र कॉन्फरन्स झाली. मला प्रतिनिधी म्हणून जाऊ न देण्याचा वरळी ब्रँचमधल्या पुढारीपणाने कसोशीचा प्रयत्न केला. कॉ. राधा मेनन सेक्रेटरी होता. तो रिझर्व बँकेत कामाला होता; पण काय घडले कोणास ठाऊक, अचानक मतांमध्ये मी निवडला गेलो. मी आनंदलो. कॉ. मेनन नर्व्हस झाला. मी कार्यक्रमाला दुरुस्त्या मांडणार हे त्याला माहीत होते.

कॉन्फरन्स तलासरीला झाली. ठाणे जिल्हा म्हणजे गोदूताई परुळेकरांनी बांधलेला महाराष्ट्रातील पार्टीचा एकमेव बालेकिल्ला. म्हणून तलासरी निवडण्यात आले. कॉन्फरन्समध्ये पब्लिसिटीच्या दृष्टीने सर्वात नंतरची जाहीरसभा महत्त्वाची असते. मुंबईत दोन–तीन हजारांवर राजकीय सभा करण्याची आमची ताकद नव्हती. त्यापेक्षा जास्त गर्दी रस्त्यात राजेंद्रकुमार पब्लिकला सापडला तर जमा होऊ शके मुंबईत. स्वत:चे प्रेससमोर हसे करून घेण्यासारखे होते मुंबईत कॉन्फरन्स घेणे म्हणजे.

तलासरीची कॉन्फरन्स दोन दिवस चालली. तेथे प्रथम ठाण्याच्या कॉम्रेड बापटची ओळख झाली. एकदम प्रॅक्टिकल आणि जमिनीवर पाय रोवून वागणारा कॉम्रेड. वकील होत होता. त्याची आणि माझी लौकरच गट्टी जमली. त्याचे वेगळे व्यक्तिमत्त्व सर्वांत उठून दिसले. इतक्या लहान वयाला आजोबासारखा वागे. समोरचा माणूस दबून जाई. माझ्याच वयाचा; पण मला मोठ्या माणसासारखा समजावे. स्वभावाने साहसी. म्हणजे उगाचच नाही; पण भीती वगैरे गोष्टी त्याच्या दृष्टीने किरकोळ. प्रीमियर ऑटोमोबाईल्सवर आर. जे. च्या राज्यात गेटसभा घेणे म्हणजे मस्करी नव्हती. मार खायचे धंदे; पण कॉ. बापट सभा घ्यायला मागेपुढे पाहात नसे.

सलाम कॉन्फरन्सला आला नव्हता; पण त्याच्याकडून कॉ. बापटचे नाव ऐकले होते.

'अच्छा कॉम्रेड है. शायद तलासरीमे आयगा, मिल लेना' सलामने सुचवले होते.

कॉ. बापटची चूल वेगळी होती जशी कॉ. पी. बी. दोदेंची. बी. इ. एस. ही युनियन चालवत एके काळी. नंतर ती जॉर्ज फर्नांडिसकडे गेली. सर्वांपासून वेगळे राहात. कॉ. दोदे म्हणजे एक दांडगे व्यक्तिमत्त्व. गोरेपान व लालबुंद. युरोपियन वाटे. त्यांची राहणी व सर्व सरंजाम थाटमाटाचा होता. टूथपेस्ट, ब्रश, दाढीचे अद्ययावत सामान, कपडे सगळेच अपटूडेट. मार्क्सवादात हे सर्व कसे बसते असे मी बापटला विचारले. तो म्हणाला,

'ती एक संस्था आहे. संस्थानिकी कारभार; पण वागायला एकदम चांगला माणूस. कोणात फरक करत नाही.'

कॉ. दोदे एकाकी वाटले. नेव्हल म्युटिनीमध्ये काळघा घोड्याला आर्मीने फायरिंग केले. त्यात त्याची पत्नी मारली गेली होती. त्यांनी परत लग्न केले नाही.

कॉ. रामचंद्रन वगैरे मंडळींनी आपला थिसिस कॉ. दोदेंना सांगितला होता. कॉ. दोदेंचा स्वत:चा थिसिस त्याच धर्तीचा. बी. टी. आर. ची अठ्ठेचाळीसची लाइन. एकदम समाजवादी क्रांती–मंडळींना फार घाई झाली होती. क्रांतीचे क्षितिज लालेलाल झाल्यासारखे त्यांना वाटत होते. नेहरू वारले होते. शास्त्री पंतप्रधान होते. नेहरूंनी रशियाला पटवून डांगेला सुधारणावादी बनवले हे मंडळींचे–मोठ्या पुढारीपणापासून खालपर्यंत–मत. डांग्यांची 'ती' पत्रे–जेलमधून लिहिलेली–सर्वजण अधाशासारखी वाचत आणि वाटत. शरणागती पत्करणारी. खरी की खोटी, मला कधीच कळले नाही. नेहरूंचे पुढारीपण इतके प्रभावी व जबर की, नेहरू वारल्यावर आता भांडवलदाराना वाली राहिला नाही, असा त्या मंडळींचा भ्रम होता. मार्क्सचा मूलभूत सिद्धांत विसरून सर्वजण भावनिक होऊन विचार करीत. त्यामुळे ही काही मंडळी हातघाईवर आली होती.

कॉन्फरन्समध्ये दोघांनी जोरदार भाषण केले. मध्यम उंचीचे. प्रकृती अतिशय दणकट होती. पन्नाशी उलटून गेली तरी त्यांनी आपला थिसिस मांडायला जवळजवळ एक तास घेतला. मताला टाकल्यावर वीस–पंचवीस हात वर गेले–त्याच्या बाजूने. दर्यामे खसखस, तीन–साडेतीनशे प्रतिनिधींत वीस–पंचवीस म्हणजे; पण कॉ. दोदे मुळीच नर्व्हस झाले नाहीत. ते हार्डकोअरवाले होते. अतिशय चिवट आणि जिद्दी !

हे सर्व सांगण्याचा उद्देश एवढाच की, पुढील नक्षलवादी फुटीची ही नांदी होती. जी विभागणी महाराष्ट्र कॉन्फरन्समध्ये झाली तीच कलकत्त्याच्या राष्ट्रीय पातळीवरच्या कॉन्फरन्समध्ये झाली. अधिक मोठ्या प्रमाणावर सत्तर विरुद्ध तीस जवळजवळ. आम्ही असे ऐकले, हरेकृष्ण कोनार, प्रमोद दासगुप्ता वगैरे मंडळी विरुद्ध होती असे. प्रत्यक्षात काहीच नीट समजले नाही. कारण राष्ट्रीय कॉन्फरन्सला फक्त महाराष्ट्राची पुढारी मंडळी प्रतिनिधी म्हणून गेली.

कॉ. दोदेंनंतर मी माझ्या दुरुस्त्या मांडल्या. कामगार, शेतमजूर हे मुख्य. गरीब शेतकऱ्याला बरोबर घेणे, मध्यम शेतकरी आणि मध्यम भांडवलदार यांना न्यूट्रलाईझ करणे म्हणजे न ह्या बाजूला न त्या बाजूला; पण त्यांना काही सूट देऊन गप्प करायचे आणि मक्तेदार–भांडवलदार व जमीनदार ह्यांना एकटे पाडून जनलोकशाही आघाडीने क्रांती करायची. संपूर्ण राजकीय चौकट व यंत्रणा मोडायची. सध्याच्या कार्यक्रमात ह्या चौकटीविरुद्ध व ती बदलण्याविषयी एक शब्दही नाही. उलट त्यांनी मांडलेली, नवीन चौकट भांडवली लोकशाहीचे किंचित् बदललेले नवीन स्वरूप आहे, अशी माझी टीका होती.

आज ह्या गोष्टी आठवून हसू येते थोडेफार; पण मी अतिशय सिन्सिअरपणे, गंभीरपणे भाषण करीत होतो. या वेळी मुंबई कॉन्फरन्समध्ये केलेली चूक मी केली नाही. भाषणबाजी केली. सोप्या भाषेत बोललो. क्रांती, मक्तेदारीविरोधी, सरंजामशाहीविरोधी व जनलोकशाहीवादी आहे हे माझे मत मांडले.

मुख्य कॉन्फरन्सच्या अगोदर माझा अंदाज घेण्यात आला होता. ग्रुप चर्चांमध्ये व खाजगीत कॉ. प्रभाकर संझगिरी व कॉ. ओक यांना मला समजावण्याचे काम देण्यात आले होते. कॉ. संझगिरी हे बी. टी. रणदिव्यांचे लाडके शिष्य व स्थानिक तत्त्वज्ञ. कॉ. ओक साधारण त्याच धर्तीचे; पण स्वभावाने फार गरीब. मी फारसा महत्त्वाचा नव्हतो; पण कॉन्फरन्स निर्वेध व बिनविरोध पार पडावी हा पुढारी मंडळींचा उद्देश होता.

कॉ. संझगिरी मला म्हणाले–

'कॉ. प्रधान, मक्तेदारीविरोधी प्रगती कसं म्हणता येईल ? मग ती भांडवलशाहीविरोधी होईल. आपला रोख भांडवलशाहीविरुद्ध नाही. तो दोघांचा ट्रॉट्स्काइट थिसिस आहे. बी. टी. आर. नी अठ्ठेचाळीसला मांडलेला. नवीन परिस्थितीलासुद्धा हा थिसिस चुकीचा ठरेल.'

'नाही कॉम्रेड. मक्तेदारीच्या पकडीमुळेच देशातील सरंजामशाहीचे संपूर्ण निर्मूलन होत नाही आणि सामान्य भांडवलदारांची प्रगती खुंटली आहे ती त्यांच्यामुळेच. मक्तेदार नष्ट झाले तरच त्यांची प्रगती होईल.'

कॉ. संझगिरी जानेमाने तत्त्वविवेचक. महाराष्ट्रात बी. टी. आर. च्या खालोखाल त्यांचा मान होता. त्यांना माझा दृष्टिकोन रुचला नाही.

ठराव मताला टाकायच्या अगोदर कॉ. कोल्हटकरांनी मला एका बाजूला घेतले. 'कॉ. प्रधान, तुमचा उत्साह आणि अभ्यास प्रशंसनीय आहे. मी चर्चा करीत नाही; पण तुम्ही तुमच्या दुरुस्त्या मागे घ्या, माझ्या विनंतीवरून.'

'कॉम्रेड, प्रश्न मतांचा नाही. एक मिळाले तरी हरकत नाही. प्रश्न तत्त्वाचा आहे. कार्यक्रम सुधारणावादी आहे असे माझे स्पष्ट मत आहे. त्याविरुद्ध संघर्ष देणे माझे कर्तव्य आहे. आय अॅम सॉरी.' मी उत्तर दिले.

माझ्या दुरुस्त्या ठरावाला टाकल्या गेल्या. बाजूने तीन-चार हात वर गेले. कोणाचे हेही कळले नाही नीट. बीड व महाराष्ट्रातील इतर अपरिचित मंडळी होती. बाकी सर्व विरुद्ध. काय घडणार हे मला अपेक्षित होते. तरीही मनातून किंचित् वाईट वाटले.

कॉन्फरन्सनंतर मेळावा झाला.

कॉन्फरन्सच्या पहिल्या दिवशीच वारल्याचे जथे येऊ लागले होते. ते उघड्यावर झोपत. आमच्यासारखे मांडवात नाही. अत्यंत निकृष्ट प्रतीचा तांदूळ मडक्यात शिजवून खात. गोदूताईंना ते आपसात गोदाराणी म्हणत. 'हे परुळेकरांचं संस्थान आहे. स्वायत्त. वर्षानुवर्षे आहे तसेच आहे आणि तसेच राहील' बापट म्हणाला. त्याचे आणि गोदूताईंचे जमत नसे. तोही आमच्यासारखाच टीका करणारा व पुढाऱ्यांच्या पुढे पुढे न करणारा होता. मेळाव्यात पुढाऱ्यांची भाषणं झाली. कोणी तरी आदिवासी पाहिजे; म्हणून लहानू कोमला भाषणाला उभे केले. तो नववी-दहावीपर्यंत शिकलेला होता. जोरदार बोलला. वारली बोलीतच. वारली पोरी आपसात त्याचं भाषण ऐकताना लाजत-खिदळत होत्या. लहानू हीरो असावा. तरुण होता. लग्न झाले नसावे. मेळावा पंचवीस-तीस हजारांचा झाला.

आम्ही रात्री मुंबईला परतलो.

नंतर कलकत्ता काँग्रेस झाली, नोव्हेंबर चौसष्ट. कार्यक्रम व जाहीरनामा पास झाला. जाहीर सभा झाली आणि पुढारी मंडळी कलकत्त्याहून परत आली. बिनधास्तपणे. नवीन क्रांतिकारक पक्ष स्थापन केल्याच्या समाधानात. डांगे आणि त्यांचे पित्ते यांचे उच्चाटन करून, सुधारणावादाचा नायनाट केल्याच्या समाधानात.

आणि अकस्मात एके रात्री एक वाजल्यापासून चार-पाच वाजेपर्यंत देशभर पोलिटिकल ब्रँचने सर्व पुढाऱ्यांच्या घरी धाडी घातल्या. बहुतेक जणांना झोपेतून उठवून, पकडून नेण्यात आले. दुसऱ्या दिवशी रात्री तोच प्रकार. सेकंड रँकला धरून नेले. क्रांतिकारक पक्ष स्थापन केल्याचे समाधान फार थोडाच काळ मंडळींना भोगायला मिळाले. थोडे लोक निसटले, घरी-दारी न सापडल्यामुळे; पण निदान हजार-बाराशे मंडळींची सरकारी मेहमान नवाझी सुरू झाली. पुढले दीड वर्ष.

सी. पी. आय. (एम्.)चा उभा राहतानाच भांडवलशाही सरकारने कणा मोडून टाकला होता.

डांगेवाद्यांनी बासष्ट साली 'चीनवाद्यां'च्या याद्या सरकारला पुरवल्या असा आरोप केला जाई. आता कोणावर आरोप करण्याचा प्रश्नच नव्हता. सगळा कारभार खुल्लम खुल्ला चालला होता. गुप्तता बाळगा म्हणून आमच्यासारखी काही नवीन व काही जुनी मंडळी अनेकदा बोलली होती; पण इलेक्शनबाजी व खुल्या संघटनांची आमच्या पुढाऱ्यांना इतकी सवय झाली होती की, त्यांनी गुप्तपणा कुठेच राखला नव्हता.

मला पकडण्यात आले नाही हे जरा चमत्कारिकच वाटले. मला नवीन गणले गेले असावे बहुधा.

त्यानंतर मुंबईच्या पार्टीची अवस्था फार दयनीय झाली. साधारण जाणकार तीन-चार मंडळीच बाहेर होती. बाकी आम्ही सगळे नवीन. वरळीच्या 'जनशक्ती'मध्ये मुंबई कमिटीचे ऑफिस होते. सेंचुरीगेटासमोर. धरपकडीनंतर पंधरा दिवस पार्टी-ऑफिसवर येण्याचे बहुतेक कॉम्रेड्सनी बंद केले. तिसरी धाड पडेल अशीही अफवा होती. वरळीचे काही कॉम्रेड्स व मी सोडून जनशक्तीवर

हार्दिक शुभेच्छा !

ठाकूर सावदेकर आणि कं. लि.

विड्यांचे कारखानदार

३७७, गुरुवार पेठ,
पुणे ४११ ००२

★

फोन नं.:– ३२३३७, ३२७१०

तारेचा पत्ता– 'धूम्रपान'

शुकशुकाट होता. मंडळीत थोडीफार घबराट पसरली होती.

जनशक्तीत इंजिनिअरिंग वर्कर्स युनियन व गिरणी कामगार युनियनचे मार्क्सवादी पक्षाच्या फ्रॅक्शनचे ऑफिस होते. नम्बियार अंधेरीची इंजिनिअरिंग युनिट्स संभाळीत होता. इंजिनिअरिंग युनियनचे पुढारी (वरळी शाखा) गोपालन पकडले गेले. त्यात युनियनचा सेक्रेटरी कॉ. कृष्णन् निसटला होता. कॉ. कोल्हटकरही. तेव्हा वकील, शिक्षित व थोडाफार जाणकार म्हणून युनियनची जबाबदारी माझ्यावर आली.

युनियनबाजीची मला पहिल्यापासून आवड नव्हती. अर्थवादाचे व नवसुधारणावादाचे अड्डे म्हणून आम्ही युनियन्सवर टीका करीत असू. त्यातल्या त्यात इंजिनियरिंग वर्कर्स म्हणजे कामगारांमधील वरचा वर्ग–'लेबर ॲरिस्टॉक्रसी.' राजकीय विश्लेषणानुसार क्रांतीचे विरोधक नसले तरी क्रांतीच्या बाजूचे नाहीत. मध्यमवर्गीय व बाजारी वृत्तीचे; पण दुसरे कुणीच नाही म्हणून मला ती जबाबदारी घ्यावी लागली.

अशारीतीने मी मारून–मुटकून ट्रेड युनियन फुलटायमर झालो.

तीन महिने मी ती जबाबदारी कशीबशी सांभाळली; पण मनच त्यात नव्हते. पार्टी संघटनेत काम करणे माझे ध्येय. हे भलतेच लचांड माझ्या गळ्यात आले होते. चार्जशीटला उत्तर दे, लेबर कमिशनरच्या ऑफिसात मालकांशी व त्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा कर, प्रसंगी कोर्टात ॲपियर हो, कारखान्यांवर गेटसभा घे असला फालतूपणा तीन महिने केल्यानंतर नम्बियारच्याही लक्षात आले की, कॉ. प्रधान नीट काम करीत नाही. त्याने मला जबाबदारीतून मुक्त केले.

त्यानंतर मी स्वतंत्र बिगरपगारी फुलटायमर झालो. सगळीकडेच आहे आणि कुठेच नाही.

जी काही छोटी तेरा–चौदाजणांची मुंबई कमिटी बनवली होती, तिच्याकडे पाहायला मला नम्बियारने सांगितले. तो अंधेरीला असायचा. सर्व युनियन्स त्याच्याच गळ्यात पडल्या होत्या. महिन्यातून दोनदा बैठका घ्याव्या लागत. निमंत्रणे पोचती होत. कारण महिन्याभरात वातावरण निवळल्यावर लोक परत जनशक्तीवर येऊ लागले होते. सलामदेखील अधूनमधून येत असे.

ज्याप्रमाणे उन्हाळ्यानंतर पावसाळा येतो त्याप्रमाणे जॉर्ज फर्नांडिस, डांगे आणि इतर डाव्या पक्षांच्या डोक्यात पावसाळ्याच्या अखेरीस मुंबई बंदचे वारे येई. त्या वेळी सर्वपक्षीय बैठक बोलावण्यात येई. बैठकीची भाषा मराठी म्हणून सर्व बैठकांना हजर राहायचे काम नम्बियार माझ्यावर टाके.

अशीच ऑगस्टअखेर एक बैठक आमदारनिवासावर झाली. डांगे, पाटकर, सोशलिस्ट पार्टीचे मधू लिमये, जॉर्ज फर्नांडिस; शेतकरी कामगार पक्षाचे एन. डी., उद्धवराव पाटील आणि कृष्णराव धुळप हजर होते. मार्क्सवादी कम्युनिस्टांतर्फे मी. हे कोण नवीन पोर म्हणून सर्वांनी माझ्याकडे पाहिले. मी म्हटले, मी सी. पी. एम. चा प्रतिनिधी आणि निमंत्रण दाखवले. मग रंग पालटला. कारण मी पोऱ्या राह्यलो नव्हतो. चर्चेला सुरुवात झाली आणि काही कळण्याच्या आत मधू लिमयेंनी राजकारण काढले. चीनवर घसरले आणि नुसते चीनवर नाही तर माझ्यावर–व्यक्तिशः नाही–पण असे



सलाम आणि मी प्रथमच चहा प्यायला हॉटेलमध्ये गेलो

¤

जोरात की, कुणाला वाटावे माझ्याशीच भांडताहेत. जॉर्ज कॉटवर शांतपणे पडून होता. या बैठकांत तो एक शब्दही काढत नसे. लिमयेच बोलायचे. डांगे आणि पाटकर हे शांतपणे बोलत. डांगेंचा नेहमीचा मिस्किलपणा वाक्यावाक्यात जाणवत होता. त्यांच्यापुढे मधू लिमये पोऱ्या वाटला. दोन–चार वाक्यांत त्याला डांग्यांनी गप्प केले आणि विषय वळणावर आला.

बैठकीचे वातावरण पाहून मला आश्चर्याचा धक्का बसला. राष्ट्रीय पातळीवरचे पुढारी पण ऑफिसर लोकांची चहापार्टी चालली आहे असे कॅज्युअल वातावरण होते.

बोलण्यात कसल्याशा मुद्द्यावरून उद्धवराव पाटील (शे. का. प. पुढारी) वैतागले डांग्यांवर.

'तुमचं ते लबाडीचं राजकारण इकडं आमच्याकडे खेळू नका!'

'अहो, राजकारण म्हणजे लबाडीच.' डांग्यांनी हसत हसत उत्तर दिले.

डांग्यांच्या तोंडी लागणे फार कठीण असे. साध्या डावात समोरच्या गड्याला उताणा करीत!

¤

आता काम विशेष नव्हतेच. अधूनमधून पार्टी-पुढाऱ्यांच्या सुटकेसाठी मोर्चे काढायचे.

त्यामुळे जनशक्ती गप्पा मारण्याचा अड्डा बनला. सलाम आला की आम्ही एका बाजूला बसून गप्पा मारीत असू.

सलाम डांगेंचा आणि डांगेवाद्यांचा कट्टर विरोधक होताच; पण मुंबईच्या आमच्या पुढारीपणावरही तो जबरदस्त घसरे. त्याच्याकडे तात्त्विक, राजकीय असे माझ्यासारखे मोजमाप नव्हते. सातवी-आठवी शिकला असेल-नसेल; परंतु वागण्यावरून माणसाची पारख करण्याची कला त्याला चांगली अवगत होती आणि बोलण्यात मागेपुढे करणे त्याला जमत नसे. स्पष्ट. मनातले बोलून टाकी. समोर कोणीही असो बाचकत नसे. प्रभाकर संझगिरी आणि कॉ. ओक सोडले तर त्याच्या हल्ल्यातून कोणीच सुटत नसे.

'अरे, कॉम्रेड परधान' सलामला प्रधान म्हणणे जमत नसे किंवा अवघड वाटे, 'साला डांगे तो खुल्लम खुल्ला बेईमान है. मजदूरोंसे और इन्कलाबसे. मगर ये तो फरेबी है. वरखा पहने हुवे. हमारे कालापानीमे या मदनपुरेमे आते है तो सिर्फ मालवालोंसे मिलकर पैसा लेके जाते है. तब इनको हम दिखाई नही देते. शैतान सिद्दीकके

यहाँ दावते खाते है. ईदमे तो खा खा के इनका पेट ओवरलोड हो जाता है.' सिद्दीक शैतान एक 'काला पानी' (आग्रीपाड्याजवळची मुस्लिम वस्ती) मध्ये राहाणारा पावरलूमचा श्रीमंत मालक होता. पार्टीचा मेम्बर अर्थात. त्याच्या काळ्या व भयानक चेहऱ्यामुळे त्याला 'शैतान' म्हणत. त्याचा आणि सलामचा छत्तिसाचा आकडा. सिद्दीक चरसी होता. दिवसभर चरसी मंडळी त्याच्याभोवती पडलेली असायची. पूर्वी सिद्दीक शैतानने अनेक दोन नंबरचे धंदे व दादागिरी केली होती. गेली दहा–बारा वर्षे तो पावरलूमच्या धंद्यात स्थिर झाला होता. बराच पैसा राखून होता. सलामला व्यसनाचा भयंकर तिटकारा आणि पैसेवाल्याचा !

जी गोष्ट मला तात्त्विक व राजकीय भूमिकेतून लक्षात आली होती तीच सलामने व्यवहारी चाणाक्षतेने ओळखली होती. पार्टी-बद्दल अनेक गोष्टी जुन्या-नव्या अनुभवाच्या, तो मला सांगत असे. मदनपुरा-अग्रिपाड्यात पार्टी जुनी होती. लहानपणापासून सलाम लालबावटेवाला झाला होता. त्याचे वडील गिरणीकामगार. साच्यावर काम करीत असत. त्यांच्या वस्तीमधील बरेच लोक गिरणीकामगार होते. सलाम माझ्यापेक्षा तीन-चार वर्षांनी मोठा. त्याला पन्नासचा गिरणीकामगारांचा संप चांगला आठवत होता. सतरा-एक वर्षाच्या सलामने त्यात हिरीरीने भाग घेतला होता. तेव्हापासून ते सद्य.काळापर्यंतच्या, अनेक, त्याच्या समोर घडलेल्या घटना तो मला सांगत असे.

पार्लमेन्टला कोणत्या जागेसाठी कोण उभे होते व कोण पडले यापासून कोठल्या संपात कोणी रस्त्यावर काय कामगिरी केली इतपर्यंत त्याला खडान्‌खडा माहिती होती.

सलामच्या नादाने मी हळूहळू मदनपुरा, आग्रीपाडा विभागाला भेट देऊ लागलो. तेथले जग वरून कितीही प्रथम दर्शनी वेगळे वाटले तरीही घरातील वातावरण, राहणीमान कामगार-कुटुंबाचे होते. मुस्लिम संस्कृतीची छाप अर्थात सर्वांवरच होती. धार्मिकपणाची पकडही जबर; पण सलाम धर्मविरोधक कारण कडवा कम्युनिस्ट. तो उघडपणे धर्मावर टीका करीत असे. मुस्लिम विभागात असे बोलणे म्हणजे काय चीज असते हे हिंदू मराठी माणसाना कळणार नाही–कामगार असले तरी. हिंदू लोक टीका ऐकून घेतात. मुस्लिम सनातनी, धर्माच्या प्रश्नावर संतापून मारामारीस तयार असतात; पण सलामला चॅलेंज करण्याची कोणाची ताकद नव्हती.

*याला केवळ त्याचा धाडसीपणाच कारण होता असे मात्र नाही.* वस्तीमधल्या कोणाचेही कसल्याही प्रकारचे काम असो. मग ते मयत पोचवण्याचे असो की म्युनिसिपालिटीत जाऊन खोली नावावर करून घेण्याचे. सलाम सदैव तयार असायचा आणि हातात घेतलेले काम तडीस नेण्याची त्याची प्रवृत्ती होती. अर्धवट सोडणे हा प्रकार नाही. मग कितीही मेहनत पडो आणि मोबदला वगैरेची भाषा कोणी केली तर त्याला तो सरळ हाकलून लावीत असे. प्रत्येक वस्तीत एखादा सामाजिक कार्यकर्ता असतोच; पण सलामसारखा सामाजिक-राजकीय कार्यकर्ता मी क्वचितच पाहिला आहे.

मला एका गोष्टीचे राहून राहून आश्चर्य वाटते. सलामला जाहीरनामा, थिअरी, टॅक्टिक्स वगैरे गोष्टी त्या स्वरूपात माहीत नसताना तो पार्टीच्या वेगवेगळ्या कालखंडाचा इतिहास इतका व्यवस्थित कसा समजून मांडू शके. मी सर्व जुने कागदपत्र मिळवून वाचून काढले; परंतु मलाही काही वेळा हा गोंधळ नीटसा समजत नसे. सलामकडे सर्व प्रश्नांची उत्तरे साध्या आणि सोप्या भाषेत उपलब्ध होती.

नंतर माझ्या लक्षात आले. पार्टीचे जीवन अत्यंत सूक्ष्मपणे व सर्वतोपरी जगणारा तो एक कॉम्रेड होता. एकावन्नसाली स्टालिनने पार्टीप्रमुख त्रयीच्या द्वारे पाठवलेल्या प्रोग्रॅमपासून आजपर्यंतचा इतिहास सलामला रामरक्षेसारखा पाठ होता. मी हे सर्व कळल्यावर गारच झालो !

अर्थात सनावळी, तारखा इत्यादी गोष्टीत तो तरबेज नव्हता; परंतु बी. टी. आर. ला अतिरेकी भूमिकेबद्दल पार्टीतून हाकून लावल्यापासून आजपर्यंतचा इतिहास त्याला व्यावहारिक स्वरूपात मुखोद्‌गत होता, स्वानुभवातून.

आजची टक्कर सुधारणावादी विरुद्ध क्रांतिकारक अशी व्हायला हवी होती हे त्याला मान्य होते; पण तसे घडले नाही ह्याबद्दल तो खिन्न असे.

'ये भी क्या पार्लमेंटवाले लोग है.' तो म्हणे. आणि गंमत अशी की सलाम प्रत्येक निवडणुकीत, मग ती म्युनिसिपालिटीची असो, विधानसभेची असो वा पार्लमेंटची. जातीने मैदानात हजर राही. त्याला कारण एकच. 'पार्टीने कह दिया, हमने काम किया.'

मुसलमान समाजाला जर थोडेफार समजून घ्यायचे असेल तर एक गोष्ट कायम लक्षात ठेवली पाहिजे. जर मुल्लांनी सांगितले– 'जिहाद' (धर्मयुद्ध) म्हणजे 'जिहाद'. कमी नाही जास्त नाही.

बी टी. आर. सलामचा मुल्ला होता.

परंतु वृत्तीने सलाम इतका लोकशाही प्रवृत्तीचा होता की, त्याला लोकशाही निवडणुकीतही भलताच रस वाटे. कोणाला किती मते मिळाली, महिंद्राशेट मध्यमुंबईतून उभा असताना डांगे किती मतांनी पडले हे त्याला पाठ होते. ही लोकशाही भांडवली लोकशाही आहे, हे अनेकदा त्याला समजावून सांगितल्यानंतर देखील त्याची त्या-विषयीची आवड कमी झाली नाही.

सलाम एक उत्स्फूर्त भावनापूर्ण जीवन जगणारा बेफाम कार्यकर्ता होता. फक्त कम्युनिस्ट पक्षाचा. दुसरा कोणाचाही नाही.

मी मध्यमवर्गीय किंवा हिंदु आई-बापाचा पोरगा. त्याबद्दल सला-मने कधी चकार शब्दही काढला नाही. माणसांची मने ही काचेच्या भांड्यासारखी असतात हे त्याला माझ्यापेक्षा जास्त माहीत होते. पार्टीत आल्यापासून प्रथमच माझ्या मनाला सुखावल्यासारखे वाटले की मी कोणी परका नाही. सलामने मला सामील करून घेतले. तो सर्वांना तसे करीत असे.

लम्बी सीमीटच्या समोरच्या फूटपाथवर बसून आम्ही दोघे तासन्‌तास पार्टी-राजकारणावर बोलत असू. पार्टीतल्या दुहीबद्दल सलामला कायम वाईट वाटे.

'दूसरी कॉंग्रेससे लेकर आजतक झगडते आये हैं. लाइनके बारेमे. मगर हमे कभी रिआसत न सिखाने आते हैं. आते हैं तो सिर्फ चंदेके लिये.'

बंगाल आणि केरळात पार्टी जोरात होती. त्याबद्दल मुंबईचे पुढारी फार फुशारकी मारत. त्याबद्दल सलाम म्हणे,

'क्या फायदा बोलनेसे ? हमारी पार्टी बंगालमे बडी है. केरलामे बडी है. यहाँपे तो कुछ भी नही. यहाँ बढाव पार्टीको.'

पार्टीचे दोन तुकडे झाल्याचे शल्य सलामच्या आणि मुस्लिम कॉम्रेडस्च्या मनातून कधीच गेले नाही.

पार्टी टूटनेसे इस शर्मायदारी सरकारको खुषी हुवी की, हमारी ताकद कम हो गयी. क्या खाक करेंगे सही लाइन लेकर?' सलाम म्हणे

'मगर सुधारवादियोंके साथ रहनेसे भी नुकसान होता है. लडनेकी ताकद कम होती है. सिर्फ जादा पार्टी मेम्बर लेके क्या फायदा अगर वो लडावू नही तो.'

पण उजव्यांमध्ये चागले कॉम्रेडस् होते. ते दूर गेल्याचे त्याला राहून राहून वाईट वाटे.

'कॉम्रेड पाटकर, बापूराव, गुलाबराव जैसे अच्छे लोगोंको ये साथ नही ला सके. समझा नही सके.' तो म्हणे.

हे तीन कॉम्रेडस् गिरणीकामगार युनिअनचे पुढारी होते. लोकांत मिसळून वागत. अतिशय पॉप्युलर. त्यामुळे व डाग्यांच्यामुळे मुंबईतील पार्टीची मुख्य ताकद–गिरणी कामगार युनिअन उजव्याकडे गेली. याउलट आमचे पुढारीपण. लोकांशी मिसळून वागत नसे, त्यावरच डांगेवादी बोट ठेवीत नेमके.

बी. टी. रणदिवे राष्ट्रीय पुढारी. मुंबईतले. कॉ. कोल्हटकर, कुरणे, अहिल्या रांगणेकर, डॉ. सावंत, प्रभाकर संझगिरी आणि ओक ही मुबईची डावी पुढारी मंडळी. त्यांना उजवी मंडळी सेक्टेरिअन, एकांगी म्हणत. त्यांच्या गट करून राहण्याच्या पद्धतीवर टीका करत. त्यांच्यातही आपसात कॉ. संझगिरी व ओक आतल्या सर्कलमध्ये नव्हते. बी. टी. रणदिवे तसे पाहिले तर वागायला फार चांगले; पण त्यांच्यातले व माणसातले अंतर कमी होत नसे. मला वाटते त्यात अन् मुबईच्या डाव्या पुढाऱ्यांच्या वागण्याच्या पद्धतीत महाराष्ट्रातील डाव्या पार्टीच्या दुर्दशेचे रहस्य लपले होते.

इंजिनिअरिंग युनियनच्या जबाबदारीतून मुक्त झाल्यावर कॉ. नरसय्यांच्या विनंतीवरून मी बिडी-कामगारात मिसळू लागलो. त्यांची अवस्था फार वाईट. जास्त कामगार आध्राचे व केरळचे. तेलुगु बायका अन् केरळीय मुसलमान. हजार विड्या वळल्यावर त्यांना अडीच ते साडेतीन रुपये मिळत. त्याचे अड्डे मुख्यत: एल्फिन्स्टन रोड, कामाठीपुरा व भेंडीबाजारात होते. मी बिडी कामगार युनियनचे काम करायचे ठरवले.

¤

एका जुनाट इमारतीत दुसऱ्या मजल्यावर एका प्रशस्त अशा खोलीत हे ऑफिस होते. त्याच्यासाठी उजव्या-डाव्यांच्या संघर्षात हाणामारी न होता डाव्यांनी ऑफिस कबजात घेतले होते. जी. एन्. रेड्डींची टेलरिंग वर्कर्स युनियन बंद पडली होती. रेड्डी एक जुना मिलिटंट कॉम्रेड. कॉर्पोरेटर होता. डांग्यांचा बॉडीगार्ड म्हणून प्रसंगी तयार असे. तो बिडी कामगारात काम करीत असे; पण तेही त्याने सोडले होते. पद्मा आणि शिवण्णा तेथील प्रमुख कार्यकर्ते. कामाठीपुऱ्याच्या परंपरेला शोभेल अशी त्यांची वर्तणूक. त्यातल्या त्यात शिवण्णाची. गुंड वाटे, गुंडासारखा बोले आणि थोडाफार गुंड बनूही शके. त्याच्याशी बोलून मी ठरवले की, फार वेळ न घालवता हा सेक्शन संघटित करता येईल. माझा अंदाज चुकीचा ठरला.


With
Best
Compliments
From—

**Vasant Talkies**
598 Budhwar Peth
**Pune 411 002**

*Phone :*
448047

Now Showing
**THE TRAIN**



दोन कॉन्स्टेबल्स आणि एक इन्स्पेक्टर पहाटे ४ वाजता घरी आले !

¤

जगात दोनच लोक सर्वज्ञ असतात. लौकिकदृष्टचा (आम्ही मानत नाही तरी) देव आणि माझ्या दृष्टीने विडीकामगार. निदान तशा थाटात वागतो तरी. बसल्या बसल्या दुनियेतील सर्व विषयांवर चर्चा करायची. एकीकडे हात चालू तर दुसरीकडे तोंड. अर्थात् मुख्यत: पुरुष कामगार. बायका गावच्या उखाळ्यापाखाळ्या काढून गप्पा मारतात. मुंबईत मोठा विडीकारखाना नाही. फार तर पंधरा-वीस जण असतात. त्यामुळे प्रवृत्तीने संघटनेस तयार नसतात. दुनियेतले शहाणपण सांगणार; पण कृती करायला सांगा; शंभरात पाच-दहाच तयार.

तो काळ माझ्या आयुष्यातील इतर अनेक काळांप्रमाणे एक भयानक स्वप्न होते. ह्यांना वेळ फक्त रात्री. बैठका तीनतीनपर्यंत चालायच्या पहाटेच्या. मग एकच संप आम्ही घडवू शकलो. मोठ्या कष्टाने. अडीचचे चार आणि साडेतीनचे सहा रुपये रोज करून घेतला; पण आमच्या यातना आम्हालाच माहीत !

सप्टेंबर १९६५ ला भारत-पाकिस्तान युद्ध पेटले. शास्त्री पंत-प्रधान होते. भारतीय सैन्य लाहोरच्या दिशेने आगेकूच करीत होते. सर्व धरपकडीत कॉ. इ. एम्. एस्. नंबुद्रिपाद यांनाच धरले नव्हते. मला वाटते आमच्यातले मवाळ म्हणून. ई. एम्. एस्. नी स्टेटमेंट काढले.

'सीमेवर जोशाने लढणाऱ्या आमच्या जवानांचे पार्टीतर्फे आम्ही अभिनंदन करतो.'

त्यानंतर ई. एम्. एस्. कलकत्त्याला गेले.

तेथील कॉम्रेड्स त्यांच्यावर तुटून पडले. गरीब बिचारा प्राणी. स्वभावाने अत्यंत शांत आणि प्रेमळ. ह्या तुफान क्रांतिकारकांसमोर त्याची फे फे उडायला लागली; पण आपल्या नेहमीच्या हुशारीने ई. एम्. एस्. नी परिस्थिती हाताळली. बंगालच्या कॉम्रेड्सच्या भूमिकेत एकसूत्रीपणा नव्हता. ह्या युद्धात आपण तटस्थ राहावे-पासून त्याचे लोकयुद्ध करावे इथपर्यंत विविध अतिरेकी भूमिका व वेगवेगळे म्हणणे प्रत्येकजण मांडत होता. 'तुम्ही तुमची भूमिका ठरवा. मग माझ्याशी बोला', असे सांगून ई. एम्. एस्. निसटले आणि मुंबईला आले.

मुंबईचे क्रांतिकारक आम्ही म्हणजे मीच फक्त. तटस्थ रहावे अशी माझी भूमिका होती. भांडवलशाही देश सीमांवरून नेहमीच युद्ध घडवीत असतात. त्यात सामान्य जनतेचा अथवा देशहिताचा सुतराम संबंध नसतो ही माझी तेव्हाची भूमिका. इतरांना माझे म्हणणे पटत नव्हते असे नाही. नम्बियार, बजाज वगैरेंना; परंतु चीनप्रकरणी जो आम्ही बेफाम मार खाल्ला होता—सरकारकडून आणि लोकांकडून—त्याची आठवण त्यांच्या मनात ताजी होती. आता पुन्हा नसते भूत कशाला उठवायचे अशी त्यांची व्यावहारिक भूमिका होती. आज मला ती पटते; पण तेव्हा मी कोणाचे ऐकायच्या मन:स्थितीत नसे. तत्त्व म्हणजे तत्त्व. नो कॉम्प्रॉमाइझ !

ई. एम्. एस्. मुंबईला आल्यावर आम्ही बी. सी. ची बैठक घेतली जनशक्तीमध्ये. बंगालमधून अतिरेकी स्टेटमेंट्स होत होती. शिस्त मोडन. ई. एम्. एस्. वर मी प्रश्नांचा भडिमार केला. मल्याळी कॉम्रेड्सना राग आला. मला गप्प बसवू लागले मी त्यांच्यावर प्रांतिक संकुचितपणाचा आरोप केला. केरळचा पुढारी म्हणून तुम्ही मला बोलू देत नाही. ई. एम्. एस्. म्हणाले, 'लेट हिम स्पीक. वी मस्ट फंक्शन डेमॉक्रॅटिकली.' ही गोष्ट त्यांची खास होती. पार्टी संघटनेच्या तत्त्वांचे अचूक व शब्दश: पालन करणे. मीही नरमलो. प्रश्नोत्तरे झाली. शेवटी बहुमताने मुंबई कमिटीने काहीच भाष्य न करणे योग्य असा ठराव झाला. भारत-पाक युद्धावर बी. सी. ने काहीच प्रेस स्टेटमेंट केले नाही. ई. एम्. एस्. दिल्लीला गेले.

पण बी. सी. ने स्टेटमेंट न काढणे हेही पाप होते. सर्व राजकीय पक्ष राष्ट्रप्रेमाने पेटले होते. त्यात आमचा सायलेन्स, ओरडण्यापेक्षा जास्त लक्षात आला. सरकारच्या आणि इतर पक्षांच्या. तिघांवर तिसऱ्या दिवशी सरकारी वॉरंट्स सुटली. मदन फडणीस, नम्बियार आणि मी. मदन फडणीस पार्टीचा मेम्बर म्हणण्यापेक्षा नातेवाईक. प्रभा सावंतचा भाऊ. कॉ. सुळेचांचा भाचा. अर्थात पूर्वी काम करीत असे; पण सध्या ट्रेड युनियन वकिली करायचा. पक्षसभासद असूनही कुठल्याही मीटिंगला हजर नसे. त्याला उगाचच बी. सी. चा मेम्बर केले होते. शोभा आणण्यासाठी. एकाही बैठकीला तो हजर नसायचा. त्याच्यावर बिचाऱ्यावर विनाकारण वॉरंट. नम्बियार जबाबदार माणूस, क्रियाशील म्हणून ठीक होते आणि मी आतापर्यंत नजरेत आलो होतो. नम्बियार सेक्रेटरी असला तरी स्टेटमेंट्स मराठीत काढा-यला लागत. त्याची भाषेची अडचण होती. त्याने मला सांगितले होते, 'फॉर सेक्रेटरी म्हणून स्टेटमेंटवर सह्या ठोकत जा;' पण प्रेस-वाल्यांनी घोटाळा केला. त्यांनी माझ्या फॉरकडे दुर्लक्ष केले आणि 'सी. पी. एम. चे मुंबई कमिटीचे सेक्रेटरी जयंत प्रधान' म्हणून लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स ह्यांनी आमची स्टेटमेंट्स छापली होती. जेलमध्ये बोंबाबोंब झाली. कुरणे, अहिल्याबाई यांनी विचारले, ह्याला सेक्रेटरी कोणी आणि का केले ? नम्बियारने उलट निरोप पाठवला, ही मुद्रा-राक्षसाची चूक आहे. प्रधानची किंवा माझी नाही; पण घडायचे ते घडले होते. सरकार-दप्तरी माझे नाव काळ्या यादीत उंचावर नेण्यात आले होते. म्हणून माझ्यावर वॉरंट. शिवाय मी सगळीकडे जात होतो. मुंबईभर डाव्या पक्षांच्या सर्वपक्षीय बैठकांना मीच

हजर रहात असे. कारण तिकडेही माध्यम मराठी.

हे सर्व सांगायचा उद्देश हा की, नंतर मुंबईच्या पुढारीपणाने उठवले, 'ह्याच्यावर वॉरंटच नव्हते. मुद्दामच भूमिगत गेला. रोमँटिक आहे.'

एके दिवशी पहाटे चारला पोलिटिकल ब्रँचचा एक सबइन्स्पेक्टर आणि दोन कॉन्स्टेबल्स आले. त्यातला एक कॉन्स्टेबलच मला ओळखत असे. मी बाहेर गॅलरीत झोपलो होतो. शेजारी माझा भाऊ. बॅटरीचा लाइट तोंडावर पडताच मी जागा झालो; पण डोळे उघडले नाहीत. इन्स्पेक्टरने दरवाजा ठोकला. वडील बाहेरच्या खोलीत आले. दिवा उघडला.

'जयंत प्रधान आहेत का घरी ?'

'ही काय भेटायची वेळ आहे ?' वडिलांनी चिडून विचारले.

'आम्ही पोलिटिकल ब्रँचचे लोक आहोत. त्यांना जरुरीच्या कामासाठी भेटायचे आहे.' प्रकाश एव्हाना जागा झाला होता. तो म्हणाला, 'तो जनशक्तीवरच झोपतो बहुतेक, तिकडे पहा !'

वडिलांनीदेखील चटकन टोन बदलला.

'ताबडतोब जा. पाच वाजता उठतो तो. गेटसभा घेण्यासाठी.'

पण सबइन्स्पेक्टरचा विश्वास बसेना.

'हे कोण ?' त्याने माझ्या तोंडावर बॅटरीचा झोत मारला. मी उठल्याचे सोंग केले. मी दाढी ठेवतो; पण मधूनमधून काढायची हुक्की येते. दाढी दोन दिवसांपूर्वी काढली होती.

'मी शरद जोशी. ह्यांचा मित्र. पुण्याला असतो.' मी म्हटले,

'ओळखतोस का ह्याना ?' इन्स्पेक्टरने मला ओळखणाऱ्या कॉन्स्टेबलला विचारले. मी उठून उभा राहिलो होतो; पण मुद्दामच गुडघ्यात किंचित वाकून. पायजमा होता. बुटका दिसण्यासाठी.

मला दुरून पाहणारा तो कॉन्स्टेबल गोंधळला. त्याने मला दाढी काढल्यामुळे व उंचीमुळे ओळखले नाही. मी सी. आय. डी. वाल्यांशी कधीच बोलत नसे, नजर व आवाजाचा परिचय होतो म्हणून. तो प्रथमच मला जवळून बोलताना पाहात होता.

'नाही साहेब !' तो म्हणाला.

तिघेही निघून गेले, खाली जीप होती तिच्यात बसून. माझ्यावर वॉरंट आहे असे ते बोललेच नाहीत. तसे माणूस भेटल्याशिवाय बोलत नाहीत. प्रचार करायचा नसतो. पकडायचे असते.

पाच मिनिटे मी बसून होतो. जीप गेल्याच्या आवाजानंतर उठून वडिलाना हाक मारली.

'मी जातोय. वॉरंट आहे.'

'सांभाळून जा. कदाचित खाली वॉच असेल.'

'मी मागल्या बाधावरून उडी मारून जाईन.'

दहा-पंधरा रुपये खिशात घालून त्याच कपड्यात मी खाली आलो. बाधावरून उडी मारून शांतिकुंजमधून बाहेर पडलो तो पास्ता रोडला. आंबेडकर रोडला टॅक्सी धरून सरळ मदनपुऱ्यात गेलो आणि मक्सूदला उठवले. मी एक्साइट झालो होतो; पण मक्सूदला त्याचे काहीच वाटले नाही. जन्मभर त्याने भूमिगत मंडळीना सांभाळले होते. आपली एक लुंगी आणि झब्बा त्याने मला दिला.

'ये पहनो और कोई पूछे तो नाम मोहन बोलना.'

मी कपडे बदलले. सात वाजता आम्ही बाहेर पडलो. दिवसा भूमिगत माणसाने फिरायचे नाही. डेनमध्ये बसून राहायचे वगैरे नियम मला माहीत होते. मी काचकूच करायला लागलो.

एव्हाना आम्ही आग्रीपाड्यात आलो होतो. सलाम भेटला. मक्सूद त्याला म्हणाला,

'ये कॉमरेड बिल्कुल डरपोक है. वॉरंट है तो क्या हुवा ? बिनधास्त घुमनेका !'

सलामचेही तेच म्हणणे होते.

'मगर पार्टीके रूलके मुताबिक वो गलत है,' मी म्हणालो.

'अरे जब रूल बनाये तो जमाना अलग था. अब बम्बई इतनी बढ गयी है और बस्तीभी. मैं खुद जब मेरेपे वॉरंट था तब यहाँसे एक मील दूर नागपेडेके फूटपाथपे सोता था ! किसीने कभी पकडा नही.'

डरपोक म्हटल्याचा मला राग आला होता; पण काही बोललो नाही.

¤

मी आलटून-पालटून सलामची लम्बी सिमिट चाळ, कालापानीतल्या म्युनिसिपल चाळी आणि मदनपुऱ्यात राहू लागलो. सलामची नोकरी नुकतीच सुटली होती. आमच्या लोकाना प्रीमियरमधून काढून टाकायचे धोरण आर. जे. मेहताच्या सांगण्यावरून प्रीमियरने अवलंबिले होते. त्यामुळे सलाम माझ्या सतत बरोबर असायचा. लग्न होऊन त्याला तीन मुले होती तेव्हा. इक्बाल, कमर आणि आशियाँ. बायकोचे नाव नूरजहाँ होते, मध्यम उंचीची आणि काळीसावळी.

दुपारभर मी सलामच्या घरी बसून असे पलंगावर गप्पा मारीत. सलामचा गप्पांचा स्टॉक कधी संपत नसे आणि पार्टी त्याचे जीवन होते. समाजकारणाव्यतिरिक्त मदनपुऱ्यात पक्षस्थापना कोणी केली; कशी केली, केव्हा केली यापासून ते आजतागायतचा इतिहास मी ऐकला गप्पा-गोष्टीच्या स्वरूपात. बोलण्यात वर्णनाचा आणि छोट्या छोट्या घटनाचा मसाला भरपूर असायचा. त्यामुळे कंटाळा येत नसे.

पण आमच्या बसण्यामुळे नूराभाभीची आणि मजल्यावरच्या तिच्या मैत्रिणीची अडचण होऊ लागली. सलामचे घर त्याचा दुपारी बसायचा आणि गप्पांचा अड्डा होता. त्या माझ्यावर वैतागत. कारण त्याना घरात येता येत नसे. इतरांच्या घरी इतके मोकळे वातावरण नसायचे. सलाम दुपारी बाहेर पॅसेजमधील खाटेवर झोपत असे; पण मी असल्याने त्याने झोपणे बंद केले. सर्व बायकांनी मला नाव ठेवले 'चिटकू !' हे मला नंतर कळले; पण मी भूमिगत आहे हे त्यांना सांगून समजणे शक्यच नव्हते. सलामने बायकांकडे दुर्लक्ष केले. आमची बैठक कायम चालू राहिली.

¤

रात्री आम्ही मदनपुऱ्यात फिरत असू. भारत-पाक युद्ध चालू होते. प्रत्येक घरात रेडिओ ट्रान्झिस्टरवरून जनरल आयुबखानची भाषणे ट्रान्समिट झालेली चवीनं ऐकली जात होती.

सलामच्या घरी मात्र असे कधीच घडले नाही. त्याबद्दल सलामला विचारले. तो म्हणाला,

'सब पागल है. समझते है पाकिस्तानसे खुदका रिश्ता है. मगर यहाँके लोग जब वहाँ जाते है तब वहाँ उनको इतनी तकलीफ होती है कि भागके वापस आते है. मुसलमान ज्यादा हुवे वहाँ तो क्या हुवा ? पाकिस्तान कभीभी हमारा नही हो सकता.' *

(उर्वरित भाग पुढील अंकी)



‘ गांधींचं चित्रण करताना ते होते तसे रंगवा, त्यांना देव बनवू नका, ’ असं पं. नेहरू अॅटनबरोंना म्हणाले होते. त्या व्यापक दृष्टिकोनातूनच आपण ‘ गांधी ’ चित्रपटाकडे बघू या.

# गोऱ्या गांधींची प्रतिक्षा

हेमंत देसाई
मीना कर्णिक

दक्षिण फ्रान्समधल्या आपल्या ऐसपैस घरात बसलेल्या रिचर्ड अॅटनबरोंच्या चेहऱ्यावरचे भाव झरझर बदलू लागले...

सुटी साजरी करण्यासाठी तिथे गेलेले अॅटनबरो...बाहेर सलग चार दिवस पावसाची धुम्मस...घरात कोंडून राहाण्याखेरीज पर्याय नव्हता. वेळ कसा घालवायचा ? घरातली सगळी पुस्तकं तर वाचून झालेली. इतक्यात कोपऱ्यात पडलेलं, लंडनला मोतीलाल कोठारींनी दिलेलं, लुई फिशरचं महात्मा गांधीवरचं पुस्तक त्यांच्या नजरेस पडलं.

अॅटनबरो पुस्तक चाळू लागले. चाळता चाळता त्यांची उत्कंठा वाढू लागली. कुठे तरी न पाहिलेल्या, न ऐकलेल्या अफाटपणाची जाणीव त्यांना झाली. अक्षरशः थक्क करणारा तो अनुभव होता. पान तेवीसवरच्या एका वाक्याने तर त्यांची नजर खिळवून ठेवली–

It never fails to amaze me how one human being can lift its head in dignity over the humiliation of other human.

हे वाक्य त्यांच्या मनात खोलवर भिनलं, भरलं. त्यांनी ताबडतोब कोठारींना फोन लावला आणि जोरात ओरडून सांगितलं, ‘ Beg, borrow or steal, I am making this film.’

हे सगळं घडत असतानाच लॉर्ड माउंटबॅटन भारतात यायची तयारी करत होते. ‘ गांधी ’वर चित्रपट काढायची अॅटनबरोंची इच्छा कोठारींनी लॉर्डसाहेबांच्या कानांवर घातली. भारतात आल्यावर काही दिवसांनी माउंटबॅटननी यासंबंधीचा एक कच्चा मसुदा पंडित नेहरूंच्या कानावर घातला. नेहरूंनी ताबडतोब कोठारींना आणि अॅटनबरोंना भेटायला बोलावले.

मग घटना कशा वेगाने घडत गेल्या.

१९६२ : नेहरू आणि अॅटनबरोंची भेट. गांधींवर सिनेमा निर्माण करायला नेहरूंची मान्यता.

नंतर काही वर्षं तशीच. स्तब्ध.

१९७७ : पंतप्रधान मोरारजी देसाईंची या चित्रपटास परवानगी. मात्र स्क्रिप्ट नजरेखालून घालण्याची त्यांनी व्यक्त केलेली इच्छा.

१९८० : पंतप्रधान इंदिरा गांधींची या सिनेमाला अर्थसाहाय्य देण्यास अनुकूलता. पण देशातल्या विविध क्षेत्रातल्या लोकांचा विरोध.

१९८२ : चित्रपट पूर्ण आणि प्रदर्शनाच्या बेतात.

### ‘ ट्रेड गाईड ’चं मत

आजवर चित्रपटाचे काही मोजकेच शोज झालेत. चित्रपटाबद्दल,चित्रपट पाहिलेल्यांच्या तोंडून चांगलंच ऐकायला मिळतंय. ‘ ब्युटिफुल ’, ‘ मार्व्हलस ’ याखेरीज कोणी काही बोलतच नाहीये.

सिनेमावाल्यांचं एक प्रातिनिधिक आणि प्रातिष्ठित नियतकालिक ‘ ट्रेड गाईड ’. त्यात आलेल्या परीक्षणात म्हटलंय, गांधी चित्रपटामुळं अवघं चित्रपटजगत स्तिमित होऊन राहिलंय. सर्व दृष्टींनी हा सिनेमा मास्टरपीस आहे याची खात्री पटते. या चित्रपटाचं हिंदी डबिंग जर तितकंच चांगलं झालं, तर तो भारतात उत्तम धंदा करील. वास्तवाशी राखलेलं इमान, वातावरणनिर्मिती, अभिनय आणि चित्रपटशैली, संवाद, व्यक्तिरेखा, हिंसा, देशभक्ती आणि भव्यता यांचं सुरेख मिश्रण या सिनेमात साधलंय. ’

गांधींचं स्क्रिप्ट, दिग्दर्शन, अभिनय आणि छायालेखन यांची मुक्तकंठानं स्तुती करताना हाँगकाँगमधील ‘ एशिया वीक ’ या साप्ताहिकानं लिहिलंय, ‘ सध्याच्या जागतिक

घडामोडींच्या संदर्भात या चित्रपटाला एक वेगळंच महत्त्व आलंय महात्मा गांधींचं काम करणारा बेन किंग्जले हा आपल्या भूमिकेत अगदी चपखल बसतो. तो केवळ गांधींसारखा दिसतो, असं नाही, तर तो खरोखरच गांधी 'झालाय' असं वाटतं.'

सिनेमाक्षेत्रावर ज्यांची खरी हुकमत चालते ते गुलशन राय, एफ. सी. मेहरा, सिप्पी, छाबूरिया आदी मंडळींनीही सिनेमाच्या बाजूनं अनुकूल अभिप्राय व्यक्त केलाय.

एकूण 'गांधी'चा टेम्पो तयार झालाय. हा सिनेमा पंतप्रधान इंदिरा गांधी व राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग तीस नोव्हेंबर रोजी नवी दिल्लीत बघतील. त्यानंतर दोन डिसेम्बरला लंडनला राजपुत्र चार्लस आणि लेडी डायना, तर तीन डिसेम्बरला वॉशिंग्टनला अध्यक्ष रेगन 'गांधीं'ना पाहतील. लॉस एंजलस, न्यूयॉर्क आणि टोरान्टो येथेही खास खेळ आयोजित करण्यात आले आहेत. त्यानंतर हा सिनेमा भारतात प्रदर्शित होईल आणि मग काही महिन्यांनी परदेशांत !

## 'कोलंबिया'कडे हक्क

या सिनेमाचे सगळे हक्क 'कोलंबिया फिल्म्स'ला विकण्यात आले आहेत. अॅटनबरोंनी ते कोलंबियालाच का दिले ? अॅटनबरो वॉर्नर ब्रदर्स, ट्वेंटिएथ सेंच्युरी फॉक्स वगैरे कंपन्यांकडेही गेले होते; पण कोलंबियानं देऊ केलेली किंमत त्यांना अधिक आकर्षक वाटली. कोलंबियाच्या जाहिरात-प्रमुख सुनू घडियाली यांच्या म्हणण्यानुसार कोलंबियाने रिचर्ड अॅटनबरोकडून ही फिल्म दोन कोटी वीस लाख डॉलर्संना विकत घेतलीये. यापैकी एक कोटी वीस लाख डॉलर्स एवढी रक्कम निव्वळ जाहिरातीवरच खर्च होणारेय.


अठरा कोटींची महत्त्वाकांक्षी फिल्म--जी जगभर प्रदर्शित होणारेय, तिची जाहिरात तशीच भव्यदिव्य असावी, अशी अपेक्षा असणं साहजिकच आहे. कोलंबियाच्या मुंबईतल्या कार्यालयात एक ब्रोशर लावलंय. संपूर्ण काळ्या रंगाच्या आयताकृती आर्टपेपरवर सर्वांत वरती अल्बर्ट आइन्स्टाइनचं एक वाक्य आहे, 'जनरेशन्स टू कम विल स्केअर्स बिलीव्ह दॅट सच अ वन अॅज धिस एव्हर, इन फ्लेश अॅन्ड ब्लड वॉक्ड अपॉन धिस अर्थ.' मध्यभागी गांधीजींचा छोटा कटआउट, मधेच 'गांधी' अ वर्ल्ड इव्हेंट ही अक्षरे आणि अगदी खाली 'अ फिल्म बाय रिचर्ड अॅटनबरो' असं लिहिलंय अन् सगळ्यात मागच्या बाजूला श्रेयनामावली.

या भव्य चित्रपटाचं हे एवढंसं ब्रोशर; पण त्यावरूनही वादळ माजलं. या ब्रोशरमध्ये अगोदर राणी दुबे आणि रविशंकर वगळता, एकाही भारतीयाचा नामनिर्देश नव्हता. या दोघांचाही उल्लेख होता तो यामुळे की, राणी दुबे बी. बी. सी. वर आहे तर रवी शंकर हे पाश्चात्यांच्या चांगल्याच परिचयाचे आहेत म्हणून, असं म्हटलं जात होतं. खरं तर राणी दुबे या सिनेमाची को-प्रोड्युसर असली, तरी सुरेश जिंदल हेसुद्धा असोसिएट प्रोड्युसर आहेत; पण त्यांचा उल्लेख नव्हता. जसे बेन किंग्जले 'गांधी' आहेत, तशी रोहिणीही 'कस्तुरबा' आहे; पण जिंदल, रोहिणी किंवा अन्य भारतीय काय, परदेशीयांना ठाऊक नाहीत, त्यामुळं ब्रोशरवर त्यांचं नांव नव्हतं. शिवाय ते ब्रोशर चित्रपटाशी संबंधित वर्तुळातच जाणार होतं, असं कारण पुढं करण्यात आलं.


नवीन ब्रोशरमध्ये मात्र सुरेश जिंदल आणि रोहिणी हट्टंगडी यांच्याबरोबरच रोशन सेठ, श्रीराम लागू, सईद जाफरी, अॅलेक पदमसी, अमरिश पुरी, ओम पुरी आणि गोविंद निहलानी यांचाही समावेश आहे हा बदल का केला गेला ? तर आता असा युक्तिवाद केला जातोय की, हे नवीन ब्रोशर सर्वत्र वितरित करण्यात येणार आहे, असा !

## डॉली ठाकोर

चित्रपटातल्या अभिनेत्यांचा विषय निघालाय, तर आता त्यांच्या निवडीबद्दल सांगायला हवं. या सिनेमात भारतीय कलावंत आहेत. अॅटनबरोंना त्यांची माहिती असणंच शक्य नव्हतं. मग निवड करणं तर दूरच ! नंतर कळलं, ही निवड अॅटनबरोने डॉली ठाकोरची मदत घेऊन केली. सर्वसामान्यांना डॉलीचा परिचय केवळ दूरदर्शनवरील इंग्रजी वृत्तनिवेदिका म्हणून असला, तरी रंगभूमीशी तिचा पूर्वीपासून संबंध आहे. यापूर्वीही डॉली ठाकोरने इंग्रजी निर्मात्यांना भारतीय कलावंतांची निवड करण्यात हातभार लावला होता. खरं तर अशा प्रकारची कामं करणं हा एक व्यवसाय होऊ शकतो; पण अजून तरी भारतीय



सर रिचर्ड
अॅटनबरो
वीस वर्षांचं झपाटणं



बेन किंग्जले आणि रोहिणी हत्तंगडी.

नट परदेशी चित्रपटांत फारसे चमकले नसल्यामुळे तूर्त तरी या व्यवसायास मर्यादा आली आहे.

डॉली ठाकोरचा इंग्रजी, हिंदी, मराठी आणि गुजराती रंगभूमीशी जवळचा संबंध आहे. त्यामुळं तिला ही निवड करणं सोपं गेलं. नेहरूंची भूमिका करणारे रोशन सेठ तिच्या वर्गातच होते. (बाय द वे, अमिताभ बच्चन, कबीर बेदी हेही माझ्या वर्गात होते, असं डॉली सांगते.)

सुरेश जिंदल हे ॲटनबरोचे दुसरे भारतीय सहकारी. 'रजनीगंधा' आणि 'शतरंज के खिलाडी' यासारख्या दर्जेदार चित्रपटांचे निर्माते. आता त्यांचा सई परांजपे-दिग्दर्शित 'कथा'ही येतोय. वयाच्या पन्नाशीच्या आसपास अशा तऱ्हेच्या चित्रपटांची जबाबदारी अंगावर घेणाऱ्या जिंदल यांच्याबद्दल मनात कौतुकाची भावना होती. नवप्रवाही चित्रपटांच्या दिग्दर्शकांचं 'एक धाडसी प्रयत्न' वगैरे म्हणून आपण कौतुक करत असतो; पण अशा चित्रपटांत ज्यांचे लाखो रुपये गुंतलेले असतात—एकप्रकारे ज्यांचे दगडाखालीच हात असतात, त्या या चित्रपटांच्या निर्मात्यांबद्दल आपल्या तोंडून एकही स्तुतीचा शब्द निघत नाही. जिंदल यांना भेटलो, ते या साऱ्या पार्श्वभूमीवर, अर्थात 'गांधी'मध्ये त्यांचा पैसा गुंतलेला नाहीये, असं नंतर कळलं.

जिंदल सांगत होते, 'रिचर्डची आणि माझी 'शतरंज के खिलाडी'च्या वेळेपासूनची ओळख. गांधींवर चित्रपट निर्माण करायचा आपला विचार आहे आणि त्यामध्ये तूही सहभागी व्हावंस' अशी इच्छा रिचर्डनं व्यक्त केली होती. प्रोजेक्ट तर चांगलंच होतं. अनुभवही चांगला मिळेल, असा विचार करून मी 'गांधी'मध्ये असोसिएट प्रोड्युसर म्हणून सामील झालो. वस्तुस्थितीशी शक्यतो फारकत न घेण्याचा कसोशीच्या प्रयत्न आम्ही केलाय. महात्माजींचं आयुष्य हे अत्यंत नाट्यपूर्ण होतं; परंतु आपल्याला वाटतं तितके गांधी सगळ्यांना माहिती नाहीत. सर्व जगाला त्यांची महती कळली पाहिजे. डेव्हिड लीननं 'लॉरेन्स ऑफ अरेबिया' निर्माण करण्यापूर्वी त्याविषयी तरी कुठे कोणाला माहिती होती?'

निर्माता म्हणून धंद्याच्या भाषेत न बोलता जिंदल 'गांधी' सिनेमाचं महत्त्व वेगळ्याच शैलीत सांगायला लागले. 'ब्रिटिशांच्या अत्याचारांविरुद्ध बोलताना जीना एकदा संतापानं 'जशास तसं'ची भाषा बोलू लागले होते. तेव्हा गांधीजींनी त्यांना सांगितलं, 'डोळ्याच्या बदली डोळा मागितला तर अख्खं जगच आंधळं होऊन जाईल!' सध्या हिंसाचारांचं थैमान चाललेलं दिसतं. माणूस असहाय झालेला दिसतो. 'आपण एकटे काय करू शकणार?' अशी प्रत्येकाची भावना दिसून येते. अरुण शौरीसारखा एखादाच अपवाद. गांधींचं आयुष्य पाहिल्यावर आपल्या हे लक्षात येतं की, नैतिक मनोबलांच्या जोरावरही माणूस बरंच काही करू शकतो. सध्या आलेली उदासीनता ही एक अशी चैन आहे, जी आपल्याला परवडणारी नाहीये. कारण त्यामुळे माणूस कृतिहीन होतो.'

एक सहनिर्माता म्हणून जिंदल या चित्रपटात सहभागी झाले आहेत. भारतीय व परदेशी चित्रपटनिर्मितीच्या पद्धतीतला फरक नेमका कसा आहे, कोणता आहे?

## डायनोसॉर इफेक्ट

'भारतीय चित्रपटनिर्मितीची पद्धत अत्यंत जुनाट व बेशिस्त आहे. आपल्याकडे अत्यंत अव्यवहार्य म्हणता येईल, अशी स्टार सिस्टिम आहे. त्यामुळे सिनेमाचं बजेट नको तितकं वाढतं आणि मग अपरिहार्यपणे 'डायनोसॉर इफेक्ट' होतो. म्हणजे असं की, डायनोसॉर हा प्राणी स्वतःच स्वतःचं अन्न वाढवत गेला आणि मग तो इतका वाढला की, त्यानं सगळा भोवतालच गिळून टाकला! शेवटी त्या वातावरणाचाच तो एक भाग झाला! हा डायनोसॉर इफेक्ट हिंदी चित्रपटांबाबत अनुभवास येत आहे. म्हणून वेळीच योग्य ती पावलं टाकायला हवी. आता ही गोष्ट हळूहळू आपल्या निर्मात्यांनाही जाणवायला लागलीये.'

जिंदल सांगू लागले, 'त्यांच्याकडे प्रत्येक गोष्टीचं अगदी योग्य पद्धतीनं नियोजन केलं जातं. तिकडे स्टार सिस्टिम नाही. नटांना सन्मानानं वागवलं जातं; पण वाजवीपेक्षा जास्त भाव दिला जात नाही. एक उदाहरणच देतो. 'गांधीं'चं वाहतुकीचं बजेट जेव्हा मर्यादेपेक्षा वाढायला लागलं, तेव्हा ॲटन-

-बरोंनी त्या खर्चावर कडक नियंत्रण लादलं. मुंबईत आम्ही हॉटेल सी रॉकमध्ये उतरलो होतो. एक दिवस लेडी अॅटनबरोला शहरात यायला गाडी हवी होती. (रिचर्डची बायको असून ती कधीही 'बॉस–वुमन'सारखी वागली नाही.) तिनं खाली ट्रान्सपोर्ट मॅनेजरला भेटून गाडी आणायला सांगितलं. मॅनेजरनं तिला बरं म्हणून हॉटेलच्या बाहेर आणलं. समोरून येणारी टॅक्सी थांबवली आणि त्यात बसवून दिलं. रिचर्डनं दिलेल्या कडक सूचनांना त्याची बायकोही अपवाद ठरू शकली नाही!'

जिंदल ही घटना सांगत असतानाच आम्हाला रोहिणी व जयदेव हट्टंगडी यांनी सांगितलेला दुसरा प्रसंग आठवला. पुण्याला शूटिंग चालू होतं. शूटिंग पाहायला ब्रिटनचे पंतप्रधान कॅलहन आले होते. रिचर्डचे ते व्यक्तिगत मित्र. ते आले या कारणामुळे शूटिंगच्या शेड्यूलमध्ये कोणताही बदल करण्यात आला नाही. इतकंच नव्हे तर जेवणाच्या रांगेत अॅटनबरोबर तेसुद्धा उभे राहिले होते.

' गांधी ' च्या निर्मितीची, त्यावरील खर्चाची कथा ही अद्भुत अन् उद्बोधक आहे.

'गांधीं'वर एकूण अठरा कोटी रुपये खर्च झालेत, हे सगळ्यांना ठाऊकच आहे. यापैकी चौऱ्याऐंशी लाख तर केवळ सेट्स उभारण्यासाठी लागलेत. त्यातले एकचतुर्थांश साबरमती आश्रम आणि जालीयनवाला बागेवर ओतण्यात आलेत.

दिल्लीत यमुनेच्या काठी काम चाललं होतं. १९४० सालच्या घटनेचा सेट बांधायचा म्हणजे काही चेष्टा नव्हती. बांधकाम पुरं झालं आणि दिल्लीकरांवर आश्चर्य करावयाची पाळी आली. गांधीजींचा साबरमती आश्रम त्यांच्यासमोर उभा होता आणि पार्श्वभूमी होती अहमदाबादेची. एक क्षण आपण गुजरातेत तर नाही ना, अशी शंका त्यांना चाटून गेली असेल ! आश्रमाला गुजराती फील यावा म्हणून चारशे फुटांचा अहमदाबादेचा कट आउट पाठीमागे लावलेला होता.

## जनरल डायरची व्यक्तिरेखा

तीच गोष्ट जालियनवालाबागेची. दिल्लीतल्या एका कॉलेजच्या आवारात या दृश्याचं चित्रीकरण झालं. चार भिंतीपैकी एक अख्खी भिंत अॅटनबरोंनी बांधून काढली होती. इथला सीनही तितकाच दर्जेदार झाल्याचे सांगण्यात येतं.

जनरल डायर आपल्या काही सैनिकांना घेऊन बागेपाशी येतो. जनरलच्या हुकुमानुसार सगळे सैनिक एका रांगेत उभे राहतात. एक जण त्याला विचारतो, ' इथे जमलेल्या लोकांना आपण सावध करणार आहोत का ?' ' त्याची गरज नाही. आपला नियम हीच सूचना होती. आता नियम तोडून ते एकत्र जमलेत. त्यांना शिक्षा व्हायलाच हवी. एवढं बोलून तो ओरडला, ' फायर' ! आणि त्यानंतर लहान – थोरांचा माजलेला एकच हलकल्लोळ !

यापुढचा शॉट आहे न्यायालयातला. जनरल डायरवर खटला भरण्यात आलाय. तू इतक्या क्रूरपणे का वागलास याचं उत्तर ' मला त्याना कायमचा धडा शिकवायचा होता ' असं डायर देतो. तेराशे गोळ्यांनी बाराशे माणसांना घायाळ करणारा डायर थोडासा सिनिकंच दाखवलाय. ' ज्यांनी मागितली त्यांना मी मदत केली ' डायरच्या या उत्तरावर न्यायाधीश त्याला प्रश्न करतात, ' जनरल, एखाद्या अडीच वर्षाच्या, थ्रि नॉट थ्रि बुलेटने जखमी झालेल्या छोट्या मुलाने तुमच्याकडे मदतीसाठी अर्ज करावा, अशी तुमची अपेक्षा होती काय ? ' डायरचं मौन आणि किंचित ढळणारा त्याचा डावा डोळा.

जनरल डायरची भूमिका केलीये एडवर्ड फॉक्सनं. एका इंग्रजानं बनवूनही हा चित्रपट कसा ब्रिटिशधार्जिणा नाहीये, याचा पुरावा म्हणून जयदेवनं हे दृश्य आम्हाला सांगितलं होतं.

¤

सेट्स उभारण्यापेक्षा पटकथा 'बांधण्याचं' काम जास्त जबाबदारीचं आणि जिकिरीचं. कारण त्यावर चित्रपटाची अख्खी इमारत उभी असते. सुरुवातीला ' गांधी ' वर रॉबर्ट बोल्टनं बरंच काम केलं आणि जॉन ब्रायलीनं ही पटकथा पूर्ण केली.

गांधी हीसुद्धा अगदी मागल्या शतकाच्या घटनांवर आधारित असलेली फिल्म नसून, अवघ्या चौतीस वर्षांपूर्वी जे अफाट जीवन संपुष्टात आणलं गेलं, ते चित्रित करणारी ही फिल्म आहे. तेव्हा त्यात तर घटना, त्यातील तपशील यात चुका होऊन चालण्यासारखं नव्हतंच, नाही.

गोनीदांनी लिहिलेलं गाडगेमहाराजांचं चरित्र किंवा माळींनी लिहिलेलं जोतिबा फुल्यांचं चरित्र यात वस्तुस्थितीचं यथार्थचित्रण नाही. तपशिलाच्या बऱ्याच चुका आहेत. अशी नुकतीच खूप टीका झाल्याचं या निमित्तानं स्मरतं. गांधी हा तर मोठा व नाजूक विषय. त्यामुळे अॅटनबरोंनी अशा चुका राहू नयेत यासाठी साहजिकच विशेष दक्षता घेतली.

त्यांनी गांधी पीस फौंडेशनचे अध्यक्ष राधाकृष्ण, नेहरू मेमोरियल लायब्ररीचे अध्यक्ष बी. आर. नंदा तसेच प्रा. स्वामी नाथन प्रभृतींना स्क्रिप्ट दाखवलं. माहिती व नभोवाणी खात्याला तर ते देणं सक्तीचंच होतं. पंतप्रधान इंदिरा गांधींनीही दोन रात्री मिळून स्क्रिप्ट वाचलं व त्यांना ते आवडलं असं सांगितलं जातं. गांधीजींच्या काळातले बरेच लोक अजूनही जिवंत आहेत. अगदी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेल्या सामान्य जनांपासून गफारखान, प्यारेलाल यांच्यापर्यंत अनेक हे सुद्धा अॅटनबरोंनी घेतलेल्या खास दक्षतेचसुद्धा एक कारण एक असावं.

त्यानंतरचं काम होतं. चित्रीकरणाची स्थळं शोधण्याचं, निवडण्याचं. केवळ लंडनच नव्हे तर दिल्ली, हरयाणा, पाटणा, मुंबई, पुणे वगैरे ठिकाणी शूटिंग करण्यात आलंय. कस्तुरबाच्या स्वयंपाकगृहातल्या दृश्यासाठी अमल व निस्सार अलना या सेटड्रेसर्सनी अहमदाबादेत बरेच दिवस खर्च केले. प्रत्यक्ष चित्रीकरण-स्थळांची रेखाचित्रं काढून झाल्यानंतर, ह्याप्रमाणे सेट उभारण्याचं काम डिक फ्रिफ्ट हा कन्स्ट्रक्शन-मॅनेजर करत होता. वस्तुस्थितीला कोणत्याही प्रकारे बाधा येणार नाही, अशा पद्धतीनं सेट उभारून घेण्याचं काम त्याचं. फ्रिफ्ट हा कोणी सोम्यागोम्या नाही. स्टार वॉर्स, पॅपिलॉन यासारख्या वड्या सेट्सना बरंच महत्त्व असलेल्या चित्रपटांची कामं त्यानं केली आहेत. हे सिनेमे पाह्यल्यावर, फ्रिफ्टने ही आव्हानं यशस्वीपणे पेलली आहेत, असंच म्हणायला लागेल.

साबरमती आश्रम व जालियनवाला बाग सध्या आहे त्या स्थितीत शूटिंगच्या दृष्टीनं योग्य नाही. हा आश्रम हरयानाच्या सीमेपाशी उभारण्यात आला, तर जालियनवाला बाग दिल्ली कॉलेजमध्ये निर्माण करण्यात



जालियनवाला बागेतलं एक महत्त्वपूर्ण समुहदृश्य

आली. सिनेमाचे आर्ट डायरेक्टर नॉर्मन डॉर्मे यांनी दिलेल्या माहितीनुसार तर गुरुगाव-जवळच्या छोटचा रेल्वेस्टेशनचं रूपांतर दक्षिण आफ्रिकेतल्या एका स्टेशनात करण्यात आलं आणि पुण्याजवळच्या काही रस्त्यांचा उपयोग जोहान्सबर्गचा फील आणण्यासाठी येणार होता.

एकूण १८९ दृश्यांसाठी १३५ सेट्स उभारण्यात आले. अर्थात पोरबंदर, कुतुबमिनार, लाल किल्ला, जुन्या दिल्लीचं रेल्वेस्टेशन यांसारख्या प्रत्यक्ष घटनास्थळांचाही उपयोग करून घेण्यात आलाय. आपल्याकडे सुदैवानं ही स्थळं सिनेमात वापरण्याइतकी जशीच्या तशी शाबूत राहिली हे विशेष. इथं आपल्या देशाचा अवमान करायचा म्हणून हे म्हटलं नाही, तर भारतातल्या अनेक ऐतिहासिक स्थळांची जी दशा झालीये, त्यावरून हे मत नोंदवलं. जुनी स्थळं जशी वापरण्यात आली; तशीच वास्तवता यावी या दृष्टीनं 'नेहरूं'ची जुनी रेनॉल्ड मोटर किंवा तत्कालीन रेल्वे इंजिनं, यांचाही वापर करण्यात आलाय.

गांधीजींचं जीवन हे जमावातलं जगणं होतं. राजवाड्यातलं राजकारण नव्हतं. त्यामुळं त्यांच्यावरील सिनेमात समूहदृश्यं बरीच असणं स्वाभाविकच होय. भारतातल्या विविध भागांतली आंदोलनं, सभासंमेलनं, आश्रमातली वेगळी राहणी तसंच देशात–परदेशात गोऱ्या साहेबांबरोबरच्या बैठका असं हे गांधीजींचं जीवन. त्यामुळं कितिकांच्या व किती प्रकारच्या वेषभूषा असतील हे मोजण्यापलीकडचंच.

पुन्हा १८८५ ते १९४८ असा गांधीजींच्या आयुष्याचा पट लक्षात घेऊन त्या वेळच्या रंग व वेषभूषेच्या पद्धती बारकाव्यांसकट साकारणं आवश्यक. वेषभूषेवरच १८.५० लाख रुपये खर्चिण्यात आल्याचं कळलं. भारतात ६५० पाश्चात्य शैलीचे पुरुषांचे सूटस्, शेकडो हॅटपिन्स, हजारो लेडीज ग्लोव्हज व हॅन्डबॅग्जचे जोड, शेकडो चपलाबूट तसंच ब्रिटिश इंडियन आर्मीतले गणवेष आणण्यात आले.

टेलरिंगचं बरंचसं काम भारतात, तेही दिल्लीतल्या 'अशोका' सारख्या बड्या हॉटेलात झालं. अनेक छोटचा भूमिकांच्या वेषभूषेचं काम इथं, तर मोठ्या व्यक्तिरेखांचे उदाहरणार्थ जीनांचा पोशाख लंडनला तयार करण्यात आले.

कॅमेरे लाइटस, ध्वनिमुद्रणसामग्री स्वयंपाकाच्या वस्तू, कपडेपट, एक हजार अॅम्पिअरचा जनरेटर, खाद्यपदार्थ टिकावेत म्हणून रेफ्रिजरेशनची व्यवस्था असलेला ट्रक आदि २० हजार कि. ग्रॅ. चा माल विमानानं भारतात आणण्यात आला. डिझायनर्स, कन्स्ट्रक्शन-इंजिनियर्स, कॅमेरामन, लाइट एक्स-पर्टस, सेट ड्रेसर्स कन्टीन्युइटी गर्ल्स, फोटोग्राफर्स, फिनॅन्शल मॅनेजर्स, केटरर्स, ट्रान्स्पोर्ट मॅनेजर्स, पब्लिसिस्टस, पर्सनल असिस्टंटस, स्टंटमन आणि शिवाय हजारो सुतार, इलेक्ट्रिशियन्स व अन्य मजूर. असा हा सर्व जथा प्रॉडक्शन-मॅनेजर कसा काय सांभाळत असेल, हे एक अॅटनबरोच जाणे !

गांधीजींच्या अन्त्ययात्रेतल्या भव्य दृश्याच्या वेळी तर या सर्वांचं कसब पणास लागलं असेल !

जमाव-दृश्यात पुढच्या ओळीत उभे राहणाऱ्या एक्स्ट्रॉजना रोज ७५ रुपये तर अन्य एक्स्ट्रॉजना रोज पंधरा रुपये, शिवाय दोन्ही वेळचं जेवण मिळालं. जणू काही बागायती भागातली रोजगार हमीच; पण एवढे लोक आणायचे कुठून ? त्यासाठी व्यावसायिक 'क्राऊड कलेक्टर्स' नेमण्यात आले. खेड्यापाड्यांतून लोक गोळा करण्यासाठी त्यांना प्रत्येक माणसामागे तीन रुपये देण्यात आले. अशा एकूण एक्स्ट्रॉजची संख्याच तीस हजार भरते !

आपल्याकडेही अनारकली, पाकिझा, मुगले आझमसारखे भव्य चित्रपट निर्माण होतात. ते निश्चितच दर्जेदार आहेत; पण वर्षानुवर्षे सिनेमे रखडले गेले. अभिनेत्यांच्या लहरी किंवा कमाल अमरोहीसारखा विक्षिप्त कलावंत आपल्याला हवं तसं, हवं तेव्हा; हवं तितका वेळ काम करतात. तेव्हा पाकिझासारखा चित्रपट दहा-दहा वर्षे का नाही रखडणार ? राजकपूरच्या 'मेरा नाम जोकर' किंवा अन्य अनेक चित्रपटांबाबत हेच सांगता येईल.

या संदर्भात गांधींचं स्क्रिप्टिंग सोडा; पण प्रत्यक्ष शूटिंगचं काम ज्या वेगानं, झपाटयानं व व्यवस्थितरीत्या पूर्ण करण्यात आलं, त्याचं कौतुक वाटतं. हा गुण खरोखरच आपण आत्मसात करण्यासारखाच.

आता हा व्यवस्थितपणा म्हणजे नेमकं काय? सुरेश जिंदल यांनी तर 'लष्करातच आढळणारी शिस्त व सुसंघटितपणा' या शब्दांत त्याचं वर्णन केलं. रोहिणीनंसुद्धा सांगितलं की, हॉटेलात शूटिंगशी संबंधित प्रत्येक कलावंताच्या खोलीत वॉकी-टॉकी असे. त्यावरून शूटिंगच्या वेळेची कलाकाराला पुन्हा पुन्हा आठवण करून देण्यात येई म्हणजे रोहिणी, खोलीतून लगेच नीघ; रोहिणी खोलीबाहेर पडलीये, रोहिणी जिना उतरू लागलीये. रोहिणी हॉटेलच्या दाराशी आलीये, ते रोहिणी मोटरीत बसून लोकेशनवर येत आहे, इथपर्यंत प्रत्येक हालचाल जणू वॉकी टॉकीवर नोंदवली जाई.

डॉलींनी दिलेल्या माहितीनुसार तर प्रत्येक कलावंताच्या खोलीत एक कॉल-शीट असे. त्यात दिग्दर्शक-छाया-लेखकांची नावं, तुम्हाला कोणत्या वेळेस चित्रीकरण-स्थळी नेण्यात येईल, मेकअप-रूममध्ये किती वाजता जावं लागेल इत्यादि माहिती असे. पुन्हा शूटिंगपूर्वी असिस्टंट डायरेक्टर येऊन कलावंताची विचारपूस करे, त्याला रिलॅक्स करे. जयदेवनं ही सर्व विचारपूस अभिनयासकट करून दाखवली आणि आपल्याकडच्या असिस्टंट डायरेक्टर्समध्ये हे सोफिस्टिकेशन, अदब वगैरे आढळून येत नसल्याचं सांगितलं.

## मोटारींचा ताफा

कलावंत आणि तंत्रज्ञांना चित्रीकरणस्थळी न्यायचं म्हणजे मोटारींचा ताफाच आवश्यक होता. शिवाय ॲटेनबरोंनी बसेसचं रूपांतर खाजगी गाड्यांत केलं. त्या वातानुकूलित होत्या. प्रत्येकाची सीट ठरलेली असे. हे सर्व काम त्यासाठी नेमलेला ट्रान्स्पोर्ट-मॅनेजर बघे.

एकूण सर्व लष्करी शिस्तच! एकदा शूटिंगला रोहिणीला तीन मिनिटांचा उशीर झाला, तेव्हा ॲटनबरोंनी त्याचा उल्लेख केला. झालं. दुसऱ्या दिवसापासून रोहिणी सर्वांच्या आधी तयार व इतरांनाच वेळेची जाणीव करून द्यायला लागली......!

## 'गांधी' कामाला लागले


या संदर्भात 'गांधी'च्या बाबतीत घडलेला एक प्रसंगच सांगायला हवा. संध्याकाळ झाली होती आणि उन्हं उतरायच्या आत शूटिंग पूर्ण करणं आवश्यक होतं. आर्ट-डायरेक्टरनं ताबडतोब एका लोकेशनवरून दुसरीकडे जायची सूचना दिली. सगळेजण कामाला लागले. 'गांधीं'नी कॅमेरा बॉक्स उचलला, लेडी ॲटनबरोंनी स्वत: काही सामान उचलून नेलं. इतके हात कामाला लागल्याबर लोकेशन तीन मिनिटांत रिकामं न झालं, तरच नवल. यातली महत्त्वाची गोष्ट अशी की, मी अमुक आहे म्हणून तमुक काम करणार नाही, असे नखरे न करता प्रत्येकानं कामाला हातभार लावल्यावर काहीच अशक्य नसतं.

अर्थात कॅमेरा-बॉक्स उचलण्यासारख्या किरकोळ गोष्टीच बेननं केल्या नाहीत, तर तो खरोखरच गांधीमय झाला हाता सकाळी उठल्यावर दर दिवशी दोन तास तो योगासनं करायचा, बेनच्या म्हणण्यानुसार योगांमुळे त्याच्या पाठीचा आजार तर बरा झालाच, शिवाय त्याची एकाग्रशक्तीही वाढली आणि आपल्यात मानसिक बदल झालाय, असं त्याला वाटू लागलं. प्रत्येक दिवशी कमीत कमी दोनशे माणसांचं जेवण शिजत असताना बेन आणि रोहिणी मात्र डायटिंगवर होते. दोघांनी प्रत्येकी आठ किलो वजन कमी केलं. बेन या काळात शाकाहारी बनला. उकडलेल्या भाज्या, दूध, फळांचा रस वगैरे. शूटिंग नसलं की, बेन एका खोलीत जाऊन सूत कातायचा. या खोलीत फक्त गांधीजींचा फोटो लावलेला असे. बापूंसारखीच उकिडवी मांडी घालून बसण्यासाठी बेनला सुरुवातीला खूप कष्ट पडले; पण प्रयत्नपूर्वक तो तसं बसायला शिकला.

छत्तीस वर्षांचा बेन तसा भारतीयच! त्याचे आजोबा इथले, पण तो मात्र इंग्लंडमध्येच वाढला. बेननं रॉयल शेक्सपियर कंपनीच्या नाटकांत बरीच कामं केलीत.

स्वभावाने बेन शांत आणि संवेदनाक्षम मनाचा आहे.

बेनच्या बौद्धिक आणि अभिनयक्षमतेबद्दल



**रोशनशेठ**
**नेहरूंची भूमिका हे एक जबरदस्त आव्हान होतं.**

ॲटनबरोंना आधीपासूनच आत्मविश्वास वाटत होता. गांधींमध्ये सतत जागरूक असलेल्या अध्यात्मिक जाणिवांचं प्रतिबिंब बेननं आपल्या अभिनयात दाखवून दिलंय आणि ते पाहून मी चकितच झालो. असं ॲटनबरो म्हणाले. ॲटनबरोंनी बेनला पीटर ब्रुकच्या 'अ मिडसमर नाईट्स ड्रीम' मध्ये पहिल्यांदा बघितलं; 'पण बेनने साकार केलेला हॅम्लेट पाहिला आणि मी त्याचा ह्या भूमिकेसाठी गंभीरपणे विचार करू लागलो' असं ॲटनबरो सांगतात. बेनला जेव्हा ॲटनबरोंनी ही ऑफर दिली, तेव्हा 'it was like being ask to walk with God' असं आपल्याला वाटल्याचं बेन सांगतो.

गांधींच्या नातवाला–राजमोहन गांधींना–जेव्हा तो भेटला, तेव्हा "एक अदृश्य शक्ती तुझ्यावर लक्ष ठेवून असेल" अशी भावना राजमोहननी व्यक्त केली होती. "हे थोडं विचित्र वाटेल; पण खरोखरच कोणी तरी अती दिव्य शक्ती मला मार्गदर्शन करत असल्याची सतत जाणीव होत होती' – इति बेन.

### नेहरूंचं आव्हान

गांधी आणि कस्तुरबा यांच्या खालोखाल या चित्रपटात महत्त्वाची भूमिका आहे नेहरूंची. हे काम केलंय रोशन सेठनं. गांधींपेक्षाही नेहरूंना ओळखणारी, पाहचलेली माणसं आज जास्त आहेत. त्यामुळं खरे नेहरू समोर असताना, नेहरूंची भूमिका करणाऱ्या नटाला बघायचं. म्हणजे त्यातला विरोधाभास जास्तच स्पष्ट होणार. त्यामुळं रोशन सेठला ही भूमिका हे एक जबरदस्त आव्हानच होतं.

रोशननं इतिहास घेऊन एम. ए. केलं आणि १९६४ साली (हे नेहरूंचं मृत्यु–साल) भारत सोडून तो इंग्लंडला गेला. अभिनयाचं शिक्षण त्यानं 'लंडन ॲकॅडमी ऑफ म्युझिक ॲन्ड ड्रॅमॅटिक आर्ट' या संस्थेत घेतलं. त्यानंतर दूरदर्शनवर, तसंच छोट्या–छोट्या नाटकांमधून तो चमकू लागला. रॉयल शेक्सपिअर कंपनीबरोबर तो जगभर एक फेरीही



## रोहिणी हत्तंगडी :

# 'जस्ट फॅन्टास्टिक'

'शी इज माय गर्ल' असं रिचर्ड ॲटनबरो जिच्याबद्दल म्हणाले ती रोहिणी हट्टंगडी समोर बसली होती. साऱ्या जगाचं लक्ष वेधून घेणारी ही ॲटनबरोंची 'कस्तुरबा' वडाळयाच्या छोट्याशा घरकुलात राहातेय, याचा आसपासच्या लोकांना थांगपत्ताही नव्हता! शेवटी एक छोटासा, चुणचुणीत मुलगा पुढं आला व म्हणाला, 'रोहिणी हट्टंगडी? ती गांधी फिलममध्ये काम केलेली का?' आणि त्यानं पत्ता सांगितला.

तर, घरेलू मूडमध्ये असलेली रोहिणी. गोरीपान, गर्भारपणामुळं सुस्तावलेली. चेहऱ्यावरून ओसंडून जाणारा सात्त्विकपणा अन् गोडवा. अवघं व्यक्तिमत्त्वंच पारदर्शी. गप्पा मारायची केव्हाही तयारी असावी, असा मूड आणि त्याच्या दुप्पट जयदेवचा–तिच्या नवऱ्याचा––उत्साह.

एकदम आठवला तो रोहिणीचा 'सदाशिवपेठ ते गांधी'पर्यंतचा प्रवास. मंगेश तेंडुलकरांच्या 'रात्र' अन् त्यासारख्या अन्य नाटकांतून काम करणारी छोटीशी रोहिणी, प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक कृष्णदेव मुळगुंदांकडे नृत्य शिकणारी रोहिणी, घरातल्या नाटकाच्या वातावरणात वाढलेली रोहिणी, दिल्लीतल्या 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'मध्ये अल्काझींसारख्या नाट्यगुरूंच्या हाताखाली घडलेली रोहिणी, मग छबिलदासच्या चळवळीत झोकून देऊन 'चांगुणा'सारख्या नाटकांतून आपल्या उत्कट अभिनयाची प्रेक्षकांना जाणीव देऊ लागली. नंतर कस्तुरीमृग, रथचक्र, यक्षगान आदी व्यावसायिक नाटकांत भूमिका अन् 'अरविंद देसाई की अजीब दास्ताँ' वगैरे प्रायोगिकपटांत केलेली कामं...

या तिच्या प्रवासातल्या अखेरच्या टप्प्याबद्दल भलतंच कुतूहल होतं रोहिणी बोलू लागली...

'मी तुम्हाला सगळं पहिल्यापासूनच सांगते. थिएटरमुळं डॉली ठाकोरची आणि माझी थोडीफार ओळख होतीच. बाय द वे, 'गांधी'चं Indian casting तिनंच केलंय. त्यामुळं डॉली कस्तुरबाच्या शोधात होती. स्मिता आणि भक्तीबरोबर तिनं माझीही शिफारस रिचर्डकडे केली. तेव्हा माझे 'रथचक्र'चे प्रयोग जोरात चालू होते. डॉली रिचर्डला घेऊन एकदा 'रथचक्र'च्या प्रयोगाला आली होती. मग रिचर्डची भेट झाली आणि नंतर मी स्क्रीन टेस्टसाठी लंडनला गेले.'

जयदेव तेवढयात हस्तक्षेप करत म्हणाला, 'डॉलीची घरी तार आली होती. त्यात तिनं ताबडतोब रोहिणीला फोन करायला सांगितलं होतं. त्याप्रमाणे आम्ही तिला कॉन्टॅक्ट केलं. डॉलीनं जेव्हा फोनवर 'you are going for the screen test' असं सांगितलं, तेव्हा रोहिणी इतकी बावचळून गेली की, पटकन 'स्पीक विथ जयदेव' असं सांगून तिनं फोन चक्क माझ्या हातात कोंबला.'

मारून आलाय. चार वर्षांपूर्वी तो भारतात परतला. सध्या रोशन 'इंडियन इंटरनॅशनल सेंटर' या त्रैमासिकाचा संपादक आहे.

खरं म्हणजे रोशन खऱ्या पंडितजींपेक्षा एखादाच इंच बुटका आहे. पण चित्रपटात त्याचं बुटकेपण जास्तच जाणवतं. याचं कारण म्हणजे बेनची उंची. बेन गांधीजींपेक्षा किंचित जास्त उंच आहे; 'ॲक्टिंग इज माय फर्स्ट लव्ह' म्हणणाऱ्या रोशनला नेहरूंनंतर फारशा भूमिका मात्र मिळालेल्या नाहीत.

## पास्कलचा प्रयत्न

— तर पोरबंदरचा एक मध्यमवर्गीय मुसाफिर मोहनदास करमचंद गांधी. तो वकील होऊन दक्षिण आफ्रिकेत गेला. तिथे रेल्वेत, रस्त्यांवर, हॉटेलात त्यानं फक्त अवहेलना अनुभवली. काही दिवसांतच तो तिथल्या काळ्या जनतेचा आवाज बनला. भारतात आल्यानंतर त्यानं अवघा देश पिंजून काढला! तिसऱ्या वर्गातून प्रवास केला, दाटीवाटीत निजला, भटकला. सत्याग्रहासारखी अभिनव कल्पना काढली. चरख्यावरच्या सुतातून आगळ्या क्रांतीची स्वप्नं पाहिली. तो हरिजन वस्त्यांमधून हिंडला. सरकारशी त्यानं असहकार पुकारला, सविनय कायदेभंग केला. 'भारत छोडो'चं आंदोलन केलं. आश्रम काढून स्वावलंबनाचा आणि वेगळ्या जीवनपद्धतीचा मार्ग दाखवला. नोआखालीला जाऊन तो मुस्लिम वस्त्या–वस्त्यांतून हिंडला. असा अफाट नंगा फकीर!...

ह्याच फकीर ख्यातनाम चित्रपट-दिग्दर्शक गॅब्रियल पास्कलच्या जीवनात आला तो त्या फकिराच्या मृत्यूनंतर. शॉनं ज्याला जीनिअस म्हटलंय, तो हा पास्कल. जानेवारी १९४८ मध्ये तो सपत्नीक इटलीहून इंग्लंडला चालला होता, तेव्हा त्याच्या बायकोनं आपल्या स्वप्नात गांधी आल्याचं सांगितलं. लंडनच्या विमानतळावर ते उतरले, तर त्यांना गांधींचा खून झाल्याची बातमी कळली!...

त्यानंतर गांधीविषयी फिल्म करण्याचं डोक्यात घेऊन पास्कल नेहरूंना भेटला. नेहरूंनी त्याला परवानगीही दिली होती.

---

'स्क्रीन टेस्ट कशी झाली?'

'जाताना जयदेवनं मला खूप पढवून पाठवलं होतं.' रोहिणी म्हणाली, 'स्टेज आणि स्क्रीनमधला फरक, फिल्ममध्ये लाउड ॲक्टिंग करून चालत नाही वगैरे वगैरे.'

'तरीसुद्धा पहिला डायलॉग ही अगदी एस. पी. कॉलेजातल्या मुलीसारखी म्हणाली.' – जयदेवचा टोमणा.

'पण मला खूप टेन्शन आलं होतं तेव्हा. बेनला आणि मला एक सीन करायचा होता. रिचर्डनं डायलॉग्ज सांगितले, दृश्य समजावून दिलं आणि एकदाची स्क्रीन टेस्ट पार पडली!'

'निवड होईपर्यंतचा काळ खूपच ताणलेल्या मनःस्थितीत गेला असेल ना?'

'अर्थातच! पण निवड झाल्याचं कळल्यावर I just forgot everything. आम्हाला आठवतंय, कोणाची निवड होणार याबद्दल वर्तमानपत्रात बरंच येत होतं. लोकांना खूप कुतूहल होतं. डॉलीनं अगोदरच मला वजन कमी करायला सांगितलं होतं. त्यावरून एक गोड संशय आलाच होता. निवड झाली तर 'रथचक्र'साठी दुसरी नटी शोधावी लागली असती. कमलाकर सारंगला ते आधी सांगायला लागलं असतं. म्हणून खात्री करून घेण्यासाठी आम्ही डॉलीकडे गेलो. तिला आमची अडचण समजावून सांगितली. मग तिथून तिनं रिचर्डला फोन केला. रिचर्डनं मला बजावून सांगितलं, 'तुझी निवड झालीये; पण इतक्यात कोणाला बोलू नकोस. कारण रिचर्डला स्वतःला त्याअगोदर स्मिता अन् भक्तीला पत्र पाठवून त्यांची निवड का झाली नाही ते कळवायचं होतं. रिचर्डचं म्हणणं होतं की, त्या अभिनयात कुठे कमी पडल्या असं नव्हे, तर माझे फीचर्स त्या रोलसाठी अधिक जवळचे होते. भूमिका मिळाल्याचं कळताच आश्चर्य व जबाबदारी अशी संमिश्र भावना माझ्या मनात होती.'

रोहिणीची निवड झाल्यावर स्मिता आणि भक्तीची काय प्रतिक्रिया झाली हे आम्हाला जाणून घ्यायचं होतं.

रोहिणीच्या म्हणण्यानुसार, स्मितानं तिला एक पत्र पाठवून निवडीबद्दल अभिनंदन केलं, शिवाय 'अर्थ'च्या शूटिंगच्या निमित्तानं आमच्या भेटीगाठी होतातच.'

'आणि भक्ती तर आम्हाला बरेचदा भेटतेच'–इति जयदेव.

'तुझ्यावर चित्रित करण्यात आलेल्या पहिल्या दृश्याबद्दल थोडं सांगशील?'

'चंपारणमध्ये गांधीजींना न्यायला शुक्ल नावाचा एक गृहस्थ आलाय. व्हराड्यात तो बापूंना आपली दुःखं सांगतोय आणि आत स्वैपाकघरात बा पोळ्या लाटताहेत, असा पहिला शॉट होता. हे दृश्य तसं कठीण नव्हतं. त्यामुळं फारसे काही प्रॉब्लेम आले नाहीत.'

'कस्तुरबांच्या भूमिकेत तू कशी तन्मय होत गेलीस, याबद्दल थोडं?'

'आधी मी 'बा'विषयी माहिती गोळा करायला सुरुवात केली. गांधीजींवर आतापर्यंत एवढं प्रसिद्ध झालं असलं तरी बांकडे तसं कमीच लक्ष दिलं गेलंय. 'हमारी बा' हे सुशिला नायर आणि वनमालाबेन पारीख यांनी लिहिलेलं पुस्तक आणि अशीच दोन-चार पुस्तकं. गांधीजींवर लिहिल्या गेलेल्या पुस्तकांमधून बांवर एक-दोन ओळी आढळतात. फिशरच्या बायोग्राफीत तर एकच परिच्छेद आहे. याशिवाय बांशी संबंधित लोकांना जाऊन भेटले. चक्क सूत कातायलाही शिकले. दिल्लीत मी एकूण पाच हजार मीटर सूत कातलं! दर दिवशी दुपारी तीन ते पाच मी चरखा फिरवायचे. दिल्लीतला माझा कार्यक्रम अगदी भरगच्च होता. सकाळी दहा वाजल्यापासून एक वाजेपर्यंत ब्रिटिश उच्चाराची प्रॅक्टिस करायचे. खेरीज शूटिंगच्या वेळेला इन्व्हॉल्वमेंट व्हायचीच!'

'ॲटनबरो स्वतः अभिनेता असल्यामुळं प्रत्यक्ष शूटिंगच्या वेळी नटाला बरीच मदत होत असेल ना?'

'नक्कीच. रिचर्ड इज अ व्हेरी गुड डायरेक्टर. त्यानं कधीही आम्हाला ॲक्टिंग करून दाखवलं नाही. एखादं विशिष्ट दृश्य तो हजारदा समजावून सांगेल; पण उगीच ते अभिनीत करून दाखवणार नाही.'

पृष्ठ १८ वर

गांधींचा मुलगा देवदासला आणि कृष्णा हाथीसिंगलाही पास्कल भेटला होता. चार्लस् बॉयरनं नेहरूंची भूमिका करायला नेहरूंनी परवानगी दिली होती. माउंटबॅटन आणि लेडी माउंटबॅटन यांच्या भूमिका रेक्स हॅरीसन आणि मार्गारेट लेटन करणार होते.

यूल ब्रायनर आणि ॲलेक गिनिस याचा त्यानं गांधीच्या भूमिकेसाठी विचार केला; पण ते त्याला पसत पडले नाहीत. व्हिन्सेंट शीनचं 'लीड काइन्डली लाइट' या पुस्तकाचे हक्कही पास्कलनं विकत घेतले होते. शिवाय 'सत्याचे प्रयोग' या पुस्तकाचा उपयोग करून घेण्याबाबत नवजीवन ट्रस्टची परवानगीही घेतली होती; परंतु १९५४ मध्ये पास्कलचं निधन झालं! त्यामुळं ती फिल्म पूर्ण होऊ शकली नाही.

पास्कलला 'गांधीं'वर सिनेमा काढायची परवानगी दिल्याबद्दल नेहरूंवरं तेव्हाही टीकेचं मोहोळ उठलं होतं. ॲटनबरोच्या वेळीही तोच प्रकार घडलाय!

१९५९-६० च्या सुमारास ॲटनबरो नेहरूंकडे आले, तेव्हा नेहरूंनी त्यांना चित्रपट काढायला परवानगी दिली आणि तेव्हाचे एक मंत्री मोरारजी देसाईंकडे पाठवलं; पण बरेच वर्षं चित्रपट निघालाच नाही. ॲटनबरोंनी कॉपीराइटसाठी दिलेले पैसे मग नवजीवन ट्रस्टनं त्यांना परत करू पाहूले; पण ते स्वीकारण्यात आले नाहीत. जनता राजवटीत ॲटनबरो पुन्हा पंतप्रधान मोरारजी देसाईंकडे गेले. मोरारजींनी त्याना सिनेमा काढायला मंजुरी दिली; पण स्क्रिप्ट बघायला मागितलं.. हे स्क्रिप्ट गांधींचं जीवन व विचार याना न्याय देत नाही, असं मोरारजींचं मत बनलं. शिवाय भारतानं अशा परकीय चित्रपटनिर्मितीस सहाय्य तरी का द्यावं, असा प्रश्न त्यांना पडला. आज मोरारजी पंतप्रधान नाहीत; पण तरीही त्यांनी गांधी चलतचित्रविरोधी समितीतर्फे आयोजित केलेल्या एका समारंभात जाहीररीत्या दम भरलाय की, 'सत्यासाठी आपले प्राण पणाला लावणाऱ्या महात्मा गांधींवरील चित्रपटात सत्यापलाप असेल, तर मी सत्याग्रह करीन!

### गांधीवाद्यांचा विरोध का?

या समितीत गांधीतत्त्वज्ञानाचे अभ्यासक डॉ. उषाबेन मेहता, सर्वोदयवादी मोहनभाई देसाई, 'फोरम फॉर बेटर सिनेमा'चे एम. एस. मथ्यू वगैरे मंडळी आहेत. या गांधीवाद्यांचं म्हणणं तरी काय आहे?

गांधीजीवर वीस कोटीचा खर्च करून ॲटनबरोसारख्या एका परकीयानं चित्रपट

## जस्ट फॅन्टॅस्टिक....पृष्ठ ३७ वरून

'रिचर्डचं वैशिष्ट्य म्हणजे एखादं भावपूर्ण दृश्य घेताना तो स्वत ही जड आवाजात बोलायचा—'ॲक्शन', 'स्टार्ट' वगैरे' ॲटनबरोसारखे हावभाव करीत जयदेव सांगू लागला, 'रिलॅक्स', 'कीप इट अप', 'नाऊ फेस द कॅमेरा'...शिवाय रिचर्ड तीन ओके शॉट्स घ्यायचा आणि त्यातला एक निवडायचा.'

'तुझ स्वतचं शूटिंग किती दिवस झालं?'

'एकूण एकोणीस दिवसात. माझं शूटिंग एकोणचाळीस दिवसांचं होतं. माझ्यानंतर रोशन सेठचं (नेहरू) अडतीस दिवसांचं होतं आणि सगळयात जास्त साहजिकच बेनचं, अठ्याण्णव दिवसाचं होतं.'

आता किंचित हसत जयदेव म्हणाला, 'पाटण्याचा एक प्रसंग सांगतो. हे लोक शूटिंग करत होते, तिथून बराच दूर एक पूल होता. त्यावर प्रचंड गर्दी जमली होती. दिवसच्या दिवस लोक शूटिंग बघत थाबले होते. काहीनी तर चक्क चहाचे स्टॉल्स टाकले होते.'

'खरं तर आम्ही त्या पुलापासून बऱ्यापैकी लांब होतो.' रोहिणीनं पुस्ती जोडली, 'म्हणजे त्यांना शूटिंग नीट दिसतच नसणार! अय्या! आमच्याकडची इंग्लिश माणसं आम्हाला विचारायला लागली की, या लोकांना उद्योगधंदे नाहीत की काय? अक्षरशः सकाळी नऊ वाजता जेवढी गर्दी होती, तेवढीच पाच वाजेपर्यंत होती. जस्ट टू मच!'

'कॅन्डिस बर्जन, एडवर्ड फॉक्स, जॉन गिलगुड, मार्टिन शीन वगैरे बडया कलावंतांच्या तुलनेत आपले भारतीय कलावंत कुठे कमी पडले का?'

रोहिणीच्या मते, निश्चितच नाही. 'अभिनयपद्धतीत फरक जरूर आहे. त्यांचं भावदर्शन restrained असलं, तर आपल्याकडची पद्धत पडद्यावरचा रोल असला, तरी भूमिकेत नाटयमयता आणण्यासाठी अभिनय जरा जास्त केला जातो.'

''गांधीं'चं स्क्रिप्ट बरंच वादग्रस्त ठरलं. त्याबद्दल काय म्हणशील?'

'मला असं वाटतं की, मोहनदास करमचंद गांधीचा 'महात्मा' कसा झाला याची ही कहाणी आहे. थोडी नाटयपूर्णता आणण्यासाठी काही बदल आवश्यक होते. ते करण्यात आलेत आणि यात काही चूक आहे, असं मला वाटत नाही. ही काही डॉक्युमेंटरी नव्हे. केवळ इंग्रजी माणसांनी लिहिलंय म्हणून स्क्रिप्ट biased आहे असं म्हणणं योग्य नाही. इथं हे सांगायला हवं की, जॉन ब्रायलीनं लिहिलेलं हे स्क्रिप्ट ॲटनबरोनं स्वीकारलेलं बारावं व्हर्शन आहे.'

याविषयी रोहिणीनं सांगितलेली एक गंमतीदार गोष्ट अशी—आधीच्या एका स्क्रिप्टमध्ये कस्तुरबा बापूजीना चक्क 'मोहन' अशी हाक मारतात. अर्थात पुढे हे सुधारून घेण्यात आलंच!

'आता एक नाजूक प्रश्न. कस्तुरबाच्या भूमिकेचे तुला किती पैसे मिळाले?'

'सुमारे सव्वा लाख रुपये; पण एका भारतीय नटाने तर कमालच केली. आपल्यापेक्षा कमी काम असलेल्या नटाला जास्ती पैसे देणार आहेत असं समजल्यावर त्यानं सरळ आधी ठरलेला करार मोडून स्वत: जास्त बिलिंग मागितलं.'

हे सांगताना जयदेव-रोहिणीच्या तोंडावर त्या भारतीयाबद्दलची घृणेची सार्थ भावना उमटली होती.

'सिनेमा पाहिल्यावर तुझी स्वतःची प्रतिक्रिया काय झाली?'

'जस्ट फॅन्टॅस्टिक!'

काढावा ही भारतासारख्या गरीब देशाला न परवडणारी चैन आहे. आज बापू असते तर त्यांनी या कल्पनेला कदापि मान्यता दिली नसती. कारण गांधीजींचा साधेपणावर विशेष भर होता. त्यांच्यावरील चित्रपटावर एवढी प्रचंड रक्कम खर्च करणं त्यांच्या आत्म्याला क्लेश देणंच होईल! करमणुकीवर काही पैसा खर्च करायचाच असेल, तर याच पैशात आणखी काही सिनेमागृहं बांधता आली असती किंवा प्रायोगिक अथवा व्यावसायिक चित्रपटांसाठी सरकारला एखादा निधी उभारता आला असता. कुणा एकाची लहर म्हणून त्याच्या मदतीखातर एवढी प्रचंड रक्कम खर्च करावी काय, हा प्रश्न आहे. ॲटनबरो हा कोणी एक अत्यंत कष्टाळू व प्रामाणिक कलावंत असला, तरी तो शेवटी परदेशी आहे. भारताच्या राष्ट्रपित्यावर त्यानं चित्रपट निर्माण करावा, हे कोणत्या तर्कशास्त्रात बसतं ?--वगैरे वगैरे.

डॉ. उषा मेहतांनी पंतप्रधानांना पाठवलेल्या कडक पत्रात म्हटलंय, 'पंतप्रधानांच्या विधानानुसार, गांधींवरील नियोजित चित्रपट हा भारतीय प्रेक्षकांसाठी नाही आणि म्हणून गांधीजींच्या जीवनाचं चित्रण कसं करावं, याचा निर्णय एखादी अ-भारतीय व्यक्तीच करू शकते. पंतप्रधानांचं हे विधान जर खरं असेल, तर ते नक्कीच धक्कादायक आहे. म्हणजे भारतीयांसाठी एक आणि पाश्चात्यांसाठी एक, असे दोन 'गांधी' आहेत, असं पंतप्रधानांचं मत दिसतंय. याला शिक्षणापेक्षा 'कुशिक्षणच' म्हटलं पाहिजे. एखाद्या देशाच्या थोर नेत्यावर परकीयांनी चित्रपट बनवावा आणि त्यासाठी सरकारनं त्याला पैसा पुरवावा ही गोष्ट जगाच्या चित्रपट-इतिहासात अभूतपूर्वच म्हणावी लागेल !'

गांधीजींचे एक नातू व पत्रकार अरुण गांधी तर चक्क म्हणाले, 'ॲटनबरोंनी जर मला चित्रपटाबाबत विचारलं असतं, तर मी त्यांना घरी जाण्यास सांगितलं असतं ! महात्मा गांधींचं दर्शन घडवण्यासाठी प्रोजेक्टर्स आणि इंटरप्रिटर्सची आवश्यकता नाही. आजपर्यंत जगानं इतकी पुस्तकं येऊनही गांधीजींचा संदेश पाळला नसेल, तर त्यांच्यावरचा कुठलाही सिनेमा, मग तो चांगला असो वा वाईट, हे काम करू शकणार नाही!'

आणखी एक गांधीवादी आचार्य कृपलानी यांचाही या चित्रपटाला विरोध होता. अर्थात त्यांच्या टीकेत काही नवीन मुद्दे होते. टिपिकलं गांधीवाद्यांप्रमाणे शिळे, साबुदाण्याच्या खिरीसारखे पुचाट युक्तिवाद करणाऱ्यांपैकी कृपलानी नव्हेत !



नामदार गोखले यांच्या भूमिकेत डॉक्टर लागू

### कृपलानींच्या मते....

'गांधींवर इतक्या लवकर चित्रपट निर्माण करणं हे थोडं घाईचं होईल, असं त्यांचं म्हणणं होतं. गांधींना ज्यांनी काम करताना पाहिलं नाही, अशा लोकांनी त्यांच्यावर चित्रपट काढणं हे तसं अयोग्यच. ते स्वातंत्र्योत्तर काळात पुढे आलेल्या व्यक्तींनाच अधिक महत्त्व देतील आणि स्वातंत्र्यपूर्व काळातील सार्वजनिक जीवनात गांधींबरोबर ज्यांनी खऱ्या अर्थानं काम केलं, त्यांच्याकडे ते दुर्लक्ष करण्याची शक्यता अधिक. शिवाय गांधींसमवेत काम केलेले अनेकजण अद्यापी जिवंत आहेत. काही नवख्या कलावंतांनी त्यांच्या भूमिका करणं हे तितकंसं बरोबर होणार नाही' असं कृपलानींचं प्रतिपादन-

'महात्मा'चे निर्माते विठ्ठलभाई झवेरी यांनी गांधींचे एक चिटणीस प्यारेलाल यांना पाठवलेल्या एका पत्रात ॲटनबरोंच्या चित्रपटाविरुद्ध तीव्र निषेध नोंदवावा, असं आवाहन केलं होतं. अर्थात या पत्राला प्यारेलाल यांनी दाद दिली नाही, असं दिसतं. कारण ते तर या चित्रपटाला अनुकूल आहेत, असं सांगितलं जातं.

'गांधी' फिल्म विरुद्ध असलेल्यांची अशी मागणी होती की, नामवंत गांधीवाद्यांच्या एका समितीतर्फे या सिनेमाच्या स्क्रिप्टची छाननी केली जावी आणि त्याच समितीतर्फे ती सेन्सॉर होऊन मगच ती प्रदर्शित केली जावी.

परंतु ॲटनबरोंनी हे स्क्रिप्ट बी. के. नंदा, मोहनभाई देसाई प्रभृतींना दाखवलं आहे. शिवाय प्यारेलालजींनीही त्यांना वेळोवेळी स्क्रिप्टमधल्या चुका निदर्शनास आणून दिल्या आहेत आणि ॲटनबरोंनी त्या सुधारून घेतल्याचंही सांगण्यात येतं.

वसंत साठेंचा युक्तिवाद तर असलाच म्हणायला हवा. 'गांधीजींचं चित्रपटात यथार्थ चित्रण आहे की नाही, याची दक्षता म्हणूनच सरकार या प्रोजेक्टमध्ये सामील झालं आहे' -इति साठे.

तरीसुद्धा या चित्रपटात काही चुका राहिलेल्या आहेत, असं सांगितलं जातं. उदाहरणार्थ, गांधीजी दक्षिण आफ्रिकेहून परतल्यावर नेहरू आणि पटेल स्टेशनवर त्यांना भेटायला गेल्याचं दृश्य चित्रपटात आहे. प्रत्यक्षात गांधींची आणि नेहरूंची भेट त्यानंतर झाली आहे. या चित्रपटात लोकमान्य टिळक आणि सुभाषचंद्र बोस यांचं दर्शन घडत नाही. (टिळक म्हणे एका मीटिंगमध्ये

# ही गांधींची हॉलीवुड आवृत्ती आहे ! —विठ्ठलभाई जव्हेरी

शहरापासून दूर, सेवाग्रामसारख्या ठिकाणी राहून आपल्या खादी-इतक्याच जुन्या कल्पना निष्ठापूर्वक जोपासणाऱ्या गांधीवाद्याप्रमाणेच विठ्ठलभाई जव्हेरी यांनी आपलं कार्य चालू ठेवलं आहे.
मुंबईच्या मलबारहिलच्या पॉश परिसरातच ' मणिभवन ' ही इमारत आहे. गांधीजींचं हे मुंबईतलं निवासस्थान असायचं. आता तिथे गांधीजींच्या सगळ्या स्मृती, चित्रं, पुस्तकं अन् जव्हेरीनिर्मित ' महात्मा ' या चित्रटाच्या रूपानं जतन करण्यात आल्या आहेत. गांधीजींचा सहभाग असलेल्या ऐतिहासिक महत्त्वाच्या सभा-परिषदा, मोर्चे यांचं चित्रण करणाऱ्या फिल्म्स्, त्यांची भाषणं, छायाचित्रं, पुस्तकं, वृत्तपत्रीय कात्रणं इत्यादींचं प्रयत्नपूर्वक संकलन करून, विठ्ठलभाईंनी सात वर्षं खपून एकूण साडेपाच तासांचा ' महात्मा ' हा चित्रपट तयार केलाय.
चित्रपटाचं ऐतिहासिक महत्त्व फार मोठं आहे. पुन्हा त्यात तपशिलाच्या चुका सापडत नाहीत.

सहासष्ट वर्षांचे विठ्ठलभाई सध्या नेहरूंवर अशीच दीर्घ लांबीची डॉक्युमेंटरी निर्माण करीत आहेत. संशोधनाबद्दल या वयातही त्यांच्या उत्साह पदोपदी जाणवतो. तसंच गांधींवरची आत्यंतिक निष्ठा आणि भक्ती. गांधींवरील प्रत्येक पुस्तकाशी त्यांचं जणू काही नातं जुळलंय असं वाटतं. वृत्तीनं संशोधक असूनही अधूनमधून मिस्किलपणा आणि खेळकरपणाचा त्यांच्या चेहऱ्यावर उमटणारा भाव लक्षात राहाणारच.

प्रश्न : तुमची ' महात्मा ' ॲटनबरोनी पाहिली आहे का ?

उत्तर : हो. ॲटनबरो मणिभवनमध्ये चारेक वेळा आले असतील. तीन वेळा तरी त्यांनी ' महात्मा ' पाहिली असेल. तिन्ही वेळा ते सिनेमा पाहाता पाहाता रडले !

प्रश्न : रडले ?

उत्तर : हो. ॲटनबरो एक चांगले ' ॲक्टर ' आहेत !

प्रश्न : ' गांधी ' विषयी तुमचे नेमके आक्षेप काय आहेत ?

उत्तर : इतक्या लवकर गांधींवर फीचर फिल्म बनवणं हे चुकीचंच आहे. त्यामुळं गांधीजींच्या शारीरिक आणि अध्यात्मिक प्रतिमेला धक्का पोचेल !

प्रश्न : साईबाबा आणि गाडगेमहाराजांवर चित्रपट निघालेत.

उत्तर : माझं मत कायम आहे. व्ही. शांताराम ना बुद्धावर चित्रपट काढायचा होता; परंतु काही राष्ट्रांनी त्याला विरोध केला होता.

प्रश्न : ॲटनबरोनी ' गांधी 'साठी नवजीवन ट्रस्टला काही विशिष्ट रक्कम रॉयल्टी म्हणून दिली होती. ' महात्मा 'साठी तुम्ही रॉयल्टी दिली होती का ?

उत्तर : नाही. कारण माझा चित्रपट अ-व्यावसायिक होता.

प्रश्न : ॲटनबरोच्या सिनेमामुळं गांधींचं नाव जगभर जाईल असं नाही वाटत ?

उत्तर : या सिनेमात गांधींचं बरोबर चित्रण झालंच नाहीये. धिस इज अ हॉलीवुड व्हर्शन ॲन्ड ऑप्टिकल इल्युजन ऑफ गांधी ! गांधींचं असं रूप जगाला कळावं, अशी कोणाची इच्छा असेल ?

प्रश्न : पण ' गांधी ' बनवण्यामागचा मुख्य हेतू तोच होता ना ?

उत्तर : हा चक्क धंदेवाईक सिनेमा आहे. प्रो–ब्रिटिश आणि लॉर्ड माउंटबॅटनना मोठं करणारा. नाही तरी माउंटबॅटनचा जावई चित्रपटाचा एक भागीदार आहेच. शिवाय या चित्रपटात जीना खलप्रवृत्तीचे दाखवलेत. मी राजकमलमध्ये गेलो असताना ' गांधी 'चा एक शॉट बघायला मिळाला. त्यात जीना एवढे जोरजोरात ओरडत होते, जणू हिटलरच बोलतोय !

प्रश्न : पण प्रत्येक दिग्दर्शकाला त्याच्या मताप्रमाणे चित्रण करण्याचं स्वातंत्र्य आहे, असं तुम्ही मानता की नाही ?

उत्तर : न्यूज इज सेक्रेड, कॉमेंट इज फ्री, असं म्हटलं जातं. वस्तुस्थिती ही अखेर वस्तुस्थिती असते.

प्रश्न : या सिनेमात तपशिलाच्या नेमक्या काय काय चुका आहेत, असं तुम्हाला वाटतं ?

उत्तर : भरपूर स्वातंत्र्यपूर्व काळात नेहरू शेरवानी घालत नव्हते; पण सिनेमात म्हणे ते तसे दाखवलेत. गोपाळ कृष्ण गोखले आणि गांधी एकमेकांसमोर गप्पा मारतायत, असं दृश्य आहे. खरं तर गोखले गांधींचे गुरु. गांधी गोखल्यांसमोर असे कसे बसतील ? काही आदर वगैरे दाखवतीलच की ! गांधी हे एकशेपाच पौंडांचे हडकुळे गृहस्थ होते. बेन किंग्जले मात्र मी नीट पाहिला, तर दीडशे पौंडी व मजबूत बांध्याचा आहे. हा गांधी खरा कसा वाटावा ? गांधी दक्षिण आफ्रिकेहून आले तेव्हा जवाहरलाल नेहरूंची आणि त्यांची ओळख नव्हती. तेव्हा नेहरू कोणीही नव्हते. असं असताना नेहरू आणि पटेल गांधींचं स्वागत करायला स्टेशनवर कसे जातील ? अशा अनेक चुका या सिनेमात असू शकतील.

प्रश्न : या सिनेमात रोहिणी हट्टंगडी, डॉ लागू, ओम पुरी वगैरे भारतीय नटांची कामं आहेत. त्याबद्दल काय वाटतं ?

उत्तर : या नटांनी आपले आत्मे विकायला काढलेत. याबद्दल भरघोस रक्कम त्यांच्या पदरात पडलीये.

प्रश्न : आपल्या गांधीविरोधात आंधळ्या देशभक्तीचाच भाग जास्त आहे, असं वाटतं.

उत्तर : तो कसा ? बकिंगहॅम पॅलेसमध्ये पंचम जॉर्जला गांधीजी भेटायला गेले होते. सबंध ब्रिटनभर ते त्यांच्या पंचातच फिरले. त्याच वेषात ते राजाला भेटायला निघाले. तेव्हा राजाला भेटायचं तर असले कपडे घालून चालणार नाही, असं त्यांना कुणी तरी सांगितलं; पण गांधीजींना ते पटलं नाही. मग त्या लोकांनी बकिंगहॅम पॅलेसमध्ये एकाही फोटोग्राफरला येऊ दिलं नाही. या भेटीची छायाचित्रं घ्यायला संपूर्ण बंदी घातली. इतकी अपमानास्पद वागणूक मिळाल्यानंतरही त्या देशातल्या एका माणसाला आपण राष्ट्रपतिभवनात शूटिंग करायला देतो, याला काय म्हणायचं ? सुरुवातीला रेड्डींनी परवानगी नाकारली होती; पण त्यांची ही भूमिका तात्पुरतीच ठरली.
बिर्ला मंदिराच्या परिसरात गांधीजी अखेरच्या काळात वावरले. त्या ठिकाणाला फिल्म स्टुडिओचं रूप देणं आणि गांधींच्या वेषातल्या एखाद्या सामान्य नटाला त्यांच्या जागेवर बसवणं, हे अत्यंत चीड येण्यासारखं आहे !

प्रश्न : ' गांधी ' तुम्ही पाहिला आहे का ?

उत्तर : अजिबात नाही. पाहायची इच्छाही नाही. कुठल्याही परदेशी नटानं साकारलेला गांधी बघणं, हा गांधींचा अपमान आहे, असं मला वाटतं.

*

दूरदृश्यात दाखवलेत.) सत्यजित रेंच्या मते हा सिनेमा कितीही चागला असला, तरी सुभाष-बाबूशिवाय बंगाली लोक तो कितपत स्वीकारतील याची शकाच आहे. एका प्रसिद्ध इंग्रजी–साप्ताहिकानं तर 'गांधी' सिनेमात किमान शंभर तपशिलात्मक चुका असल्याचं म्हटलं होतं.

ॲटनबरो आणि त्यांच्या सहकाऱ्यानी पुन्हा पुन्हा आपली भूमिका मांडली आहे. 'गांधी-जीच्या आयुष्यातले सगळे पैलू तीन तासांत मांडणं अशक्यच होतं तेव्हा कुठल्याही एकाच पैलूवर भर दिलेला नाही. बांध्या स्वैपाकघरा-विषयी एका माणसाने त्यात दोष आहे असं म्हटलं होतं. खरं म्हणजे बांच्या स्वैपाक-घराची उभारणी करताना आम्ही त्या वेळच्या गुजराथी पद्धतीविषयी खूप संशोधन केलं होतं. त्यामुळं त्यात काय चूक असावी असा प्रश्न मला पडला. त्यावर त्या माण-सानं सागितलं की, 'सिनेमात बांच्या स्वैपाक-घरात पाच कढया आहेत. प्रत्यक्षात त्यांच्या-कडे चारच होत्या!' या अजिबात महत्त्वाच्या गोष्टी नव्हेत, असं ॲटनबरो सागतात.

या सिनेमाच्या निर्मितीमागं ॲटनबरोचा नेमका काय विचार आहे?

विसाव्या शतकातल्या बऱ्याच मोठ्या व्यक्ती मी प्रत्यक्ष पाहिल्या. मला गांधी जास्त भावण्याचं कारण म्हणजे, बाकीजण हे तत्कालीन राजनीतीतच रस घेणारे होते; परंतु गाधींची भावनिक व अध्यात्मिक उची फार मोठी होती. गाधी व्यावहारिक होतेच; पण चतुर आणि विवेकीही होते. ते आदर्श उपदेशक होते. करुणा आणि असहिष्णुता यासाठीचं त्यांचं आवाहन आगळंच होतं. (या निमित्तानं साठीच्या जवळ आलेल्या ॲटनबरोविषयी दोन शब्द सागायला हवेत. यापूर्वी ॲटनबरोनी दोन युद्धविरोधी चित्र-पट दिग्दर्शित केले आहेत. त्यांचे वाडवडीलही नाझीपासून ज्यूचं रक्षण करण्यात आघाडी-वर होते.)

'This is the film on Gandhi's spirit' असं ॲटनबरो म्हणतात. भारताच्या स्वातंत्र्यआंदोलनावर हा चित्रपट नाही. *म्हणून गांधीच्या आयुष्यात आलेली* एखादी घटना गाधीपासून वेगळी पडली की, मी तिला सोडून गाधीबरोबर पुढं जातो. टिळक आणि बोस सिनेमात नाहीत याला ॲटन-बरोनी हे उत्तर दिलंय.

भारताची फाळणी होणार, असं दिसत असताना गांधीजींनी जीनांना पंतप्रधान होऊ द्यावं आणि त्यानाच स्वतःचे मंत्री निवडायचं स्वातंत्र्य असावं, अशी विनंती नेहरूंना केली होती. गांधी, नेहरू, जीना, पटेल यांच्यातल्या पत्रव्यवहारातून या गोष्टी होत. सिनेमात थोडी नाट्यमयता आणण्यासाठी मी या सगळ्या मंडळींना एकत्र बोलावून ते चर्चा करीत आहेत, एवढं स्वातंत्र्य जरूर घेतलंय; पण मूळ सत्याला कुठे धक्का बसणार नाही. याची काळजीही घेतलीये, असंही ॲटनबरो सांगतात.

## आजच्या काळाशी संदर्भ

चित्रपटाच्या यशाबद्दल आत्मविश्वासानं बोलताना ॲटनबरो म्हणतात, माझ्या चित्र-पटात सर्वसामान्यांना रस वाटेल. नव्या पिढीला गांधीजींचा खरा स्पर्श माहीत नाही, असं स्वत: नेहरूंनीच मला सागितलं होतं. या नव्या पिढीला गाधीजींबद्दल सांगणं जरु-रीचं आहे. आजही झिम्बाब्वेचे अध्यक्ष रॉबर्ट *मुगाबेंच्या कार्यालयात गाधीजींचं छायाचित्र* लावलेलं दिसतं. आजचे बहुतेक प्रश्न हे धर्मामुळे उद्भवलेत. इराण–अरब–इस्रायल–उत्तर आयर्लंड अशी अनेक उदाहरणं देता येतील. गाधींनी सागितलं होतं की, सत्य ईश्वर आहे, आणि म्हणून ईश्वर सत्य आहे. या सत्यापर्यन्त तुम्ही कसे पोचता हे त्यांना महत्त्वाचं वाटत नव्हतं. कुठल्याही धर्मांचा विचार गांधींनी केला नाही, आजच्या संद-र्भात पाश्चात्य राष्ट्रांनी यापासून बरंच काही शिकण्यासारखं आहे.

गाधीजींच्या शिकवणीचा प्रसार करायचा असेल, तर पुस्तक लिहून किंवा जव्हेरी-सारखी डॉक्युमेंटरी बनवून उपयोग नाही, त्यासाठी फिचर फिल्मच करायला हवी, कारण माझी फिल्म जगभर जाणारच. जव्हेरींची साडेपाच तासांची सुंदर डॉक्यु-मेंटरी भारतातही धडपणे दाखवली गेली नाही. सध्या बापूजींचे शब्द पुस्तकात बंद झालेत!'

## 'महात्मा'

वादग्रस्त ठरलेल्या ॲटनबरोंच्या गाधी-चित्रपटाचा प्रश्न फार व्यापक आहे. त्यात ऐतिहासिक, नैतिक, तात्त्विक आणि मुख्य म्हणजे पोक्ष केलेल्या राजकीय भूमिका अशी बरीच सरमिसळ झालीये. हे सर्व समजावून घेण्याच्या दृष्टीनें जव्हेरींची 'महात्मा' बघणं आम्हाला आवश्यक वाटलं. या फिल्ममध्ये आपल्याला खरेखुरे गाधीजी भेटतात. गाधीजी हे केव्हाचेच महात्मा होऊन राहि-लेत. सरकारी कार्यालयात त्यांच्या तसबिरी आणि सार्वजनिक ठिकाणी त्यांचे पुतळे आढळतात. त्यामुळें ते राष्ट्रपिता खरेच, पण तरीही दूरचे भासतात.

'महात्मा'मध्ये गाधी खूपच जवळचे भासले. सशाप्रमाणे म्हातारपणीही तुरुतुरू चालणारे, डोळ्यांमध्ये ध्येयाशिवाय दुसरे काहीही नाही, असे गांधीजी लहान मुलांना खेळवताना, पत्रकारांशी बोलताना त्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून जाणारं अत्यंत निरागस आणि गोड हास्य, अवघ्या जगाची करुणा आपल्या हृदयात सामावणाऱ्या बापूचा तेवढाच भावओला आवाज. जमावात मिसळणारे, जमावात राहाणारे आणि जमावाचेच झालेले गाधीजीही त्यात दिसले. त्यांच्या अंत्ययात्रेएवढं भव्य दृश्य यापूर्वी कधीही पाहिल्याचं स्मरत नाही. पंचा नेस-लेला एक वेडा फकीर आपलं माणूसपण जतन करत आपल्यामागे कोट्यवधी लोकांना एवढं कसं ओढून नेऊ शकतो, असं क्षणभर वाटलं.

गांधीजींच्या जीवनातील प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्याचा एक भाग; याप्रमाणे चौदा भागाची ही डॉक्युमेंटरी आहे. साहजिकच प्रत्येक प्रसंगात रस वाढत जाईल, अशी अपे-क्षाच ठेवण्यात अर्थ नाही. तिचं ऐतिहासिक मोल मोठं आहे. अधूनमधून कंटाळवाणी होत असली, तरी गांधीजींच जितं जागतं दर्शन या चित्रपटातून होतं. म्हणूनच दूरदर्शन किंवा अन्य माध्यमातून त्याचा गावोगावात प्रसार व्हायला हवा. ॲटनबरोना पाच कोटी रुपये देताना जेवढी (खरं तर नको तितकी) तत्परता दाखवण्यात आली, त्याचा एकदशांश भाग जरी महात्माबाबत प्रत्ययास आला, तर सरकारचं कौतुक करायची संधी प्राप्त होईल!"

ॲटनबरोंच्या 'गांधी'मध्ये असंख्य चुका असल्याचं अनेक मंडळी सांगतात. त्यातल्या काही निरर्थक असल्या, तरी सर्वच दुर्लक्ष करण्यासारख्या नसाव्यात. चित्रपटात नाट्य-पूर्णता आणण्याच्या संदर्भात केला जाणारा युक्तिवाद प्रत्येक बाबतीत पटण्यासारखा असेलच, असं नाही.

दुसरीकडे गांधीवाद्यांचा हेकट हट्टीपणा.

आमची एक समिती चित्रपटाचं स्क्रिप्ट बघेल आणि सेन्सॉर करेल, ही एक शुद्ध अव्यवहारी मागणी आहे. गांधीवर कोणाही भारतीयानें चित्रपट काढला नाही तो याच कारणासाठी की, गांधीजीबद्दल त्यांना खूप आदर आहे, असा युक्तिवादही गांधीवादी करतात.

गांधी ही गांधीवाद्यांची खाजगी मालमत्ता नाही. गांधींना राष्ट्रपिता वगैरे म्हणून त्यांचं अमुकंच पद्धतीने चित्रण व्हावं, असं म्हणणं हे लोकशाहीवर प्रेम असल्याचं लक्षण खचितच नव्हे. गांधीजी हे फार उच्च कोटीचे पुरुष होते, ही गोष्ट सर्वमान्य आहे. एक-दोन पुस्तकं लिहून नाइन अवर्स टू राम ' अथवा 'गांधी' यासारख्या चित्रपटाने त्यांची जनमानसातील प्रतिमा एकदम खालावेल, असं मानणं केवळ अयोग्य आहे. खुद्द गांधीजींनी एकदा 'हिमालयन ब्लंडर' असं आपल्या एका चुकीचं वर्णन केलं.

गांधीजीचं हे माणूसपण 'महात्मा' सिनेमातनसुद्धा जाणवतं. मग हेच लोक गांधीजींना देवत्व का देताहेत, असा प्रश्न पडतो. खुद्द नेहरूंनीही ॲटनबरोंना हाच सल्ला दिला होता. 'गांधीजीचं चित्रण करताना त्यांना ते होते तसे रंगवा, उगीचच देव बनवू नका. आम्ही भारतीयांनी त्यांना मंदिरात बसवून ठेवलंय ' नेहरूंची ही व्यापक दृष्टी गांधीवाद्यांत कधीच आढळून आली नाही.

विद्याधर पुंडलिकांनी सावरकरांच्या जीवनातील एका पैलूवर 'सती' नावाची कथा लिहिताच पुण्यातल्या काही हिंदुत्ववाद्यांनी पुंडलिकाच्या घरावर मोर्चा न्यावा ही एक गंमतच! घरावर मोर्चा नेणारे हिंदुत्ववादी, संघावर टीका करणाऱ्या रावसाहेब कसब्यांच्या झोत या पुस्तिकेच्या विक्रीस आडकाठी आणणारे जनसंघीय, घाशीराम कोतवाल परदेशात जाऊ नये म्हणून प्रयत्न करणारे पुण्या-मुंबईतले विद्वान अणि ॲटनबरोच्या सिनेमावर हल्ला चढवणारे गांधीवादी यांच्यातच मूलभूत फरक काहीच नाही.

मोठ्या व्यक्तीच्या जीवनावर आधारित लिहिली गेलेली बहुसंख्य नाटकं आजवर वादग्रस्त ठरली आहेत. कानेटकरांच्या 'हिमालयाची सावली' किंवा 'कस्तुरीमृग' या नाटकाबाबतही असेच वाद झालेले होते. गांधीचा प्रभाव जगभर पडला होता, त्यामुळे हा चित्रपट वादग्रस्त होणे हे स्वाभाविकच आहे.

कोणा परदेशियानं गांधीवर चित्रपट बनविण्याची इच्छा प्रदर्शित केली, तर त्यात चुक ते काय? सरकारनं त्यांना प्रोत्साहन देणं आवश्यकच. कारण त्यामुळं गांधीबद्दल जगातल्या अन्य देशांतल्या लोकांनाही काही समजू शकेल. एक आक्षेप असा असू शकतो की, गांधी हा व्यावसायिक चित्रपट आहे. मग त्याला सरकारतर्फे कर्ज का द्यावं? पण फायद्यातील एक ठराविक टक्के हिस्सा सरकारला मिळणार आहे. या हिश्यात काही कमी-जास्त असेल, तर त्याविरुद्ध जरूर आवाज उठवला जावा.

आजच्या गणकयंत्राच्या युगातही गांधीच्या तत्त्वज्ञानाचा निश्चितच संदर्भ आहे. आज परदेशांतही गांधीजीच्या तत्त्वज्ञानाची अध्यासनं उघडण्यात आलीत. सत्याग्रहासारखी शांततापूर्ण विरोधाची हत्यारं अण्वस्त्रप्रसाराविरूद्ध आंदोलनं यांचा अवलंब केला जातोय. भारतात मात्र गांधींचा लोकांनी येशू ख्रिस्त केलाय! राजघाटावर गांधीजींच्या नावानं शपथा घेऊन त्या ताबडतोड विसरल्या गेल्याची दृश्यं दिसतात किंवा अचानकपणे गांधीवादी समाजवादाचं अग्निहोत्र घातलं जातं. इतके दिवस सत्ताधारी पक्षानं, तसंच गांधीच्या अनुयायांनी गांधीच्या नावाचा देशांतर्गत बाजार केला होता. ॲटनबरोंच्या नव्या व्यावसायिक चित्रपटानं या नावाच्या आंतरराष्ट्रीय धंद्यास चालना मिळू नये एवढीच अपेक्षा!

गांधी चित्रपटाला मात्र आपण स्वच्छ मनानं सामोरे जाऊ या! □


With best Compliments from

**DESAI BROTHERS LIMITED**

Bidi Manufacturers


1436, Kasba Peth,
POONA 411 011.

Branches at

NIZAMABAD — KAMAREDDY — MANGALORE
NADIAD — RAJNANDGAON — SANGAMNEER
TIRUNELVELI

*Telephone : 44783/32* — *Gram : HARISMRUTI*

# स्वातंत्र्य त्यामुळे आम्हाला लाभली अपूर्व संधि




"राष्ट्राकरितां असलेली ही कार्यक्रम-पात्रका आपल्या एकूण विकास योजनेशीं सुसंबध्द करण्यात आली आहे. समाजातल्या विविध विभागांसाठी लवकर दृश्य फलनिष्पत्ती दाखविली जावी, म्हणून तींत खास भर देण्याची क्षेत्रेंहि नमूद करण्यात आली आहेत."

**यशस्वी अंमलबजावणीसाठी आज गरज आहे प्रत्येक नागरिकाच्या सहकार्याची**

'एकमेकां साहय करं'

"हा कार्यक्रम आपणां प्रत्येकासाठी आणि आपल्या राष्ट्रासाठी आहे. आपणां सर्वांना आपल्या या मातृभूमीची सेवा करावयाची आहे, ती सुजलांसुफलां व्हावी म्हणून कसून प्रयत्न करावयाचा आहे आणि आपल्या या राष्ट्राची उभारणी करावयाची आहे. म्हणून हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरितां मी आपणा सर्वांच्या संपूर्ण हार्दिक सहकार्यासाठी आवाहन करीत आहे."

—पंतप्रधान
श्रीमती इंदिरा गांधी

**स्वातंत्र्याचे ३६ वें वर्ष-संकल्पाचा नव उत्कर्ष**

davp 82/2

MANOOS (Marathi Weekly) 1.50 Paise Regd. No. PNC-W 28
( Licensed to post without prepayment of postage-No. 11)

एकतीस सालच्या फेब्रुवारी महिन्यात त्या अमेरिकन तरुणाची बोट मुंबईच्या किनाऱ्याला लागली. घाईगर्दीतच त्याने दिल्लीला जाणारी फ्रॉंटियर मेल पकडली.

'शिकागो ट्रिब्यून'चा प्रतिनिधी म्हणून त्याने याआधी महत्त्वाच्या घटना टिपल्या नव्हत्या असं नाही; पण आता त्याला अनुभवायचा होता एक महात्मा. त्या महात्म्याने छेडलेला अनन्यसाधारण संग्राम आणि युरोपने त्यापूर्वी कधीही न अनुभवलेली अहिंसा.

गांधीजी नुकतेच तुरुगातून सुटले होते आणि लॉर्ड आयर्विनशी त्यांची बोलणी सुरू होती.

गांधीजी आपल्या कामातून वेळ काढून त्या तरुणाला भेटले. एकदा नाही अनेकदा.

त्या सहवासातून त्या तरुणाला दिसला एक महात्मा. ख्रिस्ताशी साधर्म्य सांगणारा. युगायुगातून एकदाच जन्मणारा.

पण त्या महात्म्यात दडला होता एक माणूस. मोहनदास करमचंद. त्या महात्म्यालाही त्या माणूसपणाची जाणीव होती. अनेकदा तो तसं जाहीरपणे बोलूनही दाखवायचा.

त्या माणसाच्या आणि त्या महात्म्याच्या आठवणी तो तरुण आज पन्नास वर्षांनतर सांगतोय.

त्याचं नाव आहे विल्यम शिरर. जगप्रसिद्ध इतिहासतज्ज्ञ आणि युद्धवार्ताहर. राइझ अँड फॉल ऑफ थर्ड राइश या गाजलेल्या पुस्तकाचा कर्ता.

या आठवणींचं नाव आहे

**गांधी – अ मेमॉर**

या पुस्तकाचा परिचयात्मक संक्षेप या पुढील २२ ऑगस्ट अंकापासून

# महात्मा आणि माणूस

स्वैर रूपांतर : **निखिल वागळे**